# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. 17.05.2022 (29.4.2022 व दि.9.5.2022 ची तहकुब सभा)**

शुक्रवार दि. २९/०४/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार, दि. ०९/०५/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा मंगळवार दि. १७/०५/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | शाह राकेश रतिशचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील धनेश परशुराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १८) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १९) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २०) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २१) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २२) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २३) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २४) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| २५) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| २६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| २७) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३०) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३१) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ३२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३३) | मेहता डिम्पल विनोद | सदस्या |
| ३४) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ३५) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ३६) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ३७) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ३८) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ३९) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४०) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४१) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ४२) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४३) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ४४) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ४५) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ४६) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ४७) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ४८) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ४९) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ५०) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ५१) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ५२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५३) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ५५) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५६) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ५७) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ५८) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ५९) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ६०) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ६१) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ६२) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ६३) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ६४) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ६५) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ६६) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ६८) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ६९) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| २) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ३) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ४) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ५) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| ६) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ७) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ८) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ९) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| १०) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ११) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| १२) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| १३) | शेख अमजद गफार | सदस्य |
| १४) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| १५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १६) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| १७) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| १८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| १९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| २०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| २१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| २२) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| २३) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| २४) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| २५) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| २६) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| २७) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २८) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |
| २९) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

मा. महापौर :-

सचिव साहेब सभेला सुरुवात करावी.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 9 वरती आपली चर्चा चालु होती.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम तुमची परवानगी असेल तर मला दोन विषयांवर बोलायचे आहे.

मा. महापौर :-

महत्वाचे आहे का?

अनिल सावंत :-

एकदम महत्वाचे आहे.

मा. महापौर :-

बोला.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम धन्यवाद. एक विषय असा आहे हे आमच्या टर्मचे शेवटचे वर्ष आहे. बजेट होऊन 2 महिने झालेले आहेत. तरी सुध्दा इतर विकास कामांचे सोडाच पण नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधी ही काम सुध्दा ज्यावेळी नगरसेवक घेऊन जातात त्यावेळी बजेट विखंडनासाठी पाठविलेला आहे अशी आम्हाला माहिती मिळते. 2 महिने झालेले आहेत. तर नक्की परिस्थिती काय आहे? शेवटचे वर्ष आहे. वॉर्डमधली काम होणे ॲटलीस नगरसेवक निधी प्रभाग निधीमधून काही आमच्या कमेटमेंट असतात. वॉर्डमधील इमारतींना वगैरे त्यांचा समोरचा पेव्हर ब्लॉक असू दे किंवा स्टॅम कॉंक्रीट असू दे मग ती काम घेण्यानंतर आता दोन महिन्यात आमची टर्म संपेल मग आचार संहिता वगैरे लागेल. तर ह्या दोन महिन्यामध्ये सुध्दा आम्हाला अशी उत्तर मिळतात त्यामुळे जरा खुलासा व्हावा की नक्की परिस्थिती काय आहे.

मा. महापौर :-

बजेटच्या संदर्भामध्ये खुलासा द्यावा.

अजित कुलकर्णी (मुख्यलेखाधिकारी) :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो आपला प्रश्न आहे की बजेट विखंडनाला पाठवला आहे की नाही.

अनिल सावंत :-

त्याशिवाय जे नगरसेवक निधी आणि प्रभाग निधीची जी काम आहेत त्याबाबतीत सुध्दा आम्हाला अस सांगण्यात येते की निधी नाही आहे.

अजित कुलकर्णी (मुख्यलेखाधिकारी) :-

बजेटच्या संदर्भातला विषय आहे तो विखंडनाला अजून पाठवलेला नाही.

अनिल सावंत :-

म्हणजे बजेट अस्तित्वात आहे.

अजित कुलकर्णी (मुख्यलेखाधिकारी) :-

बजेट अस्तित्वात आहे.

अनिल सावंत :-

त्यानंतर मग प्रभाग निधी आणि नगरसेवक निधीची काम होणार आहेत. जे बजेटमध्ये प्रोव्हिजन केलेले मा. महासभेने त्याप्रमाणे काम होणार आहेत.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपण महासभेला बजेटचा प्रस्ताव लेखा विभागाकडे प्राप्त दि. 28/4/2022 सदर प्रस्ताव सोबत मंजूर झालेल्या कामांची यादी 29/4/2022 ला आलेली आहे. नगरसचिव कार्यालयाकडून बजेट 30/4/2022 ला समजा आज आपल्याकडे सुट्टीचे दिवस वगळता बजेट येऊन 10-12 दिवस झाले असतील. त्याअनुषंगाने आतापर्यंत एप्रिल पासून आतापर्यंत देयकाची रक्कम असेल किंवा कम्पलसरी एक्सपेंडीचर असतो पगार असेल किंवा अत्यावश्यक सेवा असतील तरी अशा प्रकारची अत्यावश्यक सेवेतील 35 बीलांवर 12.89 कोटी रुपये महापालिकेने दिलेल आहे. दुसरं मार्चच्या अखेरपर्यंत प्रलंबित असलेल्या देयकाची संख्या आणि आताचे आहे ते एकूण 1 एप्रिलनंतर आलेले 50 बील आहेत. परंतु सविस्तर असे सांगावे वाटते की, आपल्याकडे नगरसेवक

निधी एकूण आपल्या उत्पन्नाच्या सोर्स ऑफ इन्कमच्या 2 टक्केपर्यंत खर्च करता येतो. 15 लाखाची रक्कम आपण बजेटमध्ये प्रत्येक नगरसेवक निधीमध्ये 25 लाख केली. प्रभागामध्ये 15 ची 25 केली.

अनिल सावंत :-

20 मला वाटतं.

मा. आयुक्त :-

आपली 30 कोटी असणारी रक्कम आता 45 कोटीवर गेलेली आहे. त्याचप्रमाणे यात बरेच हेड आहेत. फॉर एक्झाम्पल मालमत्ता कराची बजेटमध्ये असे म्हटलेले आहे 110 कोटी शासनाकडून ते येतील असे गृहित धरुन बजेट बनविलेला आहे. माझ्या माहितीनुसार राज्यात कुठल्याच महापालिकेला महराष्ट्र शासन मालमत्ता कराचा रिंबर्समेंट किंवा परतावा म्हणा किंवा ब्रीजेड देण्याची कुठे तरतुद नाही आणि ती दिलीही जात नाही. अशा प्रकारची आकडे फुगवून दिलेले आहेत की ज्यामुळे बजेट करायचे म्हणले आपले स्पील ओव्हर 400 कोटी पेक्षा जास्त आहे. तिसरी गोष्ट अशी आहे की ज्या महासभेत आपण चर्चा केली त्यावेळी कुठल्याही कामाची यादी इथे चर्चेला आली नव्हती. अचानक पुढे बजेट पाठवला जातो आणि दुसऱ्या दिवशी एक कामाची यादी सोबत सही शिक्के मारुन येते. मी जबाबदारीने बोलत आहे. ह्या ठिकाणी काम करत असताना कुठल्याही कामाची यादी चर्चेला आलेली नव्हती. तुमच्यापैकी कोणाकडे होती?

अनिल सावंत :-

नाही.

मा. आयुक्त :-

मग हे सगळ असताना तुमच्याकडून बजेट आल्यानंतर सुट्टीचे दिवस वगळता मी त्या बजेटवर प्रत्येक पेजवर अभ्यास करत आहे. पूर्वी महानगरपालिका आयुक्ताने काय बजेट दिलं होतं, स्टॅन्डिंगने काय केले आणि मा. महासभेने अंतिम मंजूरी कशाला दिली होती. सर्व साच्यात बसत असेल आपली आर्थिक बजेट त्याला मॅच होत असेल तर हे बजेटची अंमलबजावणी होईल. जमा आणि खर्च आणि दिलेली याच्यात जर तफावत असेल आणि महापालिकेला जर आर्थिकदृष्ट्या शक्य नसेल तर त्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी ते विखंडीत करण्यात येईल. तर ते अंतिम टप्प्यात आहे. आज उद्या त्याच्यावर फायनल निर्णय होईल. कारण प्रत्येक हेड खाली बघण्यासाठी त्यात वेळ जात आहे. दिलेली मूळ रक्कम आणि दोन टप्प्यात झालेली वाढ काही ठिकाणी कमी झाले काही ठिकाणी वाढ झाले तर याचा तुलनात्मक अभ्यास करावा लागतो. आणि त्यामुळे ते बजेट बघण्यासाठी वेळ गेलेला आहे. मधल्या काळात आपल्या सुट्ट्या होत्या काही कार्यक्रम होते फारतर आमच्याकडे बजेट येऊन कामचे 10 दिवस झाले आहेत कारण बजेट यायला 30 एप्रिल आला होता आणि उर्वरित हे सगळ झाल्यानंतर मा. महापौर मॅडम असतील, स्टँडींगचे सभापती असतील यांच्याशी मी बोलणार आहे.

अनिल सावंत :-

म्हणजे आम्ही आता नगरसेवकांनी नगरसेवकनिधी, प्रभाग निधीची काम द्यायची की नाही?

मा. आयुक्त :-

मी त्याचविषयी बोलत आहे की आजची महासभा...........

अनिल सावंत :-

आपण साहेब जनरल कामांविषयी बोलताना ठिक आहे यादी नव्हती वगैरे प्रश्न आहे फक्त नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी........

मा. आयुक्त :-

नगरसेवक निधीची जी नेहमी दरवर्षी आपण रक्कम आहे. दरवर्षी आपल्याकडे 15 लाख रुपये होती एका ठिकाणी त्याचे 20 आणि एका ठिकाणी 25 केलेले आहे. आपले मुळ तर 15 लाखापर्यंत यापुढेही होती तर त्याचा जो आता मी म्हटलो त्याप्रमाणे तुलनात्मक अभ्यास करुन आज उद्या

मोस्टली उद्यापर्यंत मा. महापौर मॅडम आणि मा. सभापती स्टॅन्डिंग यांच्याशी बोलून अंतिम सांगणार आहे.

अनिल सावंत :-

ठिक आहे. साहेब आपण सहानुभूतीपूर्वक विचार कराल अशी अपेक्षा आहे आणि आपण करालच.

मा. महापौर :-

सर्व नगरसेवकांची अशी अपेक्षा आहे की नगरसेवक निधी प्रभाग निधी आणि जो पण स्वेच्छा निधी आहे आणि आता ज्यांनी ज्यांनी काम जी दिली असतील प्रस्तावित असतील आता काळ कमी आहे आमच्याकडे पिरेड कमी आहे आणि बजेट आपल्याकडे सादर केलेला आहे तर ते सदरची काम लगेच आपण हाती घ्यावी. जेणेकरुन नगरसेवकांनी जे नागरिकांना आश्वासन दिलेले आहे कामासंदर्भामध्ये ते पूर्ण करण्यांत येईल.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम जसे आमचे मित्र सन्मा. सदस्य अनिल सावंत यांनी विषय उपस्थित केला आयुक्त साहेब हे बजेट एक अंदाजपत्रक आहे. प्रशासनाने जे अंदाजपत्रक इज नॉट द 100 परसेंट कन्फर्म की एवढ उत्पन्न देणार आणि एवढा खर्च येणार आहे. फक्त मॅडम हे अंदाजपत्रक आहे. हे अंदाजपत्रक प्रशासनाने स्थायी समितीला सबमिट केल्यानंतर स्थायी समितीच्या सदस्यांनी चर्चा करुन आणि ते पास केले. त्याच्यात आयुक्त साहेब म्हटले की, गेल्यावेळी 15 लाख होतं ह्यावेळी 20 लाख सर मागे तुम्ही पेपरमध्ये जर वाचले असेल तर सन्मा. मुख्यमंत्री साहेबांनी प्रत्येक आमदारांना 5-5 कोटी रुपये निधी वाढवून दिलेला आहे. म्हणजे त्यांचा आमदार निधी 5 कोटी झालेला आहे. तर मग आपण महापौर या नात्याने हे आपले शेवटचे वर्ष आहे तर मग आपण पण 5-5 लाख रुपये आमच्या स्थायी समिती सभापतीने आणि सगळ्या पक्षातील सदस्यांनी त्यामध्ये एकमताने वाढवून दिलेले आहेत. उलट सर तुम्ही आणखीन उदार होऊन सांगितले पाहिजे अरे 5 लाख काय वाढवता तुम्हाला मी 10 लाख वाढवून देतो. असे तुम्ही ठणकाऊन सांगितले पाहिजे होते. सर आमची तुम्हाला विनंती आहे काल तुम्ही जो अप्रतिम प्रोग्राम केला कार्यक्रम केला सर नजर लागण्या सारखा प्रोग्राम होता. आमचे सन्मा. नेते फडणवीस साहेब आले होते आणि त्यांनी तुमची तारीफ केली सर. तर आमची तुम्हाला ही अपेक्षा सर आता हे शेवटचं 2-4 महिनेची टर्त आता राहिलेली आहे. तर तुम्ही हे अंदाजपत्रक फटाफट क्लियर करा आणि त्याच्या कामाला सुरुवात करा कारण की सर तुम्ही ऑलरेडी त्या बजेटची अंमलजावणी सुरु केलेली आहे. तुम्ही पेमेंट सुरु केलेले आहे. काही ठिकाणी तुम्ही तरतूद पण चालु केलेली आहे. तर मॅडम ऑलरेडी हे आता आपलं अंदाजपत्रकाचे काम सुरुवात झालेली आहे. आता ह्याला विखंडन शक्य नाही असे माझे तरी प्रामाणिक मत आहे. दुसरी गोष्ट जस आता साहेब बोलले लिस्ट कसे असते माहित आहे का की ही जी लिस्टची परंपरा आहे ही पहिल्यापासून आहे ही आताची नाही. गेल्या अनेक वर्षापासूनची ही परंपरा आहे आणि ह्या लिस्टमध्ये सर सगळ्या पक्षीय नगरसेवकांच्या आणि सर्व मिरा भाईंदर शहरातील कामांची आपण केलेले आहे. म्हणजे जस महापौर म्हणतो की मी मिरा भाईंदर शहराची आहे. त्याच्यामध्ये शिवसेना असो, कॉंग्रेस असो, बी.जे.पी असो सगळ्या नगरसेवकांची काम महापौर मॅडम घेतलेली आहेत आणि आमचे स्थायी समिती सभापतींना घेतलेली आहेत सर त्याच्यामुळे दुमत कुठेच नाही तर माझी अशी विनंती आहे साहेब तुमच्याकडे 150 चा स्पीड आहे तो वरुन 175 वरती करा आणि हे अंदाजपत्रक फटाफट क्लियर करुन मॅडम काम करा अशी आमची तुम्हाला विनंती आहे.

मा. महापौर :-

बरोबर आहे कारण तीन महिन्यामध्ये त्या लिस्टमधली काय सगळीच काम होणार नाहीत. अतिआवश्यक काम असतील त्याला तुम्ही प्ारधान्य द्या. नगरसेवक निधी नंतर तुमचेच राज्य आहे.

आता आम्ही आहोत ना तर आम्ही बोलणार ना की आमची काम करा. नगरसेवक इथे येऊन बसतात. तर महासभेला येऊन का बसले साहेब तुम्ही दिला आहे आम्हाला विषयपत्रिकेवरती विषय ते मंजूर करुन आम्ही तुम्हाला देऊ. स्टॅन्डिंगला पण तुम्ही निविदा पाठवल्या मंजुरीसाठी मग त्या त्यांनी करायच्या स्टॅन्डिंगने मंजूरी करुन तुम्हाला द्यायच्या मग त्यासाठी तुम्हाला नगरसेवक पाहिजेत ना मग त्यांची काम करायला काय प्रॉब्लेम आहे. नगरसेवक निधी, प्रभाग निधीची काम मला वाटते तात्काळ तुम्ही चालू करा आणि स्वेच्छा निधीची पण पदाधिकाऱ्यांची आहेत. बजेटची अंमलबजावणी सुरु करा. सर्व लोकप्रतिनिधींची अशी इच्छा आहे.

अनिल सावंत :-

आणि काल सुध्दा मॅडम माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब सुध्दा काल आपल्या भाषणामध्ये त्यांनी सांगितले लोकप्रतिनिधींची निधी द्या म्हणून आयुक्तांना त्यांनी विनंती केलेली आहे की लोकप्रतिनिधी थांबवू नका द्या त्यांना म्हणून.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो मी यापूर्वीच धृवकिशोर पाटील साहेब बोलण्यापूर्वीच उल्लेख केलेला आहे मी ह्या बाबी तपासून पाहत आहे आणि त्यांनी अतिशय कमी शब्दात पण उत्कृष्ठ वाचन केले. परंतु मला त्यात एक सांगाव लागेल जमा आणि खर्च त्याला ताळेबंद म्हणतात बॅलेंसशिट म्हणता ना जमा आणि खर्च जेव्हा सोर्स ऑफ इनकम वाढवायची वेळ येते साध प्रॉपर्टी टॅक्समध्ये 300-500 रुपये जेव्हा पर फॅमीली पर हेड वाढवायची वेळ येते त्यावेळी अस काय आपण वातावरण तयार करतो की ते वाढल्यावर फार मोठी जागतिक समस्या तयार होते जर आपली जमाच नसेल तर खर्च कसाही करणार असेल तर जमा आणि खर्चाचा ताळेबंद म्हणतो आपल्या खिशात किती रक्कम येते समजा 100 रुपये येणार असेल तर तुम्ही 120 रुपये पर्यंत खर्च कराल खिशात 100 रुपये येणार आहेत आणि मी 300 रुपये खर्च करणार कसा करणार आहे? तर याची चाचपणी करावी लागते जमा आणि खर्चनंतर अस म्हणाल तुम्ही खात्रीने अंमलबजावणी करता का केली नाही आणि मी फक्त इथे नगरसेवकांची काम करण्यासाठी आलेलो आहे. त्यामुळे मी काही तुमच्या विरोधातला नाही याची एक स्पष्ट नोंद घ्यावी.

अनिल सावंत :-

धन्यवाद साहेब.

मा. आयुक्त :-

माझी सरकारने नियुक्त ह्या शहरातील काम करत असताना आपल्या सन्मा. सर्व सदस्यांनी सुचविलेली काम करण्यासाठीच केलेली आहे. त्यामुळे तुमची जी कळकळ आहे त्या कामाची मागची धडपड आहे तीच माझी पण आहे परंतु हे बघत असताना मला आयुक्त म्हणून हे ही बघण आवश्यक आहे की आपला जमा आणि खर्च याचा ताळमेळ लागतोय का आपल्याकडून आलेली लिस्ट प्रशासनामार्फत आलेली आहे का आणि पाटील साहेब आपण असा उल्लेख केला की सालाबादप्रमाणे चालत आलेले आहे ही दरवर्षी लिस्ट येते परंतु लिस्टच फायनल करायची असेल तर प्रशासनाची पण मत त्यात घेणे आवश्यक असते. जस आम्ही प्रत्येक गोषवारा आपल्याकडे पाठवतो आणि तो गोषवारा आपण करुन ठराव वाचतात जसा आमच्याकडून गोषवारा घेता तशी कामाची यादी घेणे अभिप्रेत होतं तर प्रशासनाने सुचविलेले नाही कुठल्याच इंजिनिअरला हे माहित नाही आयुक्ताला माहित नाही तर ती लिस्ट कशी प्रकट होते.

मा. महापौर :-

साहेब ही काम ह्या शहरातीलच आहेत शहराच्या बाहेरची काम दिलेली नाही आणि सन्मा. सर्व नगरसेवकांनी सुचविलेली काम त्यामध्ये घेतलेली आहेत. आता ह्यामध्ये ती काम करत असताना तुम्हाला असे वाटेल की पावसाळ्यामध्ये सांगितले कुठला नाल्याचे काम करा तर शक्यच नाही ना.

नाल्याचे काम होऊच शकत नाही. कारण आता वेळ फार कमी आहे दिवस कमी आहेत. म्हणून तुमची 2-3 महिने त्यातच जाणार आहेत. पण आता नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी किंवा स्वेच्छा निधीची जी काम आहेत ती प्रामुख्याने करण्यात यावी असा त्यांचा सगळ्यांचा आग्रह आहे. तर तुम्ही मला असे वाटते की त्याला काय फार मोठे बजेट जात आहे अस काही दिसत नाही. कारण वेळ पण फार कमी आहे टेंडर प्रोसिजर हे सर्व करताना वेळही आपला जात आहे असे काही दिसत नाही कारण वेळ पण फार कमी आहे. टेंडर प्रोसिजर हे सर्व करताना वेळही आपला जात आहे पण त्यांना एवढ तर वटेल नगरसेवकांना की आम्ही जे जनतेला सांगितलेले आहे की हे काम होणार आहेत तेवढ त्यांना समाधान होईल म्हणून माझ म्हणण आहे की तुम्ही ती काम सुरुवात करावी.

अनिल सावंत :-

धन्यवाद मॅडम आता दुसरा विषय होता. मागच्या मिटींगमध्ये संपूर्ण सभागृहाने विनंती केली होती. आपल्याला आणि आयुक्त साहेबांना सिक्युरीटीचा जो विषय झाला त्यामध्ये एका विषयाला जे सस्पेंशन केलेले आहे त्याचे निलंबन मागे घ्यावं असं सर्व सभागृहाची इच्छा होती माझी परत एकदा आयुक्त साहेबांना विनंती आहे आपण चौकशी केलेली असेलच तर शक्यतो त्या शिपायाने निलंबन लवकरात लवकर मागे घ्यावं. ह्या पूर्ण सभागृहाच्या भावना आहेत.

मा. महापौर :-

ठिक आहे. हो आपण सभागृहाला विचारले पण होते. ठराव करा.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने ऑलरेडी हा ठराव महापौर मॅडम झालेला आहे.

गिता जैन :-

मॅडम मला जेव्हा हे ॲटमॉसफेर कळाल तर मला असं वाटतं की कोणाचे ही निर्देश असु द्या पण तुम्हाला हा ठराव पास करुन घ्यायचा नाही आहे. पण मग तुम्ही वेगळा ठराव करु नये. ज्या विषयाला धरुन आपला जो ठराव आहे किंवा त्याला मंजूर करा गोषवारा आहे किंवा त्याला मंजूर करा किंवा नामंजूर करा एक स्ट्रेटअवे आता चर्चा करून फायदा नाही. हे आम्हालाही कळाले आहे कारण तुम्हाला मनात जरी माहिती असेल की हा चांगल्यासाठी आलेला ठराव आहे. पण काही मजबुरी तुमचीही असेल मला त्या बद्दल काही बोलायचे नाही. पण जे काही आहे त्याचे स्पष्ट चित्र वेळ घालविण्याविना काहीतर हे गोषवाराप्रमाणे तुम्ही मंजूर करत आहेत किंवा नामंजूर करत आहेत ते तरी स्ट्रेट सांगा ना. गोषवारा एका विषयाचा आहे तुम्ही दुसऱ्या विषयाचा ठराव करत आहेत हे योग्य नाही ना.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम गेल्या वेळेलाही याच विषयावरती विषयांतर झाले होतं आणि प्रत्येक सदस्याने आपआपली मत मांडली होती मग ते जुबेर भाई असतील बाकी इतर सर्व सदस्य असतील त्याच विषयाला घेऊन परत एकदा सांगेन की, तो विषय म्हणजे जो मी ठराव मांडलेला आहे त्यालाच आम्ही नामंजूर करतो. अजून दुसरं काय हवे आहे दुसर काही वेगळ मत व्हायचं काही कारण नाही.

गिता जैन :-

साहेब ठरावामध्ये आपला गोषवारा आहे की कन्सल्टंट पाहिजे. कन्सल्टंट फॉर स्लस्टर डेव्हलपमेंट तुम्हाला ते कन्सल्टंट पाहिजे तर यस नाही पाहिजे तर नो हे ठराव फक्त आपण काय दुसरं विषयच गोषवाऱ्यामध्ये विचारलेला नाही. तो विषयच घेतलेला नाही विषपत्रिकेवर जो ठराव तुम्ही करत आहात ते विषयपत्रिकेवर तो विषयच नाही. तुम्हाला ठराव तोच करावा लागेल जे विषयपत्रिकेवर आहे मग ते ठराव काय तुम्हाला मंजूर आहे किंवा नामंजूर आहे.

मा. महापौर :-

ते वाक्य नमुद करा त्याच्यामध्ये.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, कसं आहे जस आमदार मॅडम बोलल्या तुम्हाला ते करायचे आहे की नाही करायचे ते पहिला ठरवा. मॅडम आपल्याला करायचे आहे आणि हे आपल्याला पण करायची गरज नाही हे डी.सी. रुल जो आपला मंजूर झाला त्याच्यामध्ये दिलेले आहे. त्याच्यामध्ये क्लिअरकट म्हटलेले आहे की इस ॲप्लीकेशन फॉर ऑल कार्पोरेशन म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रातील कार्पोरेशनला योजना ही लागु करायची आहे आणि हे ॲप्लीकेबल आहे आणि मॅडम याच्यामध्ये असे कुठेही म्हटलेले नाही की तुम्ही कनसल्टंट अपॉईंट केला पाहिजे. याच्यामध्ये असे म्हटलेले आहे की आयुक्त साहेबांनी असिस्टंट कमिशनर अपॉईंट केला पाहिजे त्याच्यावरती डेप्युटी कमिशनर अपॉईंट केला पाहिजे हे असे क्लियरकट म्हटलेले आहे कुठेच म्हटलेले नाही की तुम्हाला कन्सल्टंट पाहिजे. मग काय गरज आहे कन्सल्टंट नेमायची? आणि दुसरं याच्यामध्ये आपले टाऊन प्लनिंग डिपार्टमेंट सक्षम आहे ना आणि जस मॅडम बोलतात की क्लस्टर डेव्हलपमेंट योजना लागु करायची आहे आम्हाला पण लागु करायची आहे. कालच आपल्या फडणवीस साहेबांनी मागच्या वेळेस सांगितले आहे की जुन्या मोडकळीस आलेल्या इमारती बदल हे आपल्याला करायचे आहे. मॅडम करायचे आहे आणि ह्या रुलमध्ये असे पण म्हटलेले आहे की कोणतीही सोसायटी कोणतीही फेडरेशन कोणतेही सोसायटीवाले तुमच्याकडे येऊन आयुक्तांना क्लस्टर योजनेबाबत प्रस्ताव सादर करु शकतात असे पण याच्यामध्ये लिहिलेले आहे. आम्ही संपूर्ण अभ्यास करुन आलो आहोत. हे बघा सगळी अंडरलाईन मारलेल्या आहेत तर ह्याच्यामध्ये कुठेही चुकीचे करत नाही. दुसरी गोष्ट ही क्लस्टर योजना राबविल्यानंतर आपल्याकडे अनेक फ्लॅट वाढतील फ्लॅट वाढले म्हणजे पॉप्युलेशन वाढणार आणि ते पॉप्युलशन जर वाढले तर ह्या शहरावरती काय इफेक्ट पडणार आहे याच्यासाठी आम्हाला इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट करायचा आहे म्हणजे पॉप्युलेशन वाढल्यानंतर त्या पॉप्युलेशनला आपण पाणी देऊ शकतो का? त्या पॉप्युलेशनला आपण रस्ते देऊ शकतो का? त्या पॉप्युलेशनचे एक आपण नाले करु शकतो का? तिथे आपण ट्राफीक समस्येसाठी त्याठिकाणी पार्किंग उपलब्ध करुन देऊ शकतो का? ह्याच्यासाठी इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट गरजेचे आहे. आम्ही तेच सांगतो की थोडासा इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट करा प्रशासनाने आम्हाला अहवाल सादर करा पाहिजे तर आपण त्यांना कन्सल्टंट अपॉईंट करु पण इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट तयार करणे आपल्याला गरजेचे आहे. त्याशिवाय आपल्याला आपल्या शहराची भौगोलिक परिस्थितीचा अंदाज येणार नाही. ह्या क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये किती एफ.एस.आय. वाढेल किती लोकांचे पॉप्युलेशन याच्यामध्ये भर पडणार आहे याची आपल्याला त्याची माहिती पाहिजे ना आणि म्हणून हा इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट केला पाहिजे अशी आमची प्रामाणिक धारणा आहे.

मा. महापौर :-

इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट किती दिवसामध्ये येईल?

गिता जैन :-

मॅडम आपल्याला हायर करायचा आहे हरकत नाही रितसर विषय आणा आणि तो विषय घ्या ना मी कुठे नाही सांगते करायचं आहे करावच लागेल आणि त्यांना असे वाटत असेल डी.सी. रुलमध्ये दिलं आहे हो दिलं आहे त्यांनाही माहित आहे की काय विषयासाठी आपण बोलतो. पेणकरपाडा डी.सी. रुलमध्ये नाहीच आहे. पेणकरपाडा जसं क्लस्टर शिवाय होऊ शकत नाही किंवा असे बरेच आपल्याकडे एरिया आहेत तिथे होऊ शकत नाही. फाईन तुमची इच्छा नाही आहे ते एरिया रिडेव्हलप करायची नका करु. पण तुम्ही दुसरा विषय त्यात टाकु नका ना. तुम्ही फक्त एवढ सांगा आम्हाला हे कन्सल्टंट नको. आम्हाला दुसरा कन्सल्टंट असेल तुम्ही आणा परत तो विषय आणि परत त्यासाठी तुम्ही मंजुरी घ्याना बहुमत आहे तुमचा काय प्रॉब्लेम आहे? पण आता जो विषय आहे त्या विषयाला धरुन येस या नो तर व्हायला पाहिजे ना. तुम्ही दुसरा विषय आज यात आणु शकत नाही ना.

गोषवाऱ्यावर जो विषय आहे त्या विषयावर तुमचे काय मत आहे नो तुम्हाला बहुमत आहे तुम्ही पास करुन घ्या ना. काय प्रॉब्लेम आहे? पण तुम्ही तिसरा विषय त्यात त्या विषयपत्रिकेवर नसताना तुम्ही टाकू शकत नाही माझे एवढच म्हणणे आहे.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम आपल्याला बिल्डींग बांधायची असेल तर आपल्याला तळमजला बांधावा लागतो. तो आपण तळमजला बांधत आहेत. आपण प्रस्ताव नामंजूर केलेला नाही. पण ह्या क्लस्टर योजनेसाठी आपल्याला इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्टची गरज आहे म्हणून आपण करतो. आमचा विरोध नाही प्रशासनाने आणलेल्या गोषवाऱ्यावरती ह्या विषयावरती आमचा विरोध नाही आहे. हे आम्ही आणखीन ठणकाऊन सांगतो. फक्त आमचे म्हणणे एवढेच आहे की ह्या शहरावरती काय इमपॅक्ट पडणार आहे याचा रिपोर्ट अगोदर तयार करावा आणि मग प्रस्ताव सादर करावा. आपण विरोध केला नाही मॅडम दुसरं काही म्हटलेलच नाही. तेच आपण घेतलेले आहे.

मा. महापौर :-

तुम्ही सांगा गायकवाड साहेब काय करायला पाहिजे? रिपोर्टच्या बदल सांगा.

गिता जैन :-

महापौर मॅडम मला प्रश्न विचारायचा आहे प्रशन हा आहे की एक बाजु तुम्ही सांगता की डी.सी. रुलमध्ये तुम्हाला दिलेले आहे म्हणजे तुम्हाला ते करणे भागच आहे. जर डी.सी. रुलमध्ये आहे आणि तुम्हाला करायचं आहे तर आय.ई.आर निगेटीव्ह आली की पॉझिटीव्ह आली तुम्ही डी.सी. रुलला नाकारु शकता का? मला हे सांगा तुम्ही डी.सी. रुल केअरफुल करणार का? आय.ई.आर नेगिटिव्ह आला तर? आय.ई.आर ने सांगितले की नाही तुमच्याकडे हे पॉसिबल नाही करायचं नाहीतर तुम्ही डी.सी. रुल बदलणार का? जे पूर्ण एम.एम.आर रिझनसाठी आलेला डी.सी. रुल तुम्ही बदलु शकता का? नाही ना मग हे काय मॅडम नाही करायचे मी परत तेच सांगते कशाला वेळ वाया घालवतात महासभेचा लोकांचा. तुमच्याकडे बहुमत आहे. तुम्ही ते नाकारु शकता ना. तुम्ही अननेसेसरी कशाला दुसरे तिसरे विषय टाकुन त्याला हे करत आहेत. एक बाजू तुम्ही सांगता डी.सी. रुलमध्ये आहे आणि दुसरी बाजू तुम्ही आय.ई.आर मागत आहेत. मग तुम्ही डी.सी. रुल नाकारणार का?

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम हा जो क्लस्टरचा विषय चालू आहे ठिक आहे आपसामध्ये ही चर्चा चालली आहे माझे फक्त एक निवेदन आहे की काही दिवसांपूर्वी क्लस्टरचा एक स्थायी समितीच्या दालनामध्ये आपण एक प्रेझेंटेशन बघितले होते. आपण सुध्दा होते आणि आयुक्त सुध्दा होते मला वाटते गायकवाड साहेब बसले होते आणि त्या बैठकीमध्ये गायकवाड साहेबांनी ठाण्याचे काहीतरी त्यांचे जे एक्सपेरियन्स आहे ते आपण सर्वांना त्या कमिटीमध्ये त्यांना समजून सांगितले होते. तर माझे एक असे निवेदन आहे की आपसामध्ये करायचे नाही करायचे होणार नाही होणार काय करायचं तर त्या ऐवजी गायकवाड साहेबांना याबद्दल भरपूर काही नॉलेज आहे. ठाणेमध्ये त्यांनी जे केलेले आहे मग यामध्ये आपल्याला पुढे कसे जाता येईल लवकरात लवकर कारण बघा क्लस्टर हा डेव्हलपमेंट मिरा भाईंदर शहरासाठी खुप गरजेच आहे आणि हे ऑलरेडी डी.सी. रुलमध्ये प्रोव्हीजन आहे. फक्त आपल्याला ह्या क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी पुढे कस जायचं आहे कुठल्या एजन्सी नेमायची आहे कुठला रिपोर्ट पहिला लागते त्याच्यासाठी काय प्रोसिजर आहे ते जर आपल्याला गायकवाड साहेब किंवा टाऊन प्लानिंगचे जे काही असतील नॉलेज ज्यांना आहे त्यांनी जर सभागृहाला समजून सांगितलं तर सर्वांना कळेल. हे सांगतात डी.सी. रुलमध्ये प्रोव्हिजन आहे करावच लागेल. आपले पाटील साहेब सांगतात की, त्याच्यासाठी रिपोर्ट लागेल भौगोलिक परिस्थितीचा नेमक याच्यामध्ये आपल्याला करायचं आहे नाही करायचं करण गरजेचे आहे नाही गरजेचे आहे त्याचा काहीतरी खुलासा प्रशासन किंवा जे नॉलेजेबल पर्सन आहेत त्यांनी तरी द्यावं. जेणेकरुन आम्ही बाकीचे जे सदस्य आहेत त्यांना तरी माहिति पडू

द्या की डिसीजन घ्यायचा की नाही घ्यायचा. माझ म्हणणे आहे की दिड कोटीचा विषय नाही. विषय हा आहे की शहरासाठी क्लस्टर डेव्हलपमेंट किती गरजेचे आहे याचा अभ्यास जर आपण सर्वांनी केला असेल मिरा भाईंदर शहराचे डेव्हलपमेंटसाठी तर विषय दिढ कोटीचा नाही 5 कोटी जरी लागले तरी आपण देऊ. पण त्याच्यासाठी आपल्याला थोडी एक माहिती प्रशासनाने जर दिली तर सभागृह चांगले डिसीजन घेऊ शकते. माझे एक निवेदन राहिल गायकवाड साहेब आपण जर ठाण्यामध्ये पूर्ण क्लस्टर डेव्हलपमेंटचा आपण एवढा मोठा विषय हाताळलेला आहे तर थोडी आपल्या सभागृहाला माहिती द्या त्याबद्दल.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम पिछली बार भी इस विषय के उपर स्पष्टीकरण दिया था वापीस से सभी सदस्यो को देना चाहूँना की जीस तरीके से बताया गया था क्लस्टर करना है नही करना है उसके उपर जोर दिया जा रहा है हालाकी डी.सी. रुल के हिसाब से आज भी आप क्लस्टर पे जा सकते हो ऐसा कोई जरुरी नही है की यह होने के बाद ही क्लस्टर होगा यह पहिले आप सभी को क्लिअर करना चाहता हूँ| दुसरा यह जो सर्व्हे होनेवाला है जिसके लिए हम अपॉईमेंट करनेवाले है उसमें दो प्रकार के विषय थे पहिला प्रकार का यह विषय था की क्लस्टर को कन्सल्टंटसी को अपॉईंट करना जिसके लिए देढ करोड रुपया था| उसके बाद में और क्या खर्चा लगनेवाला था वो जो जानकारी हम मांग रहे थे लास्ट टाईम भी वो जानकारी नही मिली थी तो सावंत साहबने दो बार सवाल किए थे की उपमहापौर ने सवाल खडे किए वो जवाब मिले की नही मिले में आज भी कह रहा हूँ की वे जवाब मुझे नही मिले| बार बार यह सभागृह में यह विषय उठाया जा रहा है की आपको करना है की नही करना है यह गोषवारा आया है हा या ना बोलो क्लस्टर के उपर यह विषय हे ही नही क्लस्टर में जोड के साथ और अपनी होशआवाज में जवाब देता हूँ की क्लस्टर आज भी मिरा भाईंदर में लागु है| वो जो सर्व्हे आनेवाला है उसके माध्यम से सिर्फ हमें रेडिमेड जानकारी के लिए उपयोग में लाया जा सकता है| जिस तरीके से धृवकिशोर पाटीलजीने कहाँ की पहिला माला बांधने के लिए निचे ग्राऊंड में और एक तहेतक जाऊंगा ग्राऊंड नही में यह कहूँगा की उसके पीलर उसके पिलर खडे करने चाहिए उसके लिए यह जो हम आय.आर के रिपोर्ट माँग रहे है वह बहुत ही जरुरी है की वह रिपोर्ट आने से हमारे इंफ्रास्ट्रक्चर पे कितना लोड गिरेगा की नही गिरेगा वो जानकारी के तौर पे सदस्य महोदयजीने कहाँ की अगर यह नेगेटिव्ह आयी तो क्या हम क्लस्टर करेंगे की नही करेंगे तो क्लस्टर तो ऑलरेडी चालू है| क्लस्टर ऑलरेडी चालु है अगर उसमें कुछ नेगेटिव्ह रिपोर्ट आती है तो हम प्रशासन के पास जाऐंगे और कहेंगे की हमारे शहर में दुविधा है उसके बारे में हमें कुछ उपाय दिजीए|

सुरेश खंडेलवाल :-

उपमहापौर साहेब यही विषय ऐसा है की आजतक मिरा भाईंदर में क्लस्टर से कौनसी बिल्डींग पे कहाँ पे लागु हुआ में आपको बताता हूँ में यही प्रशासन से समजना चाहता हूँ की मिरा भाईंदर के अंदर क्लस्टर कहा शुरु हुआ, आजतक वो शुरु क्यों नही हो पाया उसके लिए थोडासा यदी सब सभागृह को नॉलेज मिलेगा तो थोडा अच्छा होगा ना| में तो यह चाहता हूँ मुझे उसकी थोडी नॉलेज चाहिए|

मा. उपमहापौर :-

सदस्य महोदय में नॉलेज देने की बात नही कर रहा हूँ वो देना चाहिए और मिलना भी चाहिए| पहिला जो मेरा जवाब यह था उसपे बार बार यह सवाल उठाया जा रहा है क्लस्टर करना है की नही करना है| क्लस्टर ऑलरेडी चालू है नियम के मुताबीक और वो विकासक जो भी होगा जो भी विकासक काम करेगा उसको अपने खर्च से अपने प्रेझेंटेशन के हिसाब से टाऊन प्लानिंग में सबमिट करना है और क्लस्टर से वहाँ से अनुमती लेनी है, यह नियम है|

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम मी फक्त चार ओळी वाचतो whenever there is a no u.r.p. made by commissioner or where ever there is a no U.R.S floted by the commissioner over one or more you or sis for under U.R.P. made by commissioner any private promoter mhada co.op.housing society fidration of occupy etc. may approach commissioner with concept of owners as stake holder of 15 % any area requiring urban or implementation u.r.s. मॅडम क्लिअर कट म्हटलेले आहे की तुम्हाला काही गरज नाही. तुम्ही सोसायटीवाले येऊन प्रपोजल सबमिट करा आणि जर कमिशनरला वाटलं तर तुम्ही क्लस्टर देऊ शकता मॅडम मला सांगा जर प्रशासनाने व्यवस्थित अभ्यास करुन आम्हाला गोषवारा दिला आहे तर आमचे पण काम आहे आम्ही अभ्यास करायला पाहिजे ना. आम्ही पण सुशिक्षित नगरसेवक आहेत ना. ते आमचे काम आहे म्हणून आम्ही ते वाचले मॅडम. इथे काय गरजेचे नाही आणि जरी समजा प्रशासनाला पाहिजे असेल तर काही हरकत नाही. परंतु जे लिहिले आहे ते आम्ही सांगतो. आयुक्त साहेबांच्या गोषवाऱ्यावरती आमचा विरोध नाही पुन्हा एकदा आम्ही ठणकाऊन सांगतो परंतु याच्यामध्ये दिलेले आहे की तुम्हाला क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी कोणतीही सोसायटी कोणतीही फेडरेशन येऊन तुम्हाला प्रपोजल सबमिट करु शकते. कुठे पण म्हटलेले नाही की ह्या अख्ख्या 4.8 मध्ये दिलेले आहे मॅडम कुठेच नाही. तरी सुध्दा प्रशासनाचा आग्रह असेल तर तुम्ही सगळ्यांनी निर्णय घ्या. माझ काम होतं तुमच्या निदर्शनास आणून द्यायचं ते मी निदर्शनास आणून दिलेले आहे ह्याच्यामध्ये कुठेही कन्सल्टंट नेमायची अजिबात गरज नाही.

मा. महापौर :-

तस ठरावात मांडा ना.

धृवकिशोर पाटील :-

मांडल ना मॅडम.

गिता जैन :-

मी तेच सांगत आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम ठिक आहे पाटील साहेब चांगले बोलले की क्लस्टरसाठी कुठल्याही आपल्याला याच्यासाठी गरज नाही कशासाठी हा गोषवारा प्रशासनाने दिलेला आहे कारण की मी गेल्या मिटींगमध्ये नव्हतो एक सदस्य म्हणून मी आपल्याला विनंती करतो की मला थोडीशी माहिती याच्यामध्ये सर्वांना पाहिजे तर ठिक आहे पण मला एक माहिती अशी हवी आहे की क्लस्टरसाठी जर आपण डायरेक्ट प्रपोजल पुटअप करु शकतो ज्याला पाहिजे ते करु शकतो. मिरा भाईंदर शहरामध्ये आजपर्यंत एक प्रपोजल मी क्लस्टरचे अजूनपर्यंत बघितले नाही. तर काय कारण आहे की प्रशासनाने हा गोषवारा आपल्याला दिड कोटीचा का दिला आहे जर थोड दोन मिनिटे खुलासा जर केला तर आपल्याला पण माहिती पडेल की प्रशासन खोट करते की काय करते. कशासाठी दिड कोटी आपण लावतो. काय गरज आहे शहरासाठी ह्या दिड कोटीची. पुढे जर आपल्याला झोपडपट्टीमध्ये आता दरोगा पांडे आहे त्यांना झोपडपट्टीमध्ये जर क्लस्टर करायचे असेल किंवा काय करायचे असेल सर्वांना माहिती होऊ द्या मॅडम. मल काय हे समजत नाही की आपण प्रशासनाला का उत्तर द्यायला आपण भाग पाडत नाही?

धृवकिशोर पाटील :-

मॅडम याच्यामध्ये लिहिलेले आहे क्लस्टर स्कीमसाठी मिनिमम ऐरिया 3 हजार स्क्वेअर मीटर इन नॉन कंजेस्टेड एरिया आणि 4 हजार स्क्वेअर मीटर इन कंजेस्टेड एरिया म्हणजे 4 हजार स्क्वेअर मीटरचा प्लॉट असेल तर तुम्ही क्लस्टर डेव्हलपमेंट करु शकतात. कंजेस्टेड एरियामध्ये आणि नॉन

कंजेस्टेड एरियामध्ये 10 हजार स्क्वेअर मीटर प्लॉट पाहिजे. मॅडम याच्यामध्ये क्लिअर कट लिहलेले आहे आणि ज्याला क्लस्टर एरिया करायची असते तो प्रस्ताव सादर करतो आणि असे काही डिसीजन असतात.

मा. महापौर :-

आयुक्त् महोदय खुलासा करा. सर्वांनी खाली बसा आणि प्रशासनाला खुलासा करु द्या.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम असं आहे ग्रीन ॲशन फेडरेशनचा मी अध्यक्ष आहे. 150 बिल्डींगच ॲसेशन मी चालवतो आज त्या संपूर्ण मी ज्या एरियातून आलेलो आहे त्याठिकाणी 30-35 वर्षाच्या वरील बिल्डींग आहेत आणि बिल्डींगला आपल्या नोटिसा जात आहेत की तुमची बिल्डींग डॅमेज करावी लागेल. सर्व सोसायटीचे लोक आमच्याकडे येतात आम्ही त्याला उत्तर देऊ शकत नाही. त्याच्या बद्दल मी गायकवाड साहेबांना भेटलेलो आहे क्लस्टर डेव्हलपमेंटच्या बाबतीमध्ये आमदार मॅडमला ही भेटलो आहे चर्चा करुन आपल्या सोसायटीला अजून त्याचे उत्तर कोणाला मिळत नाही. नगरविकास विभागामध्ये गेलो तरी देखील तिकडे आम्हाला अजून उत्तर मिळत नाही. त्या सोसायटीकडे कोणीतरी बिल्डर येतात त्यांना काहीतरी सांगतात हा खर्च येईल तो खर्च येईल परंतु 5 बिल्डींग, 6 बिल्डींग, 7 बिल्डींग, 8 बिल्डींग किती एरिया आहे त्याचा संपूर्ण खुलासा जर महासभे मिळाला तर आपले ह्या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेत त्याचे एक ऑफिस खोलून क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये जेवढ्या सोसायट्या आहेत ज्यांना रिडेव्हलपमेंटमध्ये यायचे आहे. त्याची संपूर्ण माहिती आपल्या शहरामधून महानगरपालिकेतून मिळायला पाहिजे आणि ह्याबाबतीमध्ये माहिती जसे खंडेवालजी बोलले तसे माझ्या माहितीप्रमाणे गायकवाड साहेबांनी ह्याबाबतीमध्ये संपूर्ण माहिती दिली पाहिजे कारण त्यांनी ठाणेमध्ये हे काम केलेले आहे.

मारुती गायकवाड (मा. उपायुक्त) :-

सन्मा. महापौर महोदय, सन्मा. आयुक्त् महोदय, सन्मा. सभागृह ॲक्च्युअली सर्व सन्मा. सदस्यांनी बरेच प्रश्न उपस्थित केलेत नेमके कुठल्या कुठल्या प्रशनाचे उत्त्र द्यायचे मीच कन्फ्युज झालो आहे. ॲक्च्युअली हा जो आपण प्रस्ताव आणलेला आहे तो कन्सल्टंटने नेमण्यासाठी दीड कोटी रुपये खर्च आहे. अपेक्षित खर्च आहे त्या खर्चासाठी प्रशासकीय वित्तीय मान्यता आपणाला पाहिजे म्हणून आम्ही हा प्रस्ताव सन्मा. सभागृहासमोर आणलेला आहे. ह्यामुळे काय होणार आहे हा कन्सल्टंट आपल्या शहराचा पूर्ण सर्व्हे करुन आपल्या शहरामध्ये कुठल्या कुठल्या ठिकाणी आपण क्लस्टर इम्पलीमेंट करु शकतो. मग पेणकरपाडा असेल किंवा जुना आपला भाईंदर गावठण असेल किंवा कुठलाही एरिया असेल मिरा भाईंदर शहरातील कुठल्या एरियामध्ये आपण क्लस्टर इम्पलीमेंट करु शकतो हे वेगवेगळे जे त्यांचे टेक्नीक्स आहेत आणि आजच्या गोषवाऱ्यामध्ये जे मुद्दे आम्ही मांडलेले आहेत त्या मुद्द्याच्या अनुषंगाने तो ह्या सर्व शहराचा सर्व्हे करेल आणि आपल्या शहरामध्ये कोणत्या कोणत्या ठिकाणी क्लस्टर इम्पलीमेंट करु शकतो हे आपल्या सभागृहासमोर आलेले नंतर सभागृहाची मान्यता घेतल्यानंतर मग ते शासनाला जाईल. समजा आपल्या मिरा भाईंदरमध्ये 10 क्लस्टर होतील ही माहिती आपण सभागृहासमोर आणू. सभागृह म्हणेल की ह्या 10 क्लस्टरपैकी फक्त् आता 3 क्लस्टर करायची आहे म्हणजे 3 क्लस्टरपैकी फक्त आता 3 क्लस्टर करायची आहे. म्हणजे 3 क्लस्टरला सभागृहाची मान्यता घेऊन आपण शासनाकडे पाठवू. शासनाची मान्यता झाल्यानंतर मग ते क्लस्टर इम्पलीमेंट होईल मग त्या ठिकाणी पुढची स्टेच चालू होईल. जसे सन्मा. उपमहापौर साहेब म्हटले की ह्या दीढ कोटीमध्ये तुमचे सगळे होणार आहे का अजून खर्च होणार आहे तो खर्च नंतर होतो समजा आता आपला क्लस्टर क्रमांक 1 नेमायचा आहे आपल्याला इम्पलीमेंट करायचा आहे समजा काशिमिरामध्ये मग त्याठिकाणचा सर्व्हे मग ते लिडार सर्व्हे आहे बायोमॅट्रीक सर्व्हे असतील तिथल्या लोकांचा थम इम्प्रेशन असेल त्यांचा आयडेंटी कार्ड बनवायच असेल, स्मार्ट कॉ

बनवायच असेल त्यांची पात्रता अपात्रता यादी आपल्याला फायनल करायची असेल तर सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील साहेब केलेले की आयुक्तांनी सहा. आयुक्त किंवा उपायुक्त दर्जाचा अधिकारी नेमायचा आणि ते इम्पलीमेंट करायचा आहे. सर ती सेकंड स्टेप आहे समजा काशिमिरामध्ये आपल्याला क्लस्टर डेव्हलप करायचा आहे तर तिथल्या एरियाचा सर्व्हे करणे, तिथल्या एरियाचे बायोमॅट्रीक करणे त्या घरांचे मोजमाप घेणे हे सगळे झाल्यानंतर समजा त्याठिकाणी आता 10 हजार लोकांच आपण आयडेंटिफिकेशन केलं 10 हजार स्ट्रक्चरल आहे, मग त्या 10 हजार स्ट्रक्चरमध्ये किती लोक पात्र होणार आहेत लाभ घेण्यासाठी किती लोक पात्र होणार आहेत लाभ घेण्यासाठी किती लोक अपात्र होणार लाभ घेण्यासाठी त्यासाठी सहा. आयुक्त, उपआयुक्त दर्जाचा अधिकारी नेमायचा आहेत त्या लोकांचा समजा आम्ही पहिली यादी पब्लिश करणार तिथल्या घरांचा सर्व्हे करणार लोकांचे बायोमॅट्रीक करणार, 10 हजार लोकांची यादी पब्लीश करणार की ज्या लोकांची आम्ही प्राथमिक यादी पब्लीश केलेली आहे मग काही लोक काय म्हणणार की आम्हाला ऑब्जेक्शन घ्यायचा आहे. समजा सन्मा. सदस्य खंडेलवाल साहेब बोलले की माझे ऑब्जेक्शन आहे असे समजा 1000 ऑब्जेक्शन येतील. 10 हजार ऑब्जेक्शन येतील त्या ऑब्जेक्शनला हेअरींग घेण्यासाठी सहा. आयुक्त दर्जाचा अधिकारी नेमायचा आहे आणि त्याने रिझल्ट दिल्यानंतर त्यांच्या रिझल्टवरती जर कोणाचे ऑब्जेक्शन असेल तर ते उपआयुक्त हेअरींग होईल आणि उपआयुक्त फायनल करेल ती पात्र यादी आणि अपात्र यादी फायनल करण्याची सहा. आयुक्त उपआयुक्त दर्जाचे अधिकारी त्याठिकाणी नेमायचे आहेत. मग आता जो कन्सल्टंट नेमणार आहोत ते आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये किती यू.आर.एस. आपण इम्पलीमेंट करु शकतो. आपला प्रोटेंशन किती आहे, किती लोकांना लाभ देऊ शकतो. हे ॲसेस करण्यासाठी आपण ह्या लोकांना आता नेमत आहोत पाटील साहेब म्हटले दोन बिल्डींग जातील, तीन बिल्डींग जातील, साहेब तुम्हीच आता वाचले की किमान 4 हजार स्क्वेअर मीटर पाहिजे काही ठिकाणी कसे असते समजा शासनाची जमीन आहे महसूलची जमीन आहे, कलेक्टर लँड आहे त्याठिकाणी आपण क्लस्टर करु शकतो पण प्रायव्हेट माणूस क्लस्टर करणार का महसूलची परमिशन घ्यायला पाहिजे, महसूलची एन.ओ.सी. घ्यायला पाहिजे. समजा तिथे एखादा प्रायव्हेट बिल्डर त्याठिकाणी आला समजा त्याठिकाणी मी आलो तिथे मी डेव्हलप करेल, मग माझा प्रॉफीट कसा होईल त्या लोकांना घर द्यायचे, किती द्यायची ते नियमाप्रमाणे 300 स्क्वेअर फुटची घर प्रत्येकाला फुकट मिळेल ह्यामध्ये एस.आर.ए. कन्सीडर डिफरन्स आहे. दोन डिफरन्स सांगतो एस.आर.ए. मध्ये काय होते समजा जी प्लस 1 ची झोपडपट्टी आहे तर खालच्या लोकांनाच घर मिळते वरच्या व्यक्तीला घर मिळत नाही. मग क्लस्टरमध्ये झोपडपट्टी बिल्डींग ही कन्सीडर केली जाते. आपल्या मिरा भाईंदर महापालिकेमध्ये मोठी एक सुध्दा नाही म्हणजे आपण ज्या स्लम आहेत त्या आपण स्लम म्हणतो पण कायदेशीर ते स्ल्म नाहीत ते इनक्रोचमेंट आहेत किंवा इललिगल कन्स्ट्रक्शन आहेत मग त्या ठिकाणच्या लोकांना एस.आर.ए पेक्षा क्लस्टर त्याठिकाणी आलं. समजा देवलनगरमध्ये क्लस्टर आलं तर देवल नगरमधल्या फक्त खालच्या लोकांना घर नाही मिळणार, समजा जी प्लस 1 झोपडपट्टी आहे त्याच्या वरच्या पण लोकांना घर मिळणार हा क्लस्टरचा फायदा आहे. एस.आर.ए मध्ये आपल्याला 280 स्क्वेअर फुटाचे घरे मिळतात. क्लस्टरमध्ये 324 स्क्वेअर फुटाचे घर मिळणार आहे. फक्त एवढेच मला विनंती करायची आहे आता जे आपण कन्सलटंट नेमतो तो कन्सलटंट फक्त् आपल्या शहरामध्ये किती आपण इम्पलीमेंट करु शकतो आणि ही सगळी वस्तुस्थिती मा. महासभेच्या समोर आणायची आहे. असे धृवकिशोर पाटील साहेबांना माझी विनंती आहे त्यांना इनफॅक्ट असेसमेंट सर्व्हे करायचा असेल तसा बर्डन नाही. कारण आम्ही ठाणेमध्ये पण इम्पलीमेंट केलेले आहे. ठाणेमध्ये दोन बिल्डींगची पाया भरणी झाली. ठाणेमध्ये काम सुध्दा चालू केले सिडकोने, किसन नगरमध्ये क्लस्टरचं काम चालू आहे. सिडकोची यादी फायनल झाली, पात्र अपात्र यादी लोकांची फायनल झाली. तिथे क्लस्टरचे काम सुध्दा चालू झालं मग त्याठिकाणी इमपॅक्ट

असेसमेंट सर्व्हे फायनल केलेले नाही. इमपॅक्ट असेसमेंट सर्व्हे के.डी.सी. मध्ये सुध्दा चालू नाही. पण इथल्या सन्मा. सदस्यांची मागणी असेल तर इमपॅक्ट असेसमेंट सर्व्हे सुध्दा आपण करु पण माझी विनंती आहे की ह्यामध्ये इनव्हॉल करु नका, इमपॅक्ट असेसमेंट सर्व्हेसाठी आपण दुसरा कन्सलटंट नेमू पण आपला क्लस्टरचे काम चालू होऊ द्या आणि आजचा विषय मंजूर व्हावा अशी माझी विनंती आहे.

रिटा शाह :-

मॅडम माझे दोन प्रश्न आहेत सरकारी जमिन सी.आर.झेड जी जमिनी आहेत त्याला क्लस्टर लागू होतील. एस.आर.ए. लागणार तिथे क्लस्टर लागणार. क्लस्टर माझ्या हिशोबाने ह्या जागेवर लागायला पाहिजे की ज्या बिल्डींग ऑलरेडी आर झोनमध्ये बांधलेल्या आहेत. मोडकळीस आलेल्या आहेत आणि त्यांनी ऑलरेडी जास्त एफ.एस.आय. वापरुन घेतलेला आहे. म्हणून आजूबाजूच्या सर्व बिल्डींग ज्या अशाचप्रकारे मोडकळीस आलेल्या आहेत त्यांना तोडावे लागेल आणि त्यांनी एफ.एस.आय. जास्त वापरलेला आहेत. त्या सर्व बिल्डींगला क्लब करुन ते प्लान एकत्र सादर करणे ते क्लस्टर झाले आणि ते क्लस्टर रुजू करायचे काम माझ्या हिशोबाने ते बिल्डरचे काम आहे ज्या माणसाने 10-15 बिल्डींग 10-12 बिल्डींग क्लस्टर करुन तुमच्याकडे केले, आता 4 हजाराचा आकडा धृवकिशोर पाटील यांनी सांगितला त्या हिशोबाने त्या बिल्डरने ते आपल्याकडे सुपूर्त करायचे ते प्लान टाकायला पाहिजे त्या प्लानच्या हिशोबाने आपला नगररचना विभाग त्याला स्टेटला पाठवणार स्टेट त्याला क्लस्टर मंजूर होणार की नाही अगर त्याची शहानिशा करणार ते शहानिशा करण्याकरिता ते बिल्डरला पत्र पाठवणार की तुम्ही ह्या ह्या गोष्टी करुन घ्या आणि त्या आम्हाला सुपुर्त करा त्या हिशोबाने स्टेट त्यांना सँक्शन देणार तर क्लस्टर आपण मंजूर करु आणि ज्या सरकारी जमिन आहेत त्याच्यामध्ये पहिले एस.आर.ए. स्कीम आपल्याला मंजूर करुन घ्यावी लागेल कारण मिरा भाईंदरचे एस.आर.ए स्कीच आहेच नाही. माझ्या हिशोबाने जोपर्यंत मला नॉलेज आहे एस.आर.ए. स्कीम आपल्याला लागू झालेली नाही म्हणून इथे क्लस्टर करायचा प्रश्नच येत नाही. एस.आर.ए स्कीम झाल्यानंतर आपण क्लस्टर करु शकतो. एखादी झोपडपट्टीच्या जागेवर 5 हजार झोपडपट्या आहेत तिथे फक्त 2 हजार लोक तयार झाले आणि 3 हजार लोक ऑब्जेक्शन घेतात मग तिथे आपण कसे क्लस्टर करणार? ते 5 च्या 5 हजार लोक मानायला पाहिजे त्या वस्तुला अशी ही फक्त सोपी गोष्ट आहे कारण हे कोणाला 12 बिल्डींग घ्यायच्या की 100 बिल्डींग घ्यायच्या कुठल्या बिल्डरला तिथे क्लस्टर करायच असेल तर पूर्ण त्यांनी आराखडा तयार करुन नगररचना विभागाकडे सुपूर्त करायचं नगररचना विभाग त्याचा पाठपुरावा करुन स्टेटला पाठवेल आणि स्टेट त्याच्यासाठी काय काय लागणार हे बिल्डरला पाठवणार आणि बिल्डरने सर्व प्रक्रिया पूर्ण करुन तरच पाठवेल स्टेटला तर स्टेट त्याला मंजूर करुन आपल्या नगररचना विभागाला पाठवू त्यानंतर क्लस्टर मंजूर होणार. एवढी सोपी गोष्ट आहे आणि क्लस्टर आजपासून नाही लागू आहे आपल्याकडे, क्लस्टर लागू होऊन खूप वर्ष झाली आतापर्यंत एकही बिल्डर क्लस्टरमध्ये गेलेला नाही. आता प्रभाग निधी आणि नगरसेवक निधीसाठी असा निर्माण झालेला आहे की आपल्याकडे खर्च खूप झालेला आहे आणि पैसे नाहीत मग आपण हा खर्च बिल्डरने करायचा आहे तो खर्च आपण का करायचा कन्सलटंट नेमून माझा विरोध आहे त्याला.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम जसे रिटा शाहजीने जो प्रश्न और हसमुख भाईने कहाँ था उसी का उत्तर दे रहे है| मैं यह प्रशासन के माध्यम से सुनना चाहता हूँ की वर्तमान में इस शहर में क्लस्टर योजना लागू है की नही है| अगर लागू है तो कितने एरिया के उपर लागू है किस क्षेत्र पे लागू हो सकता है उसके क्या नियम है| यह प्रश्न का उत्तर हो जाएगा तो सबको मेरे को लगता है की समाधानकारक उत्तर मिल जाएगा उस उत्तर को न्याय देकर के होना है की, नही होना है, उसको मिसगाईड किया जा रहा

है क्लस्टर योजना लागू है वर्तमान मे है तो किस तरीके से लागू है कौन ॲप्लीकेबल है उसके लिए कौन ॲप्लीकेशन कर सकता उसका उत्तर दे दिजीए|

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मी परत पुन्हा एकदा सांगतो की मी ठराव ऑलरेडी वाचलेला आहे त्यामध्ये माझे काही दुमत नाही.

मा. महापौर :-

आपला ठराव आहे का की ह्या ठरावाला आपली मंजुरी आहे.

गिता जैन :-

मॅडम मी परत सांगते जे विषय विषयपत्रिकेवर नाही त्यावर ठराव होऊ शकत नाही.

मा. महापौर :-

मग तुम्ही तसा तुमचा ठराव मांडा.

गिता जैन :-

मी पण सांगते तुमचा विषय विषयपत्रिकेवर नाही तुम्ही रितसर विषय आणा.

प्रशांत दळवी :-

जो ठराव वाचला आहे त्या विषयाच्या अनुषंगानेच तो वाचला गेलेला आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम कसा होऊ शकेल तुम्ही मला सांगा. विषय विषयपत्रिकेवर नाही. तुम्ही त्यावर कसे ठराव मांडू शकता.

भगवती शर्मा :-

महापौर मॅडम, तो प्रशासनाचा विषय आहे तो विषय अनुकूल आहे की नाही आहे. प्रशासन कारवाई करेल सभागृहाने आपले मत मांडलेलं आहे, ठराव केलेला आहे.

सुरेश खंडेलवाल :-

ठराव काही ही होऊ द्या, फक्त माझा एक निवेदन आहे की बी.एस.यू.पी. ची योजना तुमच्या वॉर्डमध्ये आहे तुम्हाला सर्व माहिती आहे मी मोठमोठ्या बिल्डरच्या 4 हजार मीटरवर प्लॉटवर जे क्लस्टर करायचे ते आम्ही करु. आमचा विषय असा आहे की जी झोपडपट्टी आहे मिरा भाईंदर शहरामध्ये एस.आर.ए नाही. मिरा भाईंदरमध्ये बी.एस.यू.पी. संपलेली आहे तर आपल्याला जे पूर्ण शहराच्या चारही टोकावर जी झोपडपट्टी आहे तिथे आपल्याला क्लस्टर करायचे की नाही करायचे आहे. मला एक गोष्ट समजत नाही की सोपस काम आहे 4 हजार मिटरचा आपल्याला कन्सलटंट जे आहे ते नेमण्यासाठी आपण कशासाठी कन्सलटंट नेमतो आहे की क्लस्टर आपण करोडो रुपयाचे त्याच्यामध्ये ठराव करतो इथे बसून महापौर मॅडम रोडचे रस्तेच्या याचे त्याचे आपली एवढी मोठी महानगरपालिका आणि दिड कोटीसाठी फक्त आपण काय करतो की आपण एक कन्सलटन्ट नेमायचा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे आणि हे प्रस्ताव महापौर मॅडम तुम्ही पूर्ण ठाण्यामध्ये स्टडी करा, दुसऱ्या ठिकाणी स्टडी करा. सर्वांनी ह्याला कन्सलटंट नेमलेले आहेत. आपण फक्त कन्सलटंट नेमण्यासाठी एवढा आपला वादविवाद चालू आहे. माझे म्हणणं पर्सनली असे आहे की आपल्याला मिरा भाईंदर शहराला झोपडपट्टीच्या लोकांना बेनिफिट द्यायचे असेल तर आपल्याला लवरकात लवकर कन्सलटंट नेमून ह्या कामाला आपल्याला गती द्यावी लागेल कारण की गायकवाड साहेब ठाण्याला त्याला 8 वर्ष लागली ह्या प्रोसिजरला पूर्ण करायला आणि आपल्याला गायकवाड सारखे अधिकारी मिरा भाईंदर आपल्या इथे आहेत त्यांनी क्लस्टरमध्ये एवढी स्टडी केलेली आहे तर आपल्याला कन्सलटंट नेमून लवकरात लवकर क्लस्टरची जी प्रक्रिया आहे ती चालू करावी असे माझे व्यक्तीगत मत आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम मी फक्त एवढेच सांगू इच्छिते जर सत्ताधारी पक्षाला किंवा आपल्याला गरिबाचे हित मनात असेल आणि त्या झोपडपट्टीचा फायदा करायचा असेल जे झोपडपट्टीवर ते घर बांधून राहतात जर त्यांचा फायदा करायचा असेल तर नक्कीच तुम्ही हा ठराव पास करणार. जर तुम्हाला त्या गरिबांची काहीच पडलेली नाहीतर ते साबीत करायला तुम्ही हे दुसरा ठराव करणार. आता तुम्ही विचार करुन घ्या सत्ताधाऱ्याने की ते झोपडपट्टीवाल्यांचे भले व्हायला पाहिजे की नाही व्हायला पाहिजे.

धृवकिशोर पाटील :-

ब्लॅकमेल करने का तो कितना करने का लिमीट तो होनी चाहिए की ह्याच्यामध्ये लिहिलेले आहे. सेंटर गर्व्हमेंट किंवा स्टेट गर्व्हमेंटची जमिन असेल त्याच्यावर कन्सलटंट नेमू शकतात.

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

आजपर्यंत मिरा भाईंदर शहरामध्ये एकही क्लस्टर डेव्हलप झालेला नाही आज जर मिरा भाईंदरमध्ये कन्झेस्टेड झोन डिक्लेअर नाही आणि आता क्लस्टर चालू होत तर आपण याच्यामध्ये माझे निवेदन आहे आपल्याला बी.एस.यू.पी योजनेसारखे मिरा भाईंदर शहरामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंट चालू करायचे असेल तर लवकरात लवकर जेवढ्या झोपडपट्ट्याचाही टोकाला आहेत. तिथे आपल्याला बिल्डींग बांधून त्याला घर द्यायचे असतील तर आपल्याला एक कन्सलटंट नेमणे गरजेचे आहे. जिथपर्यंत रिपोर्ट येणार नाही, काहीच होणार नाही. फक्त आपण दिढ कोटीसाठी कोणाला द्यायचा काम द्यायचा ती वेगळी गोष्ट आहे पण प्रशासन आपल्याला गोषवारा सादर करतो त्यांना माहिती आहे की मिरा भाईंदरमध्ये विदाऊट कन्सलटंट क्लस्टर आपण चालू करू शकत नाही आणि मला पाटील साहेब आणि कोणी जर बोलले की क्लस्टरमध्ये झोपडपट्टी कुठेही मिरा भाईंदरमध्ये चालू करुन दाखवलं तर मॅडम मी भाईंदर सोडून जाईल. मॅडम एकही क्लस्टर अजून मिरा भाईंदरमध्ये झालेल नाही. दिड कोटीसाठी आपण गरिबांसाठी काय एवढे विचार करत आहेत. मला समजत नाही एवढा काय विचार करायचा क्लस्टर नेमा विषय संपला.

निलम ढवण :-

महापौर मॅडम एवढी चर्चा झाली त्यानंतर सन्मा. गायकवाड साहेबांनी त्यावर सजेशन दिलेले आहे आणि प्रशासनाने नक्कीच हा जो विषय घेतलेला आहे. तर प्रशासनाला जे काय डी.सी. रुल वगैरे आणि इतर सर्टिफिकेट घ्यायची आहेत किंवा नेमायचे आहेत हे माहिती नाही असे वाटते धृवजी तुम्ही विषय काढत आहेत प्रशासनाने जर विषय आपल्याकडे दिलेला आहे तर प्रशासनाला हे माहिती नाही का? दुसरी गोष्ट गायकवाड साहेबांनी आपल्याला एक्सप्लेनेशन दिलेले आहे. ठाणेमध्ये अशी योजना सुरु झालेली आहे आणि त्यांनी फक्त जो सल्लागार नेमायचा आहे तो सल्लागार नेमूनच पूढची योजना त्यांनी राबवलेली आहे. तर अशा पध्दतीने आणि हे सगळे प्रशासनाला माहिती नाही असे वाटते आहे का तुम्हाला? मग ही एक्स्ट्रा भुमिका तुम्ही कशाला मांडत आहेत आणि खर्चिक गोष्ट करत आहेत. मग प्रशासनाने निर्णय घेता आहेत त्यानुसार फक्त त्यांना सल्लागार नेमायचा आहे किंवा नाही ह्याविषयावर फक्त निर्णय घ्या. प्रत्येक वेळी कशाला ते आडवेढे सगळीकडे फाटे फोडत जायचे.

धृवकिशोर पाटील :-

ह्या क्लस्टरमध्ये ठाणे शहरासाठी विशेष लोटपोट ठाणे कार्पोरेशन एरिया म्हणजे फक्त आणि फक्त ठाणे शहरासाठी वेगळी नोट आहे. याच्यामध्ये वेगळे स्पेसेफिक रिलॅक्सेशन ठाणे शहराला मिळाले आहेत. आपल्याला अजून मिळालेले नाहीत.

निलम ढवण :-

पण सल्लागार नेमल्यानंतरचा क्लस्टर करता येईल ना.

मा. महापौर :-

पाटील साहेब आपला विषय काय आहे की तुम्हाला इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट प्रशासनाकडून पाहिजे हा विषय आहे ना? मग आपण प्रशासनाला कन्सलटंट पण नेमायला सांगू या आणि इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट सुध्दा सांगू या तर काय हरकत आहे?

धृवकिशोर पाटील :-

मॅडम मी पक्षाचा एक बांधील नगरसेवक आहे पक्षाच्या आढावा बैठकीमध्ये जो निर्णय झाला होता त्या निर्णयासाठी भांडतो माझा वैयक्तिक याच्यामध्ये काही ही विरोध नाही.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

पक्षाचा निर्णय होत नाही. लोकांच्या हितासाठी प्रशासन काम करेल.

धृवकिशोर पाटील :-

आमच्या पक्षाने पण चांगली भूमिका घेतलेली आहे. प्रत्येक विषयावरती आपल्या पक्षाचे एक मत असतं.

मा. महापौर :-

सभागृहनेते आपण ठराव मांडलेला आह, ह्या विषयाबद्दल आपण बोला. एकदा ठरवून टाका आता मी ह्या विषयाला जास्त वेळ देणार नाही. 5 मिनिटांमध्ये मला हा विषय संपवायचा आहे.

गिता जैन :-

मॅडम पक्षाचा जर निर्णय आहे तर ते तुमच्याच पक्षाचे आहेत.

मा. महापौर :-

मॅडम प्रत्येक पक्षाची आपआपली भूमिका असू शकते. त्यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका सांगितलेली आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम खंडेलवाल पण तुमच्याच पक्षाचे आहेत.

मा. महापौर :-

ठिक आहे आपआपली भूमिका शहरासाठी असू शकते.

पंकज पांडे :-

शहर के विकास के लिए झोपडे का विकास के लिए क्लस्टर होना चाहिए|

गिता जैन :-

महापौर मॅडम तुम्ही ठराव काहीही करा काहीही पास करा पण मी ठणकावून सांगते ज्यांना ज्यांना द्यायचे झाल्यास त्या झोपडपट्टीसाठी कुठेतरी सॉफ्ट कॉर्नर असणार, एखादा बिल्डरचा वास्तुचा असू द्या, स्वस्त घर विकणार ते नंतर ही विकून जाणार पण त्यासाठी त्या गरिबांवर अन्याय करु नका पण परत सांगते आपल्याला काय ते कन्सलटंट नेमा आणि जर ते नेमायचे नसेल.........

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम विषय डायवर्ट होत आहे विनंती वजा इशारा द्यायचे काम चालू आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम हे आपलं खरं सांगायचे किंवा आपल खरं दाखवायचं आणि दुसऱ्याला वाईट दाखवायच इथे हा विषय चालला आहे. मी आता ह्या डिपार्टमेंटला प्रश्न विचारु इच्छितो आणि प्रत्येकाला त्याची माहिती मिळेल मला टाऊन प्लानिंगकडून ही माहिती द्यावी की आज क्लस्टरमध्ये आपण मिरा भाईंदरमध्ये कुठलाही कॉम्पलेक्स किंवा क्लस्टर आपण करु शकतो की नाही?

मा. महापौर :-

आपआपसात बोलू नका प्रशासन उत्तर देत आहे.

केशव शिंदे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की आता सन्मा. उपमहापौरांनी जो प्रश्न उपस्थित केला आपल्या शहराला 2020 रोजी जे यु.डी.सी.पी.आर मंजूर झाला आहे त्यानुसार क्लस्टर योजना लागू आहे.

मा. उपमहापौर :-

म्हणजे क्लस्टर लागू आहे. दुसरा विषय यह जिसको भी हम कन्सलटंट अपॉईंट कर रहे है उन लोग घोषित कर देंगे यह क्लस्टर है तो 100 परसेंट वो क्लस्टर लागू हो जाएगा हा या ना?

केशव शिंदे :-

क्लस्टरला पैरा मीटर बरेच आहेत.

मा. उपमहापौर :-

मैंने किसी भी सदस्य बात कर रहे थे उसके अंदर मैंने हस्तक्षेप नही किया था| कौन क्यों रखना चाहता है, कौन क्यों नही रखना चाहता वो विषय के लिए नही है| बात हमारे शहर के लिए है कोई अपने फायदे के लिए कर रहा है, क्या नही कर रहा वो विषय की हम बात ही वही कर रहे है| अगर शहर के हित के लिए है तो 100 परसेंट हित के लिए आना ही चाहिए| क्लस्टर जो कन्सलटंटसी जो अपॉईंट करेंगे वो अपॉईंट करने के बाद उन्होंने अगर दिशा बताई की यहाँ पर क्लस्टर होना चाहिए उनके बताने से वो फायनल हो जाएगा उसके बाद कोई इन्क्वायरी नही होगी हा या ना?

मारुती गायकवाड (मा. उपायुक्त) :-

सन्मा. महापौर महोदय, सन्मा. सभागृह, सन्मा. उपमहापौरांनी आता जो प्रश्न विचारलेला आहे ॲक्च्युअली आता सर्व्हे होणार आपण आयडेंटीफाय करणार आहोत यू.आर.एस आपण फायनल करणार समजा 10 ठिकाणी आपण क्लस्टर करु शकतो, 10 प्लान तयार होतील ते 10 प्लान महासभेसमोर येतील महासभेने सन्मा. सभागृहाने मान्यता द्यायची आहे. दोन करायचे, तीन करायचे पहिल्या फेजमध्ये आम्हाला चारच क्लस्टर करायचे आहेत. मग ते सन्मा. सभागृहाची मान्यता मिळाल्यानंतर ते शासनाच्या मान्यतेला जॉईल आणि शासन मान्यता देईल त्याला ह्या चार ठिकाणी क्लस्टर करायला हरकत नाही.

मा. उपमहापौर :-

तुमच उत्तर भेटलेल आहे. मतबल वो फायनल नही है, अब मेरा दुसरा सवाल है यह विषय नही आना चाहिए इसलिए चिधडेबंदी निकालेगी इसलिए उन्होंने शॉर्ट में बताया था आप बार बार जब निकाल रहे हो तो हकीकत बहार आनी चाहिए की जिस कन्सलटंटसीने फायनल कर दिया की क्लस्टर नही है वो अगर इन्सान या वो विकासक या वो क्षेत्र क्लस्टर के लिए जाने चाहिएंगे तो जा सकते है की नही जा सकते है| कन्सलटन्सीने अगर कहाँ देवल नगर क्लस्टर नही बन सकता एक्झाम्पल के तौर पर कह रहा हूँ उन्होंने ऐसा लिख दिया की देवल नगर क्लस्टर नही बन सकता है तो क्या देवल नगर विकासक की तरफ से और देवलनगर मिला के सभी रहिवासी क्ल्स्टर में जा सकते है की नही जा सकते है? हा या ना.

मारुती गायकवाड (मा. उपायुक्त) :-

तो जर एरिया क्लस्टरचे सर्व पॅरामीटर फुलफिल करत असेल तर जाणार.

मा. उपमहापौर :-

मतलब मुल बात यह हूँआ की जा सकते है इसके लिए मेरा कहना इतना है की जब कन्सल्टंटसी जो अपॉईटमेंट कर रहे है उसका पॅरामीटर सिर्फ इतना है यही पर क्लस्टर हो सकता है

लेकिन उसका फायनल यह नही है की वही फायनल होगा या जो बाकी रह जाएगा इसका मतलब है की वो कभी जिंदगी में नही आएगा यह पुरा का पुरा काम मैं आपको बताना चाहूँगा यह विकासक का काम होता है| जिस तरीके से पिछली बार सदस्य महोदयने कहाँ था एक का सो बनावा है मुझे गर्व है मेरे भी क्वालिटी है लेकिन मैं बताना चाहूँगा चाहे किसी भी जाती धर्म का हो अगर वो व्यापारी है तो वो एक को सो बनाना जानता है, यहा 50 बनाना जानता यहा 10 बनाना जानता है वो उसकी कला क्लस्टर की अंदर प्रेझेंटेशन देना विकासक का काम है| वो उसका खर्चा है वो महानगरपालिका का खर्चा नही है| इसलिए धृवकिशोर पाटीलजीने वो विषय रखा की हमारी जो यथास्थिती भाईंदर की है इमपॅक्ट असेसमेंट रिपोर्ट हमे यह पता चल जाएगा की क्षमता कितनी है, कितना कर सकते है और रही बात सदस्य महोदयजी मैं आपके साथ में भी ॲग्री करता हूँ देड करोड क्या अगर पाच करोड क्या 20 करोड देना पडे अगर बैठे बैठे अगर फायनल हो जाए तो में आज देने के लिए तयार हूँ|

मारुती गायकवाड (मा. उपायुक्त) :-

सन्मा. महापौर महोदया, सन्मा. सभागृह जसे उपमहापौर साहेब बोलले की त्या ठिकाणी प्रायव्हेट डेव्हलपर येऊ शकतो सर्व्हे करु शकतो समजा उद्या प्रायव्हेट डेव्हलपरला परवडलच नाही जसे सन्मा. सदस्य रिटा शाह मॅडम बोलल्या त्याठिकाणी 5-5 एफ.एस.आय. वापरले 6-6 एफ.एस.आय वापरले अशा ठिकाणी जर प्रायव्हेट डेव्हलपरला जर परवडल नाही तर प्रायव्हेट डेव्हलपर त्याठिकाणी येणार नाही. मग त्याठिकाणी आपण क्लस्टर डेव्हलपमेंट करायचे की नाही करायची त्याठिकाणचे जे स्लम आहे तो स्लम क्लस्टरमध्ये घ्यायचे की नाही घ्यायचा हा च प्रश्न ठाण्यामध्ये पण झाला होता किसन नगरमध्ये चारपेक्षा जास्त एफ.एस.आय. वापरला होता. चार, साडे चार, पाच एफ.एस.आय किसननगरमध्ये वापरला गेला त्यामुळे प्रायव्हेट डेव्हलपर त्याठिकाणी कोणी ही नाही आले म्हणून आता किसन नगरचे डेव्हलपमेंट ही सिडको करते. गर्व्हमेंट त्या किसननगरला डेव्हलपमेंट करते. त्यामुळे काय होते प्रायव्हेट डेव्हलपरला तो एरिया नाही परवडला डेव्हलपमेंटला तर प्रायव्हेट डेव्हलपर येत नाही आणि आपल्या शहराचा विकास होत नाही. हे ताजे उदाहरण ठाण्यामध्ये झाले आहे मी रिपीट करतो. किसननगरमध्ये 4 पेक्षा जास्त एफ.एस.आय. वापरला गेला त्यामुळे प्रायव्हेट डेव्हलपर कोणी सुध्दा नाही आले त्यामुळे सन्मा. पालकमंत्री महोदयांची तिथे मिटींग झाल्यानंतर त्याठिकाणी शासनच ते क्लस्टर डेव्हलप करतो. शासनाचीच एजन्सी सिडको आहे तिच तिथे डेव्हलप करते. त्यामुळे प्रायव्हेट डेव्हलपर येईलच असे नाही मग प्रायव्हेट डेव्हलपर आला नाही म्हणून शहराचा विकास करायचा नाही का? माझी पोटतिडकी एवढीच आहे की आम्ही आज आहेत उद्या जाणार, माझी उद्या शासनाने बदली केल्यावरती मी जाणार. मिरा भाईंदरची डेव्हलपमेंट झाले किंवा नाही झाली हा विषय नाही पण आम्ही इथे आहोत सन्मा. आयुक्त् धडाडीचे आहेत, आम्हाला अनुभव आहे. टीम आमची चांगली आहे. आमच्या माध्यमातून शहराला काहीतरी आमचे देणं व्हावं हाच आमचा उद्देश आहे. म्हणून आम्ही हा प्रस्ताव मांडलेला आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम गायकवाड साहेबांनी चांगली संधी दिली आपल्याला त्यामध्ये दुमत नाही पण हे पण खरच आहे की आपल्याला समजा क्लस्टरमध्ये शासनाला जायचे असेल ते आता ही जाऊ शकते. दुसरा विषय असा आहे आता जे बोलले प्रत्येक शहरामध्ये म्हणजे डोंबीवली असो, ठाणे असो कुठलेही शहर असो त्या लोकांनी केलं प्रत्येक महानगरपालिकेची अर्थव्यवस्था वेगळी आहे. प्रत्येक महापालिकेची जॉग्रफीकल एरिया वेगळा आहे, प्रत्येक महापापालिकेची वस्तुस्थिती वेगळी आहे म्हणजे एखादी महापालिका मोफत देते 500 फुटाचा आपली महापालिका देऊ शकत नाही. आपली महापालिकेची आर्थिक स्थिती तशी नाही. आणि ह्या युनिफाइड डी.सी. मध्ये तुम्ही बघितले असेल ठाण्याला वेगळी सूट देण्यात आलेली आहे का तर त्या महापालिकेची स्थिती वेगळी आहे. म्हणजे प्रत्येक महापालिकेची स्थिती वेगळी असते त्या अनुषंगाने आपल्याला ते काम करावे लागते.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम आता सर्वांचे मत आपण ऐकले आता शेवटला माझा एक शेवटचा एक छोटासा निवेदन आहे. आता उपमहापौर साहेब जसे बोलले की आपली आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. म्हणून दीड कोटी रुपये सर्व्हेसाठी म्हणजे................

मा. उपमहापौर :-

मैंने कहाँ की महानगपालिका की सबकी आर्थिक स्थिती अलग होती है, कोई 500 स्क्वेअर फुट फुकट में दे देता है हम नही दे सकते, हमारी आर्थिक परिस्थिती अलग है में वह विषय पे कहाँ मैं अॅग्री हूँ सदस्य महोदय आपकी बात पे आप सही हो सकते हो आय अॅम रिस्पॉन्सीबल वॉट आय से नॉट व्हॉट अंडरस्टँड में जबाबदार उसी चिज का हूँ की जो में कह रहा हूँ ना की आप समज रहे हो|

सुरेश खंडेलवाल :-

मैं आपकी बात समज गया मैं आपके यह बात इसलिए कह रहा हूँ की गायकवाड साहब में सभी ने इतना स्पष्ट तौर पे बता दिया की मिरा भाईंदर शहर के डेव्हलपमेंट के लिए झोपडपट्टीयो की डेव्हलपमेंट के लिए खाली एक एरिया में अपनी बी.एस.यू.पी. योजना बरसो से चल रही है, वो एक बाकी के क्षेत्रो के डेव्हलपमेंट के लिए अपने को क्लस्टर मिरा भाईंदर में होना चाहिए लेकिन क्लस्टर को लागू करने के पहिले वहाँ का सर्व्हे होना चाहिए, वहाँ की जिओग्राफीकली सारी परिस्थितीयाँ जब तक कन्सलटंट अपॉईंटमेंट नही होगा तब तक यह सब चिजे कैसे मालूम होगी|

मा. उपमहापौर :-

इसके लिए इमपॅक्ट असेंसमेंट रिपोर्ट मांग रहे है|

सुरेश खंडेलवाल :-

तो आप ऐसा किजीए की जब तक वो कन्सलटंट को अपॉईंट हम करते है, वो तो एक दिन में रिपोर्ट देनावाला है नही, कन्सलटंट एक दिन में शुरु करनेवाला नही है| आप उसको ऐसा करिए की कन्सलटंट आर्थिक प्रशासकीय दे रहे है, प्रशासन अपना काम शुरु करे लेकिन उसके पहले अपने को नेक्स्ट टाईम जब यह फायनल होने को आएगा क्योंकी में आपको महापौर मॅडम बताता हूँ की जब वो रिपोर्ट आएगी की यह इतने मिरा भाईंदर हम क्लस्टर डेव्हलप कर सकते है उसके साथ साथ में यह जो रिपोर्ट मांग रहे है की कहाँ होना चाहिए महासभा का निर्णय है जब रिपोर्ट उन्होंने बनाया उसी समय जब आप रिपोर्ट जो मांग रहे हो उसी समय यदी सामने सामने रहेगा तो ही हम अॅसेस कर पायेंगे की कहाँ पे डेव्हलप करना है कहाँ नही करना है मुझे समझ में नही आता है की कन्सलटंट को अपॉईंट करने के लिए इतना बहेस क्यों कर रहे है| मेरा ऐसा मानना है की कन्सलटंट अपॉईंट कर रहे है तबतक कन्सलटंट ही अपॉईंट नही होगा यह गाडी आगे बढेगी नही महापौर मॅडम मिरा भाईंदर शहर को आपको हमको सब मिल के झोपडपट्टी से मुक्त बनना है यदी क्लस्टर लागू करना है तो हमे अपॉईंटमेंट करना चाहिए|

मा. महापौर :-

झोपडपट्टीला डेव्हलप करण्यामध्ये आम्हाला जो त्रास झाला तो कोणाला झाला नसेल.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम मी म्हणून सांगतो क्लस्टर डेव्हलपमेंट करणे गरजेचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

दळवी साहेब तुम्ही जो ठराव वाचलेला आहे तो नीट पध्दतशिर परत एकदा म्हणा की तुम्हाला काय ते ठरावामध्ये म्हणायचे आहे जेणेकरुन ह्या ठिकाणच्या लोकांना अॅग्री नसेल तर ते त्यांचे ठराव मांडतील. एक तास झालेला आहे. याच्यापेक्षा जास्त चर्चा नको कारण बाकीचे विषय पण

विषयपटलावर आहेत. प्रशासनाने आपले मत मांडलेल आहे. तेव्हा तुमचा जो नामंजूरचा ठराव आहे तुम्हाला काय ठराव मांडायचा तो तुम्ही मांडू शकता.

प्रशांत दळवी :-

मी ठराव मांडलेला आहे यांना काय ठराव मांडायचा असेल ते त्यांनी मांडावं.

गिता जैन :-

मला त्या ठरावामध्ये मला असे सांगायचे आहे तुम्हाला नेमायचे आहे काय करायचे ते तुम्ही करा पण हा विषय विषयपत्रिकेवर आहे त्याचा उल्लेख नाही. तर ते उल्लेख ही करावं की ते तुम्हाला मंजूर आहे. आमचा ठराव रेडी आहे पण तुमच्या ठरावामध्ये विषय आहेत त्याचा उल्लेखच नाही ते करा तुम्ही.

मा. महापौर :-

त्यांच्या ठरावामध्ये काय करायचे ते आपण कसे सांगणार. तुम्ही तुमचा ठराव मांडा.

गिता जैन :-

मी तुम्हाला सांगते की जे विषय विषयपत्रिकेवर नाहीत त्यावर ठराव झालेला आहे मी तेवढाच सांगते.

मा. महापौर :-

त्यांचा ठरावाचा काय करायचे ते प्रशासन बघेल आपण आपला ठराव मांडा.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, थोडासा प्रशासनाने गोषवारा देते वेळी गोषवारा संदिग्ध आहे. विस्तृत जर दिला असता सल्लागारांची आम्हाला भिती का वाटते आहे बी.एस.यू.पी. ला सल्लागार नेमला काय परिस्थिती झाली. अंडर ग्राऊंड ड्रेनेज सिस्टीमला सल्लागार नेमला काय परिस्थिती झाली. उत्तनला घनकचरा प्रकल्पाला सल्लागार नेमला काय परिस्थिती झाली हे परिवहन ला सल्लागार नेमला काय परिस्थिती झाली हे सर्वांचे डी.पी.आर प्रशासनाकडे आहेत ही माहिती जर थोडीशी दिली ह्या गोषवाऱ्यामध्ये तर सर्व सदस्यांना ते कळले असते. दुसरी गोष्ट प्रशासनाने दिड करोडच्या मंजूरीसाठी विषय आपल्याजवळ आणलेला आहे. सभागृहाने आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी त्याला द्यायची आहे, अर्थसंकल्पीय तरतूद कुठे आहे? कुठल्या हेडखाली तरतूद आहे काहीच उल्लेख नाही. त्याचा रिॲप्रॉप्रिएशन करणार आहेत. काय करायचा आहे आम्ही मंजूरी द्यायची कशी. बजेटमध्ये हेडच नाही. याच्यामध्ये सांगा बजेट प्रोव्हीजन कुठे आहे? गोषवाऱ्यामध्ये उल्लेख करा ना तुम्ही की ह्या हेडखाली आमचा प्रोव्हीजन आहे. माझी प्रशासनाला विनंती आहे ह्याच्या पुढे जे गोषवारे तुम्ही द्याल त्याची विस्तृत माहिती द्या. बजेट प्रोव्हीजन कुठे आहे, अर्थसंकल्पीय तरतूद किती आहे, कितीची मान्यता तुम्हाला पाहिजे आहे सरसकट आमच्या जवळॅन मान्यता घेऊ नका उद्या लोकप्रतिनिधी अडचणीत येतील असे बरेच विषय बऱ्याच महापालिकेमध्ये झालेले आहे.

रिटा शाह :-

महापौर मॅडम, पहिली गोष्ट बी.एस.यू.पी. ची स्कीम ही मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्कीम आहे सेंट्रलची आहे की स्टेटची आहे.

मा. महापौर :-

केंद्र शासन, राज्य शासन लाभार्थी आणि महानगरपालिका अशी आम्ही मिळून मी स्कीम आहे.

रिटा शाह :-

बरोबर आहे मॅडम आता जो क्लस्टरचा विषय चाललेला आहे तो प्रायव्हेट आर.झोन जमीनसाठी क्लस्टर नेहमी आपण यूज करतो राहिलेली जी जमीन अशी आहे की जिथे गोरगरिब राहतात जसे झोपडपट्टी एरिया आहे, सरकारी जमीनी आहेत जिथे आपण क्लस्टर लागू करायच्या

अगोदर पहिले पण प्रश्न मी केलं होतं त्याला एस.आर.ए. स्कीम जरुरी आहे की नाही ते प्रशासनाने उत्तर द्यावं. कारण एस.आर.ए. स्कीम सेंट गर्व्हमेंट वरुन आपल्याला मंजूर करुन आणावी लागेल. तोपर्यंत आपण एस.आर.ए. लागू करु शकत नाही आणि आपण झोपडपट्टी डेव्हलप करु शकत नाही आणि झोपडपट्टी डेव्हलप करतना जेव्हा क्लस्टर आपल्याला वापरायचे असेल तर आपलीच सरकार आहे आपलेच प्रशासन आहे, प्रशासनाची जमीन आहे तर प्रशासन करुन घेणार ते त्यासाठी क्लस्टरसाठी खर्च करायची काय गरज नाही. प्रशासनाच्या हातात आहे ते क्लस्टर लागू करायचे की नाही करायचे म्हणजे ज्या प्रायव्हेट जमिनि आहेत आर झोन जमिनि आहेत ज्याला क्लस्टर लागू आहेत त्याला खूप वर्षे झाले. एका बिल्डरला 15 बिल्डींग एकत्र येऊन करायचे मी परत परत सांगते त्या बिल्डरची गरज आहे त्यांनी आपला प्रस्ताव नगररचना विभागाला सादर करायचा, नगररचना विभाग सांगणार की तुम्ही बायोमॅट्रीक आणा हे आणा ते आणा ते सर्व सर्टीफिकेट त्यांनी स्टेट गर्व्हमेंटमधून जाऊन आणायचे असते. ते सादर करायचे असते आणि सादर झाल्यानंतर त्यांचा क्लस्टर अंतर्गत ते प्लान सँक्शन होणार त्यासाठी एवढी मगजमारी आणि एवढा त्रास का वाया घालायचा.

प्रविण पाटील :-

मिरा भाईंदर शहरासाठी क्लस्टर योजना राबविणेकरिता तज्ञ सल्लागार नेमण्यास सदरची सभा मंजूरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 09 करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव आहे श्री. प्रशांत दळवी, अनुमोदन श्री. धृवकिशोर पाटील. दुसरा ठराव सुचक श्री. प्रविण पाटील, अनुमोदन श्रीम. निलम ढवण. सुचक श्री. प्रविण पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सन्मा. सभागृहनेते प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 42, विरोधात 17, तटस्थ 1 इतकी मते पडलेली आहेत. श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. 09 :-

मिरा भाईंदर शहरासाठी क्लस्टर योजना राबविणेकामी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.

ठराव क्र. 11 :-

मिरा भाईंदर महापालिकेमार्फत अनेक विषयांकरीता सल्लागारांनी प्रकल्प अहवाल तयार केलेले आहेत. परंतु त्यातील काही अहवालावर अंमलबजावणी प्रत्यक्षात झालेली नसल्याने महापालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. मिरा भाईंदर शहरासाठी क्लस्टर योजना राबविण्याआधी शहराचा Impact Assessment Report तयार करणे गरजेचे आहे. तद्नंतर क्लस्टर योजना राबविण्याकामी

सल्लागार नेमणे संयुक्तीक होईल. त्याप्रमाणे प्रशासनाने प्रथम Impact Assessment Report तयार करावा तद्नंतर क्लस्टर योजनेबाबत प्रस्ताव सादर करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १ | पाटील धनेश परशुराम | १. अहमद साराह अकरम |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ४ | नलावडे दिनेश दगडु | |
| ५ | मेहता डिंम्पल विनोद | ५ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ६ | मदन उदितनारायण सिंह | ६ | घरत तारा विनायक | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | कदम अर्चना अरुण | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | भोईर भावना राजू | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | भोईर कमलेश यशवंत | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | सावंत अनिल दिवाकर | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | शेख रुबीना फिरोझ | |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | परदेशी गिता हरीश | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | पाटील नरेश तुकाराम | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | जैन गीता भरत | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| २१ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २४ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २५ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २६ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २७ | कांगणे मीना यशवंत | | | |
| २८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| २९ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३० | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३१ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३२ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३३ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३४ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ३५ | भोईर गणेश गजानन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ३७ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३८ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ३९ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४० | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४१ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४२ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 10, राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना आर्थिक सहाय्य करणेबाबत.

प्रशांत दळवी :-

उपरोक्त गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार राज्यस्तरीय, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ही मा. महासभा मंजुरी देत आहे तसेच प्रशासनाने खेळाडूंच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेवून विनाविलंब खेळाडूंचे अर्ज मंजुर करावेत.

| प्राविण्य | राष्ट्रीय स्तर वैयक्तीक खेळ (रु.) | आंतरराष्ट्रीय स्तर वैयक्तीक खेळ (रु.) | राष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त खेळाडू) (रु.) | आंतरराष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त खेळाडू) (रु.) |
|---|---|---|---|---|
| आर्थिक मदत | रु.25,000/- | रु.50,000/- | रु.1,00,000/- | रु.2,00,000/- |

वरील स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी आर्थिक सहाय्यासाठी खेळाडूंची पात्रता निश्चित करण्याचे निकष खालीलप्रमाणे,

1) संबंधीत खेळाडू मिरा भाईंदरचा रहिवासी असावा (5 वर्षे)
2) भारतीय शालेय खेळ महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्या वतीने अधिकृत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरेल.
3) खेळाडू ज्या दिवशी पदक जिंकेल त्यावेळेस मिरा भाईंदरचा नागरिक असावा.

तसेच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रोर्कड तसेच या सारखेच मान्यताप्राप्त रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना प्रत्येकी रु. 25,000/- प्रमाणे आर्थिक मदत करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 10 :-

राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना आर्थिक सहाय्य करणेबाबत.ठराव क्र. :-

ठराव क्र. 12 :-

उपरोक्त गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार राज्यस्तरीय, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना ही मा. महासभा मंजुरी देत आहे तसेच प्रशासनाने खेळाडूंच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेवून विनाविलंब खेळाडूंचे अर्ज मंजुर करावेत.

| प्राविण्य | राष्ट्रीय स्तर वैयक्तीक खेळ (रु.) | आंतरराष्ट्रीय स्तर वैयक्तीक खेळ (रु.) | राष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त खेळाडू) (रु.) | आंतरराष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त खेळाडू) (रु.) |
|---|---|---|---|---|
| आर्थिक मदत | रु.25,000/- | रु.50,000/- | रु.1,00,000/- | रु.2,00,000/- |

वरील स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी आर्थिक सहाय्यासाठी खेळाडूंची पात्रता निश्चित करण्याचे निकष खालीलप्रमाणे,

1) संबंधीत खेळाडू मिरा भाईंदरचा रहिवासी असावा (5 वर्षे)
2) भारतीय शालेय खेळ महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्या वतीने अधिकृत राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धांसाठी झालेली निवड पात्र ठरेल.
3) खेळाडू ज्या दिवशी पदक जिंकेल त्यावेळेस मिरा भाईंदरचा नागरिक असावा.

तसेच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड तसेच या सारखेच मान्यताप्राप्त रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना प्रत्येकी रु. 25,000/- प्रमाणे आर्थिक मदत करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 11, मनपा मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई कामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणे कामाची निविदा मागविणेबाबत.

राकेश शाह:-

उपरोक्त गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई करणेकामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणेकरीता निविदा मागविणेस व रु.1 कोटी 55 लाख या रक्कमेस तसेच सदर प्रस्तावात मनपाच्या शाळा इमारती व इतर इमारतींमध्ये हाऊस किपिंग एजन्सी नेमणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम, आपले एवढे वर्षानुवर्षे आपले जे सफाई कर्मचारी आहेत ते आपली बिल्डींग साफसुफ करता आहेत. चांगली ठेवत आहेत आपण प्रत्येक कामाला ठेकेदार नेमायचं आणि त्यानंतर हे

काम करायची ही एक पध्दत झालेली आहे. एवढी वर्षानुवर्ष किती वर्षाच्या ह्या बिल्डींग आहेत पानपट्टे साहेब आपल्या बिल्डींगला किती वर्ष झाले? जे काही झाले 20 वर्ष जे काही झाले असतील आतापर्यंत आपले सफाई कर्मचारी साफसफाई करत होते. आता 1-2 वर्षात सर्व ठेका झालेला आहे. अदरव्हाईज आपणच करत होतो आणि अजूनही आपल्याकडे सफाई कर्मचारीची जी भरती आहे ती पण बाकी तर माझे असे सांगणे आहे की ठेकेदार नेमण्यापेक्षा तुम्ही ते भरती करा जी तुमची रिक्त् पद आहेत जे मंजूर झालेले आहेत आणि आपण भरती केलेली नाही आणि मी तर सांगणार की त्यावर स्थानिकांची भरती करा पण अजूनपर्यंत जे काय ठेक्यावर कधीच झालेले नाही आपली मेन इमारत कधीच हाऊस स्कीपींग एजन्सी नव्हती. तर माझी अशी विनंती आहे की तुम्ही ठेकेदार न नेमता जी भरती आहे ते जर केले तर स्थानिकांना त्याचा न्यायपात्र मिळणार आणि दरवेळी प्रत्येक वस्तुला ठेका आणि ते ठेकेदार तर गेल्या महासभेत शौचालयाचा विषय झाला ठेका दिलेला आहे काय झाल? एक पण माणूस त्या ठेक्याने खुश नाहीत. मग आपण आता भरती का करुन घेत नाही.

संभाजी पानपट्टे (मा. अति. आयुक्त) :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर देतो मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये 6 प्रभाग कार्यालय आहेत आणि मुख्य कार्यालय ह्यासाठी फक्त 34 नेमणार आहोत. परमनन्ट कर्मचारी कसे नेमता येतील ते पण बघून घेऊ आणि बरेच कर्मचारी महापालिकेमध्ये साफसफाईचे काम करत होते पण जे रिटायर्ड झाले त्याच्यामुळे स्टाफ उपल्बध नव्हता म्हणून आपण केले आहे.

गिता जैन :-

साहेब मी पण तेच सांगितले की रिक्त पदाची भरती करा.

संभाजी पानपट्टे (मा. अति. आयुक्त) :-

तो पण विषय आपण करु. तोपर्यंत एक वर्षासाठी चालवतो.

गिता जैन :-

आयुक्त साहेब, तुम्ही पदोन्नतीचा एवढे केले आहे, हे पण प्रलंबित वर्षानुवर्ष आमचा रिक्त पदे भरायचा प्रश्न आहे, अनुकंपाचाही विषय आहे पण रिक्त पदाचा पण आहे. तर साहेब तुम्ही पदोन्नती जशी केली त्याप्रमाणे रिक्त भरले तर आमचे स्थानिक त्यांना एक परमनन्ट नोकरी तरी मिळणार आणि त्यांना काम मिळणार म्हणून हे सगळे ठेका पध्दती सोडा आणि जे आपले रिक्त पद आहेत त्याची भरती करा अशी माझी विनंती आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ह्या ठरावाच्या अनुषंगाने वेळोवेळी आपण वर्षानुवर्ष अशा पध्दतीने कामं करत आलेलो आहोत. अगोदर ही आपल्या मा. आयुक्त् महोदयांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे की ज्या ज्या वेळेला भरती प्रक्रियेचा विषय येतो. त्या त्या वेळेला करसपॉन्डन्स केलेले आहे की जी आपली पद रिक्त आहेत ती पहिली भरण्यात यावी. परंतु तोपर्यंत आपण म्हटले की मुख्य कार्यालय आणि 6 प्रभाग समित्या आहेत आणि त्याअनुषंगाने आपण शाळेच्या इमारती आहेत त्याचा ही त्याच्यामध्ये उल्लेख केलेला आहे तर महापौर मॅडम माझी विनंती राहील की ह्यावेळी आपण 1-1 वर्षासाठी करतच आलेलो आहेत तर जोपर्यंत पद भरती होत नाही तोपर्यंत आपण करु शकतो.

अनिल भोसले :-

दर पावसाळ्यामध्ये आपण खड्डे बुजवण्यासाठी करोडो रुपये खर्च करतो प्रशासनाला माझा प्रश्न आहे आपण दोन तऱ्हेचे खड्डे भरतो एक कच्चे स्वरुपाचे आणि पक्के स्वरुपाचे.

नयना म्हात्रे :-

आता जो विषय झाला सफाई कर्मचाऱ्यांबद्दल मॅडम आपली महापालिकेच्या शाळेत देखील आहे ते कामागर दिली पाहिजे आणि आरोग्य केंद्रामध्ये पण ते कामगार दिले तर नक्कीच साफसफाई होईल.

रुबीना शेख :-

बार बार देखने में आ रहा है की हम प्रायव्हेट एन.जी.ओ. को खाजगी कामगारो को हम अपॉईंट कर रहे है| तो कही ना कही ऐसा दिखाई दे रहा है की हम अपनी नाकामी खूद बयान कर रहे की हमारा डिपार्टमेंट सक्षम नही है, मेरे खयाल से मिरा भाईंदर म्युनिसिपल कार्पोरेशन एक ऐसा सक्षम माध्यम है या एक ऐसी संस्था है जो अपने काम खुद कर सकती है और अगर हम अपने ही लोगो को पहिले अपॉईंट करके और अपने ही लोगो से हम अपने काम को पूरी अच्छी तरीके से कराए तो बेहतर होगा| हर चिज का ठेका दुसरे को दे देना और उसपे डिपेंड हो जाना मेरे खयाल से यह कही ना कही अपनी नाकामी से दर्शा रहे है|

दिनेश नलावडे :-

माझी एक सुचना आहे साफसफाईमध्ये आपण प्रभाग समितीचे कायारलय घेतलेले आहे. माझ्या प्रभागामध्ये समाज मंदिर आहे. तो हॉल प्रत्येक दिवशी भाड्याने राहतो. कार्यक्रम वगैरे सगळे रोज असतात. परंतु साफसफाईच्या बाबतीमध्ये रोज तक्रार येते. तिकडे कोणी साफसफाई करायला नाही. प्रत्येक वेळी मी आरोग्य डिपार्टमेंटला, बांधकामला सगळीकडे मी तक्रारी करत असतो आणि अशा ठिकाणी कोण आहे तिकडे हॉलचे आपण भाडे घेतो. तिकडे योगा सेंटर आहे, योगा सेंटरमध्ये साफसफाई करायला कोणी नाही. रोज सकाळी फोन आम्हाला येतो. आम्ही तिकडे प्रत्येक वेळेला झगडे करायचे आरोग्य डिपार्टमेंटबरोबर आपण त्यांच्याकडून मानधन घेतो, सगळे काही करत असताना आपली हॉलची दशा बघा काय होते. पाणी गळते आहे ते कोणी बघत नाही. बाथरुम, शौचालय घाण होतात आणि आपण भाडे घेत आहोत. महापौर मॅडम आपण शौचालयाचा ठेका दिलेला आहे. आमच्या प्रभागामध्ये शौचालय तिकडे कोणीही बघत नाही. साहेब दहा वेळेस पाहणी केली परत ये रे माझ्या मागल्या ती कामे परत बंद होतात. साफसफाई होत नाही. सगळ्यांना त्रास होतो हे रोजचेच आम्हाला काम करावे लागतात. तर ह्याबाबतीमध्ये आपण नेमा कोणीतरी आम्हाला परत परत करायला नको. त्या हॉलमध्ये कोणीच येत नाही काही नाही.

निलम ढवण :-

स्पेशली ठेकेदारांना विरोध असण्याचा माझ कारण की प्रत्येक याच्यात आपण ठेकेदार दिलेले आहेत पण प्रशासनाशी जे ॲग्रीमेंट करता तर त्या ॲग्रीमेंटमध्ये जे खरोखर मेहनत करत आहेत कामं करत आहेत त्यांना पगार किती मिळतो ह्याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे आणि बाहेरुन आलेला ठेकेदार सगळे कमवून जातो आणि इथे काम करणारे लोक जी आहेत त्यांना दिले जातात एक दोघांकडून तर असे कळले आहे की त्यांना पगारातून दाखवण्यासाठी दिले जातात 15000-16000 आणि परत त्यांच्याकडून 4-5 हजार घेतले जातात. ठेकेदार परत घेतो. मग त्यांना 10-12 हजारात कामं करतात ठिक् आहे. कुठेच रोजगार नसल्या कारणाने कुठे काम नसल्यामुळे मुलं किंवा इतरही लोक ते काम करण्यासाठी तयार राहतात मग प्रत्येक वेळी त्या ठेकेदरांची साम आपण का करावी आपल्या जनतेचा पैसा आहे आपल्या जनतेमध्ये वाटला जाईल त्यामुळे इथल्या स्थानिक लोकांना जर काम दिलं तर त्या लोकांना एक रोजगार देखील मिळेल आणि योग्य तो पगार देखील दिला जाईल. त्यामुळे कृपया प्रत्येक ठिकाणी ठेकेदार न नेमता इथल्या स्थानिक लोकांना प्राधान्य द्यावे.

जयंतीलाल पाटील :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो प्रशांत दळवी साहेब आपल्या मिरा भाईंदचा इतिहास आहे की मिरा भाईंदरमध्ये सर्व ठेकेच दिले जातात. आतापर्यंतचा 5 वर्षाचा इतिहास आहे. हा देशाचा

नाही तर भाईंदरचे दुर्देव आहे की प्रत्येक ठेकेदाराच पोट भरले जात आहे. गरिब मुलं इथे मरमर मरत आहेत परमनन्ट होत नाहीत. ठेकेदाराला 25 हजार दिले जात आहेत आणि मुलांना 12 ते 15 हजार दिले जात आहेत. अग्निशमनमध्ये तोच प्रकार आहे. 25 हजार पगार आहे पण मुलांना 12 हजार दिला जात आहे. आता मी दोन महासभेपासून बघतो महापौर मॅडमचे आणि आयुक्त् साहेबांचे योग्य असं कौतुक केले जात आहे. पण महापौर मॅडम आणि आयुक्त तुम्हाला मी एक विनंती करतो सॉरी मी बोललो शब्द मागे घेतो. मी सर्वांची माफी मागतो.

मा. महापौर :-

जयंतीलाल यांनी बोलले शब्द प्रोसेडिंगमधून काढण्यात यावे. तुम्ही जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो अतिशय योग्य आहे.

जयंतीलाल पाटील :-

मी मगासपासून बोलतो, इथल्या भुमिपुत्रांना जॉब दिले जात नाहीत. नितीन म्हात्रे यांनी दुबईमध्ये आपल्या इंडियाचा झेंडा फडकवला त्या मुलाला जॉब कोणी दिला गर्व्हमेंटने दिलेला आहे. एवढे लक्षात ठेवा आपले भुमिपुत्र गटारावर काम करत आहेत ठेकेदार करोड रुपये कमवत आहेत. पण प्रशासनाला काहीही फरक पडत नाही. परमनन्ट सुध्दा होत नाहीत.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याच्या संदर्भामध्ये प्रशासनाने शहानिशा करावी. ठेकेदार खरोखरच जो प्रामाणिकपणे कामगार काम करत असेल त्याला पूर्ण पगार देतो की नाही कारण अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या असल्यास व नगरसेवकांनी तक्रारी केली असल्यास व इतर कोणीही आपल्याकडे तक्रारी दिल्या तर ह्या विषयावरती शाहनिशा करा. संबंधित जो कोणी असेल तर त्यांनी जर काम केलेले असेल तर त्याला पूर्ण पगार मिळायला पाहिजे. त्याच्या पगारामध्ये कटोती होता कामा नये कोण ठेकेदार असतील त्यांना त्वरीत सुचना देण्यांत याव्या. मी रुलिंग दिलेली आहे प्रशासन कारवाई करेल.

दौलत गजरे :-

ठेकेदाराचा प्रश्न आहे, आज परिस्थिती अशी आहे ज्या ठेकेदाराला ठेका दिला जातो. तो ठेकेदार कर्मचाऱ्यांना 4-4 महिने पगार देत नाही आणि तो कर्मचारी काम करायला गेला की तो म्हणतो की साहेब आमचा पगार मिळालेला नाही त्याच्यावर लक्ष द्या तुम्ही सभासद आहात तर जे आम्ही बोलतो त्याच्यावर कमीत कमी प्रशासनाने लक्ष द्यावे आणि आयुक्त् साहेबांना माझी विनंती आहे अगर आपल्याला परमनन्ट करुन पगार परवडत नसेल तर कनिष्ठ वर्कर म्हणून त्यांना करु शकतो आणि त्याची पगाराची मर्यादा आपण कमी करु शकतो. तिसरी गोष्ट आता आपण इंजिनिअर घेतले ते ठेकेदार पध्दतीने घेतले. आज ठेकेदार पध्दतीने जे इंजिनिअर घेतले गेले ते इंजिनिअर यांना घेण्यासाठी 2-2 लाख रुपये ठेकेदारांनी घेतलेले आहेत. हा माझा आरोप आहे आणि मी हे सिध्द करुन दाखवू शकतो. मग तो 2-2 लाख रुपये घेणार आणि त्याला पगार मिळणार ते 12-13 हजार रुपये हा कुठला नियम आहे. त्या लोकांनी फुकट काम करायचे का?

मा. महापौर :-

ह्याबाबत आपण लेखी तक्रार करा आणि प्रशासनाने सन्मा. सदस्य गजरे साहेब यांनी केलेली तक्रारीचा योग्य उत्तर त्यांना देण्यात यावे. अशा प्रकारची घटना पूढे घडता कामा नये. तुमचा ठराव मांडा.

दौलत गजरे :-

मॅडम प्रशासन काय कारवाई करणार ते सांगा.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, प्रशासनाने जो गोषवारा दिलेला आहे 34 कामगार, 1 करोड 55 लाख म्हणजे प्रत्येक सफाई कामगारांच्या मागे 38 हजार रुपये महिना खर्च करणार आहे हे कॅलक्युलेशन कुठून काढलं. इंजिनिअरला किती पगार देता तुम्ही?

संभाजी पानपट्टे (मा. अति. आयुक्त) :-

अंदाजे दिलेला आहे आणि त्याच्यामध्ये शाळा पण इनक्लूड केलेल्या आहेत.

अनिल सावंत :-

सगळे करा त्याच्यामध्ये ही कामगारांची लिमिटेशन टाका. 34 कामगार दिलेले आहेत त्याच्यासाठी 1 करोड 55 लाख एकाला 38 हजार रुपये?

संभाजी पानपट्टे (मा. अति. आयुक्त) :-

त्यांना मिनिमम व्हेजेसप्रमाणे पगार देणार आहोत. आम्ही शाळांमध्ये पण इनक्लूड केलेले आहेत.

अनिल सावंत :-

तुम्ही शाळा इनक्लूड करा. तुम्ही कामगार वाढवणार आहात का?

संभाजी पानपट्टे (मा. अति. आयुक्त) :-

हो कामगार वाढवणार आहोत.

अनिल सावंत :-

आज इंजिनिअरला 15-20 हजार पगार देत आहेत.

संभाजी पानपट्टे (मा. अति. आयुक्त) :-

याच्यामध्ये शाळेचे पण इनक्लूड केलेले आहेत त्यामुळे संख्या वाढणार आहेत.

सुरेश खंडेलवाल :-

ठरावामध्ये रेक्टीफाय करा.

अनिल सावंत :-

त्याच्यामध्ये रेक्टीफाय करा आणि ही अमाऊंट कुठून काढलेली आहे 38 हजार रुपये सफाई कामगाराला 10 ते 15 हजार तरी मिळतात का? परत आपण कॉन्ट्रॅक्टरचे पोट भरत आहेत.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम, एक तो कॉन्ट्रॅक्ट देते टाईम हम लोग किसी भी निविदा को मंजूरी ऐसे ही अंदाजी बोलके दे रहे है कितने बढायेंगे यहॉ पे 34 की संख्या मेंशन कि है अभी बोल रहे की और उसमे ॲन्ड करेंगे तो ॲक्युरेट कितने कामगार लेनेवाले है इसका कई पे कोई निश्चित आकडा नही रहता है| उसके बाद एकबार कॉन्ट्रॅक्ट दे देते है उस पे फिर कोई निगरानी करनेवाला सुपरव्हीजन करनेवाला मनपा के तरफसे कोईभी कही भी नही रहता है जहा कॉन्ट्रॅक्ट दे रहे हो| पिछली महासभा जब हुई 9 तारीख को उसमे अनिल सावंतजीने सफाई कामगारोंका विषय शौचालय का विषय लिया था| उसपर भी मॅडम आपने रुलींग दिया था की उसपे कारवाई की जायेगी| तो एक हप्ता हो गया उसपर अभी तक क्यों कारवाई नही हुई? हम लोग यहॉ महासभा मे चिल्लाते है, आप रुलींग देते है| लेकीन उसपे कोईभी अंमलबजावणी कभी होती ही नही|

मा. महापौर :-

हम एक काम कर सकते है इनका पगार कट करेंगे| इन्होने अगर काम नही किया तो उस अधिकारी का पगार कट करेंगे|

मा. अतिरिक्त आयुक्त :-

प्रतिदिन साफसफाई होते. मुख्य कार्यालयाला साफसफाई होते.

मा. महापौर :-

हा विषय फार महत्वाचा आहे. सन्मा सदस्या स्नेहा पांडे मॅडमने जो विषय मांडलेला आहे आपल्या मागच्या तहकुब सभेमध्ये साहेब शौचालय साफ झालेली नाहीत. आज माझ्या दालनामध्ये सफाई कामगार बसले होते. त्यांना 3 महिन्यांचा पगार मिळाला नाही. मी रवि साहेबांना फोन केला, आज ते आले नाहीत घरी आहेत म्हणाले. परंतु साहेब तुम्हाला एवढी संधी मिळाली होती त्या दिवसामध्ये काय केले. एकतर त्या ठेकदाराकडून तुम्ही काम तरी करुन घ्या नाहीतर त्याच्यावरती कारवाई तरी करा. काही तरी करा. शहरामध्ये शौचालय तरी साफ ठेवा. आणि असे जर होत असेल तर त्या संबंधीत विभागाचा अधिकारी हा जबाबदार असेल त्याने तिथे प्रश्न मांडायचा. मी इथे रुलींग द्यायचे आणि तुम्ही लोकांनी काहीच काम नाही करायचं हे नाही चालणार ना.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. ठेकेदाराला नोटीस दिलेली आहे आणि त्याच्यावर कारवाई करणार आहोत. मध्यंतरी वॉटर प्रोसेस ते पुढच्या आठवड्यात येणार आहे म्हणून आम्ही थांबलो आहोत. ते वॉटर प्रोसेसिंग केल्यानंतर ती त्याच्यावर कारवाई करणार आहोत. त्याच्यावर 100 टक्के करणार आहोत.

अनिल भोसले :-

कमिशनर साहेब स्वत: शहरामध्ये व्हीजीट मारुन अनेक लोकांनी तक्रारी केलेल्या आहेत. त्याच्यावर आपण कधी कारवाई करणार?

(सभागृहात गोंधळ)

अनिल भोसले :-

आयुक्त साहेब आपण व्हीजीटला आलेले त्यावेळेला आदिवासी महिलांनी आणि लोकांनी तक्रार केल्या. कमिशनर साहेबांच्या समोर केल्या.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

संबंधित ठेकेदारावर आम्ही कारवाई करणार आहोत. नविन टेंडर काढणार आहोत.

अनिल भोसले :-

कधी?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

पुढच्या एक महिन्यामध्ये. वॉटर प्रोसेसिंग अचानक बंद करता येत नाही. स्वच्छ भारतमध्ये वॉटर प्रोसेसिंग पुढच्या आठवड्यात देणार आहोत.

अनिल भोसले :-

तुम्ही परिसरामध्ये व्हीजीटला चला. बघा काय परिस्थिती आहे ती. कधी करणार त्याच्यावर कारवाई?

दौलत गजरे :-

महापौर मॅडम, ज्या गटाराचे आता टेंडर झालेले आहे त्या गटाराची साफसफाईसाठी आयुक्त साहेबांनी स्वत: व्हीजीट करावी. ते कसे साफ झाले आहेत ते तुम्ही बघा.

अनिल भोसले :-

महापौर मॅडम, कमिशनर साहेबांनी विचारा याच्यावर कारवाई कधी करणार?

मा. महापौर :-

प्रविण पाटील साहेब जर तुम्ही ठराव मांडला नाही.......

प्रविण पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय व 6 प्रभाग कार्यालय इमारतीमध्ये दैनंदिन साफसफाईची कामे करण्यासंदर्भात हाउस कीपिंग संस्थेमार्फत साफसफाई करणे कामी 34 कंत्राटी कामगार नेमणे कामी अंदाजित वार्षिक खर्च 1 कोटी 55 लाख रुपये अपेक्षित आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, महानगरपालिका आर्थिक अडचणीतून जात असून काही वायफळ खर्चावर मर्यादा घालणे अत्यंत जरुरीचे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगार म्हणून 685 कर्मचारी व शिपाई तथा सफाई कामगार म्हणून 8 कर्मचारी कायमस्वरुपी कार्यरत आहेत. सदरच्या कर्मचाऱ्यांकडून सदरचे काम करुन घेतल्यास महानगरपालिकेचे 1 कोटी 55 लाख रुपये वाचणार आहेत. त्यामुळे सदरच्या कामाकरीता निविदा न मागवता कायमस्वरुपी सफाई कर्मचाऱ्यांकडून कामे करुन घ्यावीत असा मी ठराव मांडत आहे. तसेच 495 सफाई कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. त्या सर्व रिक्त पदांची भरती स्थानिक नागरिकांना प्राधान्य देऊन भरती प्रक्रिया राबविण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

विनोद म्हात्रे :-

मॅडम अतिशय चांगला विषय विषयपटलावर आणला आहे. ह्या शहरातील लोकांना याचा लाभ मिळणार आहे. नोकरी मिळणार आहे. परंतु माझ्या माहिताप्रमाणे अग्निशमन दल, सफाई कर्मचारी ह्याचे जे ठेकेदार आहेत तर इथे भरती होताना जे काय भरती करतात त्या डिपार्टमेंटला त्यांच्याकडून लाख, दिड लाख रुपये घेतले जातात. असे माझ्या निर्दशनास आलेले आहे. आणि ह्यापुढे जर अशी परिस्थिती झाली तर त्या ठेकेदारावर कारवाई करणार कधी?

मा. महापौर :-

आयुक्त साहेब असे काही आहे का?

विनोद म्हात्रे :-

समोर येऊन आम्हांला सांगतात. दिड लाख मागीतले, एक लाख मागितले.

मा. आयुक्त :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. ह्यापूर्वी पण इंजिनिअरच्या अनुषंगाने सन्मा. सदस्यांनी बोलले होते. याबाबत अतिशय बारकाईने चौकशी केली जाईल. आणि असे जर दोशी कॉन्ट्रॅक्टर कोण असेल किंवा परस्पर कुठल्याही कर्मचाऱ्याकडून कॉन्ट्रॅक्टवर काम करत असाताना कोण गैर काम करत असेल तर त्याच्यावर प्रशासन कडक कारवाई करेल.

विनोद म्हात्रे :-

थॅंक्यू सर.

वर्षा भानुशाली :-

महापौर मॅडम, अभी थोडी देर पहले झोपडपट्टी के लिये बहूत सारी सहानुभूती यहा से दिखाई दे रही थी| लेकीन जब हम लोग झोपडपट्टी का विषय लेके ॲडीशनल कमिशनर के पास जाते है लोगो के सिग्नेचर लेके वहा के शौचालय के बार मे| पानपट्टे साहब, दो, महिना, चार महिना हो गया मै आपके केबिन मे आयी थी| कौनसा शौचालय है आपको याद है क्या? मुर्धा खाडी का वहाॅ पे लोग, सर हम लोग इतना खर्चा करते है हरबार टेंडर निकालते है काफी सारी लोगोने बात कीया लेकीन निचेतक हम लोग करतेही क्या है, ॲक्शन लेते है क्या? सर मै आपको भी बोलती हूॅ आयुक्त साहब, आप वॉक विथ कमिशनर बहूतही अच्छा है| मिरा भाईंदर मे बहूत अच्छा काम किया| लेकीन अभी झोपडपट्टीमे भी यह काम किजीयेना| क्योंकी आज मुझे लगता है की, यह नया कॉन्ट्रॅक्ट हमने दिया

था| शाईन कंपनी मुझे लगता है की, हर नगरसेवकने कंम्प्लेंट किया है| कोई भी बाकी नही होगा सर| मेरे वॉर्ड मे सबसे जादा झोपडपट्टी का एरिया आता है और इतनी परिस्थिती खराब है आज भी आप शामको चलीये मेरे साथमे इतने शौचालय के दरवाजे तुटे है मॅडम उसके पानी का पंप लिकेज रहता है| लेकीन हमारा उसके तरफ ध्यान ही नही होता है| अगर काम करना है तो बाकी हरबार शौचालय का विषय आता है आप हमे यहा पे देते है की नही हम अॅक्शन लेंगे| लेकीन क्या कुछ अंदर की बात हुई क्या जो उसके उपर अॅक्शन नही लिया जाता है| हर अधिकारी को 2% मिलता है| शायद इसके लिए आप उसके उपर अॅक्शन नही लेते है| यह मेरा आरोप है आपके उपर| क्योंकी सर हम लोग कोरोना काल मे इतनी बिकट परिस्थिती मे हम लोग यहा से निकले है| हम अच्छे से घरोमे बैठते है| हमारा हर मास्टर बेडरुम है लेकीन उस झोपडपट्टीवालो का क्या गलती है साहब? तीन तीन बार मैने पब्लिक का सिग्नेचर देने के बाद भी आप लोग अॅक्शन नही लेते है| वो क्या आपका रिलेटीव्ह है? सर इसका मुझे अन्सर चाहिए| क्योंकी अभी इलेक्शन आ रहा है| हर गली मे एक नेता पैदा हो रहा है जो युट्युब पर व्हिडीओ डाल रहा है| सर उन लोगो को ग्राऊंड लेव्हलपर काम करना है| लेकीन उसपे आपका सपोर्ट कहा मिल रहा है| हमे उसके उपर इतनी मेहरबानी क्यों है? एक भी शौचालय अगर आपको सही ढंग से मिलेगा सर तो जो बोलेंगे हम लोग करेंगे| सिर्फ व्यासपिठ से हमे आश्वासन मिलता है| आप एक बार सर झोपडपट्टी मे हमारे साथ एक दिन व्हिजीट लो|

मा. महापौर :-

ठिक आहे. ते उत्तर देत आहेत.

वर्षा भानुशाली :-

याचे मला नीट उत्तर द्यावे.

मा. महापौर :-

या विषयावर भरपुर चर्चा झालेली आहे. आपल्या सगळ्या भावना पोहचलेल्या आहेत. गेल्या वेळेलासुध्दा आपण ह्या विषयावर खुप चर्चा केली.

सुरेश खंडेलवाल :-

ह्या शहराच्या हितासाठी एक चांगली सुचना आहे. ह्या ठेकेदाराला 3 वर्षासाठी मी तुम्हांला सांगतो आपण एक एक वर्ष सर्वांना आपण देता. आपण ह्या ठेकेदाराला एवढे प्रेम करुन आपण 3 वर्षासाठी 18 कोटी मध्ये आपण ह्यांना टॉयलेट साफसफाईचा ठेका दिलेला आहे आणि ही परिस्थिती याची आपल्याला पण कल्पना आहे आणि इकडचा एकही नगरसेवक साहेब सांगु शकतो. माझे असे स्पष्ट मत आहे की ह्याला लगेच ब्लॅकलिस्ट करा. ह्याचा ठेका संपवा. नाहीतर हे आपल्याला परत प्रत्येक महासभेमध्ये ही चर्चा तुम्हांला ऐकायला मिळणार मॅडम. माझी विनंती आहे तुम्हांला.

वर्षा भानुशाली :-

महापौर मॅडम, प्रशासन को खुलासा करने के लिए बोले|

मा. महापौर :-

आयुक्त महोदय याच्यावरती लगेच अॅक्शन घ्या. नाहीतर हे काही योग्य वाटत नाही. येत्या पावसाळ्यामध्ये पुन्हा नागरीकांना त्रास होईल. जी शौचालय आहेत त्यांची दुरुस्ती फटाफट करुन घ्या आणि नगरसेवकांनी जिथे सांगितले आहे ते त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत तर त्यांनी जिथे प्रत्यक्ष जावून पाहणी केली आहे. आणि त्यांच्या वॉर्डातील मागतील त्याठिकाणी त्यांना तक्रार देतात. म्हणून ते इथे येवून सभागृहामध्ये बोलतात आणि सभागृहातच बोलत नाही तर समस्त संबंधीत अधिकाऱ्यांना पण सांगत असतात. पण ते दुर्लक्ष करताना जे असे अधिकारी असतील जे खरोखर दुर्लक्ष करतात, मला असे वाटते त्यांचेच पेमेंट थांबवा. त्यांना पेमेंट देऊ नका जोपर्यंत शौचालय साफ होत नाही तोपर्यंत त्यांना पेमेंट देऊ नका. त्या ठकेदराला तर नाहीच द्यायचे. तर ते संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचे पेमेंटसुध्दा थांबवून ठेवा. तोपर्यंत काम होणार नाही.

स्नेहा पांडे :-

मॅडम उसका कॉन्ट्रॅक्ट रद्द किजीए|

मा. महापौर :-

कॉन्ट्रॅक्टरला तर पेमेंट द्यायचे नाहीच पण संबंधित विभागाचा अधिकारी जो कोणी असेल त्याला अपॉईंट केले आहे एस.आय. किंवा त्यांचे अधिकारी वरच्या उपायुक्तांपर्यंत पेमेंट थांबवून ठेवा. तिथे त्याने रिझल्ट द्यावा आणि मग त्यांचे पेमेंट द्यावे.

जयंतीलाल पाटील :-

ब्लॅकलिस्टमध्ये टाकून ठेवा.

मा. महापौर :-

दोन ठराव आलेले आहेत. मतदानाची प्रक्रिया सुरु करावी.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 11 साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला सुचक राकेश शाह, अनुमोदन सिमा शाह यांचा दुसरा ठराव सुचक प्रविण पाटील, अनुमोदन अशरफ शेख यांचा आहे. प्रथम प्रविण पाटील यांचा ठराव मतदानासा टाकतो ह्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करावे.

मा. महापौर :-

सुचक श्री. राकेश शाह यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 43, विरोधात 19, तटस्थ 2 इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. राकेश शाह यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. 11 :-

मनपा मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई कामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणे कामाची निविदा मागविणेबाबत.

ठराव क्र. 13 :-

उपरोक्त गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई करणेकामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणेकरीता निविदा मागविणेस व रु.1 कोटी 55 लाख या रक्कमेस तसेच सदर प्रस्तावात मनपाच्या शाळा इमारती व इतर इमारतींमध्ये हाऊस किपिंग एजन्सी नेमणेकामी प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १ | पाटील धनेश परशुराम | १. अहमद साराह अकरम |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | पाटील प्रविण मोरेश्वर | २. पाटील अनिता जयवंत |
| ३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ४ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ४ | नलावडे दिनेश दगडु | |
| ५ | मेहता डिंम्पल विनोद | ५ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ६ | मदन उदितनारायण सिंह | ६ | घरत तारा विनायक | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | कदम अर्चना अरुण | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | भोईर भावना राजू | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | भोईर कमलेश यशवंत | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | मोकाशी दिपाली आनंदराव | १४ | सावंत अनिल दिवाकर | |
| १५ | जैन सुनिता रमेश | १५ | शेख रुबीना फिरोझ | |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | १६ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १७ | नाईक विविता विवेक | १७ | परदेशी गिता हरीश | |
| १८ | भावसार वंदना संजय | १८ | पाटील नरेश तुकाराम | |
| १९ | बेलानी हेमा राजेश | १९ | जैन गीता भरत | |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| २१ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २३ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २४ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २५ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २८ | कांगणे मीना यशवंत | | | |
| २९ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३० | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३१ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३२ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३४ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३५ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ३६ | भोईर गणेश गजानन | | | |
| ३७ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ३८ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४० | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४१ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४२ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४३ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 12, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात पडणारे खड्डे Jet Patcher Pothole Patching Machine द्वारे बुजविणे कामाबाबत.

शानु गोहिल :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात मोठया प्रमाणावर पाऊस होत असतो. पावसाळयात विशेषत: भरतीच्या वेळी पाण्याचा निकास न झाल्याने रस्त्यावर पाणी साचुन खड्डे होत असतात. पावसाळी दिवसात सदर खड्डे हे खडीकरणाने भरुन बुजविण्यात येतात. तथापी डांबरीकरणाने सदर खड्डे बुजविता येत नाहीत. पावसाळयात पडणारे असे खड्डे कोल्डमिक्स व्दारे Jet patcher Pothole Patching Machine व्दारे बुजविता येणे शक्य आहे.

तरी सदरचे काम Jet patcher Pothole Patching Machine तंत्रज्ञानाद्वारे करण्याकरीता सन 2022-23 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षातंर्गत करणेस रु.5.00 कोटीच्या निविदा मागविणे व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. 12 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात पडणारे खड्डे Jet Patcher Pothole Patching Machine द्वारे बुजविणे कामाबाबत.

ठराव क्र. 14 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात मोठया प्रमाणावर पाऊस होत असतो. पावसाळयात विशेषत: भरतीच्या वेळी पाण्याचा निकास न झाल्याने रस्त्यावर पाणी साचुन खड्डे होत असतात. पावसाळी दिवसात सदर खड्डे हे खडीकरणाने भरुन बुजविण्यात येतात. तथापी डांबरीकरणाने सदर खड्डे बुजविता येत नाहीत. पावसाळयात पडणारे असे खड्डे कोल्डमिक्स व्दारे Jet patcher Pothole Patching Machine व्दारे बुजविता येणे शक्य आहे.

तरी सदरचे काम Jet patcher Pothole Patching Machine तंत्रज्ञानाद्वारे करण्याकरीता सन 2022-23 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षातंर्गत करणेस रु.5.00 कोटीच्या निविदा मागविणे व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 13, रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देणेबाबत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, अनु. क्र. 1 ते 93 पर्यंत जे ठिकाण आणि प्रस्तावित ना आहेत. महापौर मॅडम त्यांना महासभेच्यावतीने ठराव काही सदस्यांनी नंतर नाव दिली होती ती नावे यामध्ये समाविष्ठ केलेली आहेत.

मा. महापौर :-

यामध्ये सर्व पक्षाच्या सदस्यांनी माझ्याकडे नंतर नाव आणून दिलेली होती पत्राद्वारे मग ती नाव याच्यामध्ये नमुद केलेली आहेत. हे सगळ नाव आता वाचायची का?

निलम ढवण :-

महापौर मॅडम याच्यात एक ऑब्जेक्शन आहे.

अशरफ शेख :-

महापौर मॅडम, याच्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे. तुम्ही हा जो गोषवारा दिलेला त्यामध्ये पान क्र. 8 मिरारोड पुनम सागर परिवार हॉटेल समोरचा चौक तुम्ही काहीतरी नाव ह्याच्यात दिलेले आहे. परंतु 19/10/2005 मध्ये ठराव क्र. 42 मध्ये ऑलरेडी त्या चौकाला नाव देण्यात आलेले होते.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ठिक आहे आपण ते काढलेले आहे.

मा. महापौर :-

ऐका अशी नाव जर दिले असतील काय होते आता गेल्या पिरेडला जे सदस्य असतील त्यांनी जर नाव दिलेले आहे आणि आता नविन सदस्य आले असतील तर त्याला माहित आहे ते नाव दिलेले आहे. आता आपण ते वगळू जे पहिला नाव दिले आहे तेच मंजूर असणार.

गिता जैन :-

मला फक्त एक विचारायचे आहे गोषवाऱ्याप्रमाणेच तुमचा ठराव असेल तर आमचे काही म्हणणे नाही. पण जर गोषवाऱ्यात काही आहे आणि ठरावात काही दुसरं आहे तुमच्या रस्त्याचे नाव किंवा काय तर जरा आम्हाला कळवा बदल असेल तर सांगा नाही तर आम्ही वाचतो. काही प्रॉब्लेम नाही.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ठरावामध्ये मध्यंतरीच्या काळात असं झाल होत ठराव की त्यामध्ये कोणीही वैयक्तिक नाव देण्यात येऊ नये परंतु ह्या ठरावामध्ये काही वैयक्तिक नाव दिली गेली होती. त्यामुळे आपण ती नाव ठरावामध्ये वगळून दुसरी नाव देण्यात आलेली आहेत.

निलम ढवण :-

नाही मग त्या ठरावातील नाव कोणी वैयक्तिक दिली असतील. वैयक्तिक देऊ नये म्हणजे?

प्रशांत दळवी :-

वैयक्तिक म्हणजे कोणी आपल्या आईवडिलांची नाव आपण ते दि. 26/6/2021 ला जे धोरण ठरवलं त्या धोरणानुसार महापौर मॅडम आपण तिथे नाव दिलेली आहेत. त्यामध्ये काही नाव डबल टीबल झाली होती पण त्यामधले एक नाव आपण तिथे सुचवलेले आहे.

निलम ढवण :-

जी बदललेली आहेत ती तुम्ही वाचा ना. अनुक्रमांक आणि दिलेले नाव वाचा.

प्रशांत दळवी :-

मग सगळीच वाचावे लागतील.

निलम ढवण :-

सगळी नको सगळीच बदलली का?

गिता जैन :-

मॅडम परत प्रश्न हा होणार आपण आताच प्रश्न उद्भवला आहे की तुम्ही ती यादी वाचली नाही आहे म्हणून महासभेत ती यादी वाचली नाही म्हणून ती कशी मंजूर होणार? महासभेत नाव वाचली नाहीत मग ती कशी मंजूर होणार?

मा. महापौर :-

नाव वाचा सर्व सदस्यांना विनंती आहे नाव वाचन सुरु होणार आहे सगळ्यांनी निट ऐका नंतर तुम्हाला काय ऑब्जेक्शन असेल तर लिहून ठेवा त्यांचे वाचून झाल्यानंतर हात वर करा मी बोलायची संधी देईन.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ह्या चौक नामकरणाचा वाचन करण्यापूर्वी दि. 23/6/2021 रोजीचा जो आपण ठराव केलेला होता विविध रस्ते, सार्वजनिक जागा नामकरण करण्यासाठी धोरण ठरवलं होतं त्या धोरणाचा ठराव अॅक्च्युअली मी तुम्हाला अगोदर वाचून दाखवतो. मिरा भाईंदर शहरातील विविध रस्ते, चौक, सार्वजनिक जागा, महापालिकेच्या इमारती, पालिकेने विकसीत केलेली आरक्षणे यांचे नामकरण करणेकरीता खालीलप्रमाणे धोरण निश्चित करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

1) महापालिकेच्या नामकरणाबाबत पूर्वी घेतलेल्या निर्णयात पून:श्च बदल करण्यात येवू नये.
2) ज्या थोर व्यक्ती, महापुरुष व शहरातील समाजसेवक यांचे नाव द्यावयाचे आहे त्या व्यक्तींबाबतची सविस्तर माहिती प्रस्ताव देणाऱ्यांनी प्रस्तावात नमुद करणे आवश्यक आहे. तसेच नाव द्यावयाच्या व्यक्तींनी राज्य पातळीवर सामाजिक काम केलेले असावे.
3) नाम फलकातील मजकूर मराठी व हिंदी भाषेत असणे आवश्यक राहील.
4) नामफलकाचा आकार वास्तुच्या आकारावर अवलंबून राहील.
5) जिवंत व्यक्तींचे नाव देण्यात येवू नये.
6) महापालिकेचे दिवंगत पदाधिकारी उदा. महापौर, उपमहापौर व तीन वेळा निवडून आलेले सन्मा. सदस्य यांची नावे देणेस हरकत नसावी.
7) सदरचे धोरण हे नविन नामकरण व नविन लावण्यात येणाऱ्या नामफलकाबाबत असेल.

रस्ते चौक नामकरण ह्याठरावामध्ये प्रविण मोरेश्वर पाटील, विरोधी पक्षनेते यांनी देखील सुचना मांडलेली आहे. महानगरपालिकेने यापूर्वी शहरातील विवीध रस्ते, चौक, सार्वजनिक जागा यांना स्वातंत्र्य सैनिंकांची व महापुरुषांची नावे दिलेली आहेत. नामकरणाचे फलक अजुनही काही ठिकाणी लावलेले नाहीत. ते नामफलक लावावेत अशी सुचना त्यांनी मांडलेली होती. त्यामध्ये ह्या ठरावात सन्मा. सदस्या गिता जैन यांनी पण पुढील प्रमाणे सुचना मांडलेली आहे. महानगरपालिकेच्या वास्तुची देखभाल करणेसाठी त्या त्या परिसरातील सफाई कर्मचारी किंवा स्वच्छता निरीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी. त्यांचेवर जबाबदारी दिली तर आपली वास्तु सुव्यवस्थित राहील. महापौर मॅडम हा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला होता आणि म्हणून हा ठराव वाचत असताना

| **अ.क्र.** | **ठिकाण** | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| 1 | **पेणकरपाडा आरक्षण क्र.**353 (**उद्यान**) | स्वराज्य जननी जिजामाता उद्यान |
| 2 | घोडबंदर बस डेपो | नाना शंकर शेट बस डेपो |
| 3 | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.261 (उद्यान) | पद्मश्री नेक चंद सैनी<br>(भारताताातील प्रसिध्द रॉक गार्डन चे निर्माता) |
| 4 | शांती गार्डन सेक्टर 5 मधील आरक्षण क्र.336 मधील उद्यान | गानकोकीळा स्व. लता मंगेशकर उद्यान |
| 5 | मिरारोड (पु.) आरक्षण क्र.269 (उद्यान) | ज्ञानज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले उद्यान |
| 6 | शांती पार्क गोकुल व्हीलेज रस्ता | भगवान श्री महावीर स्वामी मार्ग |
| 7 | मिरारोड (पु.) आ.क्र.246 मैदान | पद्मभुषण मेजर ध्यानचंद मैदान |
| 8 | मिरारोड (पु.) हाटकेश गौरव संकल्प फेज-2 दुभाजक | हाटकेश्वर महादेव -जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र |
| 9 | भाईंदर (पु.) आर.एन.पी. पार्क सरोवर इमारत ते बाबाजी पॅलेस पर्यंत रस्ता | समाज सुधारक श्री नारायण गुरु रोड |

| | | |
|---|---|---|
| 10 | श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फ्राउंड्री बस थांबा | सहयाद्री नगर बस थांबा |
| 11 | भाईंदर (पु.) सचिन तेंडुलकर मैदानातील रंगमंच | नाटक लेखककार बळवंत पांडुरंग किर्लोस्कर |
| 12 | गोडदेव गाव, सामाजिक सभागृह | स्व. श्री. तुलशीदास म्हात्रे सभागृह |
| 13 | प्लीझंट पार्क खोडीयार कुंज जवळील उद्यान | प्लीझंट पार्क उद्यान |
| 14 | मिरारोड, कनकिया एल.आर.तिवारी इंजिनिअरींग व राहुल इंटरनॅशनल स्कुल मधील रस्ता | वीर हिंदसूर्य महाराणा प्रताप मार्ग |
| 15 | रामदेव पार्क, लाईफ लाईन केमिस्ट समोरील चौक | अजरामर चौक |
| 16 | हटकेश, मंगलनगर आरक्षण क्र.305 (उद्यान) | स्वतंत्रता सेनानी मंगल पांडे उदयान |
| 17 | कनकिया आ.क्र.300, 267 चौक | पद्मविभूषण जनरल बिपीन रावत चौक |
| 18 | कनकीया चौक (अंतरीक्ष इमारती जवळ) | श्री शनीधाम चौक |
| 19 | हटकेश, आ.क्र. 314 येथील चौक | भगवान गौतम बुध्द चौक |
| 20 | हाटकेश आ.क्र.314 मैदान | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान |
| 21 | हाटकेश हबटाऊन गंगासदन चौक | सरसंघचालक के. एस. सुदर्शन चौक |
| 22 | आरक्षण क्र.305 चौक | राणी लक्ष्मीबाई चौक |
| 23 | हटकेश ॲव्हेन्यु बिल्डींग ते पुजा पार्क (जॉगर्स पार्क) | मेजर ध्यानचंद जॉगर्स पार्क |
| 24 | पेणकरपाडा गाव व गणेश मंदीर रस्ता चौक | गणेश मंदीर चौक |
| 25 | राईगाव मैदान येथील नविन व्यासपीठ | संत श्री बालयोगी सदानंद महाराज व्यासपीठ |
| 26 | मिरारोड (पु.) नविन न्यायालय इमारत समोरील रस्ता | कै. दादासाहेब बी. पाटील मार्ग उर्फ डी.बी.पाटील मार्ग |
| 27 | आरक्षण क्र.242 मधील श्री जग वल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यानातील योगा केंद्र | स्वामी विवेकानंद योगा केंद्र |
| 28 | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 नीलकमल नाका, जनता व काशीगाव प्रवेशद्वार | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग व माता रमाबाई आंबेडकर प्रवेशद्वार |
| 29 | आर.एन.पी. पार्क कृष्णा आंगण इमारतीचे बाजुस असलेले उद्यान | काशी विश्वनाथ उद्यान |
| 30 | भारतरत्न सचिन तेंडूलकर मैदानातील जॉगींग ट्रॅक | पद्मश्री मिलखा सिंह जॉगिंग ट्रॅक |
| 31 | मिरारोड सॅन्ड स्टोन इमारती जवळ प्रभाग क्र.13 मधील स.क्र.431 मधील उद्यान | अद्वितीय उद्यान |
| 32 | भाईंदर (प.) स्वामी नारायण मंदीरा जवळील समाज मंदीर | श्री हरीकृष्ण महाराज सभागृह |

| | | |
|---|---|---|
| 33 | भाईंदर (प.) क्रांतीनगर समाज मंदीर | भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी ग्रंथालय |
| 34 | भाईंदर (प.) गणेश आनंद नगर येथील उद्यान | गणेश आनंद क्रांती नगर उद्यान |
| 35 | मिरारोड (पु.) बालाजी हॉटेल स्कायलॅन्ड कॉम्प्लेक्सच्या बाजुचे नियोजित ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र | संत शिरोमणी गाडगे महाराज विरंगुळा केंद्र |
| 36 | उत्तन भुतबंगला चौक | बॅरिस्टर काका बॅप्टीस्टा चौक |
| 37 | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 सागर हॉटेलकडून पेणकरपाडा गावात येणारा रस्ता | स्वामी विवेकानंद रोड |
| 38 | पेणकरपाडा येथील अग्निशमन केंद्र | क्रांतीवीर भगतसिंग अग्निशमन केंद्र |
| 39 | भाईंदर (पु.) आरक्षण क्र.108 या जागेवर विकसीत होत असलेली मार्केट इमारत | स्वातंत्र्य सैनिक कै. आत्माराम राजाराम भोईर मंडई |
| 40 | प्रभाग क्र.23 मधील मोर्वागाव येथील व्यायाम शाळा | बालयोगी श्री सदानंद महाराज व्यायाम शाळा |
| 41 | मौजे गोडदेव येथील विमल डेरी ते गोडदेव स्मशान मार्गापासून उत्तरेकडे जाणाऱ्या नवघर मैदान / गावाकडील रस्त्यास | श्री कलावती आई मार्ग |
| 42 | मिरागाव आरोग्य केंद्र | पद्मश्री सिंधुताई सपकाळ आरोग्य केंद्र |
| 43 | मिरारोड (पु.) काशीगाव अपना घर 2 ते अपना घर 3 मधील रस्ता | चक्रवर्ती सम्राट अशोक मार्ग |
| 44 | जेसल पार्क या ठिकाणी जुनी पाण्याची टाकी तोडून त्या जागेवर तळ + 1 इमारत | स्वामी विवेकानंद समाज मंदीर |
| 45 | नवघर लोकमान्य टिळक सभागृहाच्या बाजुला असलेले योगा सेंटर | रामकृष्ण परमहंस योगा सेंटर |
| 46 | नवघर लोकमान्य टिळक सभागृहाच्या कम्पाऊंड मध्ये असलेले छोटे मैदान | संत गाडगे बाबा मैदान |
| 47 | मिरारोड (पु.) प्रभाग क्र.16 मधील आरक्षण क्र.331, 332, 333 व 334 मधील रस्ता | स्वामी विवेकानंद मार्ग |
| 48 | प्रभाग क्र.14 मधील काशिमिरा वैष्णोदवी मंदीरा लगत असलेला कम्युनीटी हॉल | माता जिजाऊ मंगल कार्यालय |
| 49 | आरक्षण क्र.305 येथील नियोजित सभागृह | माता रमाई आंबेडकर सभागृह |
| 50 | आरक्षण क्र.360 येथील उद्यानास | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले उद्यान |
| 51 | ग्रीन विलेज येथे तयार होणाऱ्या चौकास | स्व. आनंद दिघे चौक |
| 52 | मिरारोड (पु.) डेल्टा गार्डनच्या बाजुला बांधत असलेल्या ॲमिनीटी स्पेसमधील इमारतीस | महाराष्ट्र भुषण पद्मविभुषण शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे भवन |
| 53 | विजय पार्क  जांगीड इस्टेट येथील विरंगुळा केंद्रास | श्री स्वामी समर्थ विरंगुळा केंद्र |

| | | |
|---|---|---|
| 54 | प्रभाग क्र.21 मिरारोड पुर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स, कॅसेडेला समोरील चार रस्ता सृष्टी ब्रिज जवळील चौक | भारतरत्न स्व. अटलजी बिहारी वाजपेयी चौक |
| | प्रभाग क्र.21 मिरारोड पुर्व सृष्टी कल्पतरु समोरील तीन रस्ता जवळील चौक | स्व. प्रमोद महाजन चौक |
| 55 | शनी मंदीर प्लेंझंट पार्क शेजारी तयार होणाऱ्या रस्त्यास | श्री शनीश्वर मंदीर मार्ग |
| 56 | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.299 चार रस्ता पिनाकोला बिल्डींग जवळील चौक | वृंदावन चौक |
| 57 | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.314 मधील समाज मंदीर | संत रविदास सभागृह |
| 58 | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.314 समोरील चौक | कृष्णभक्त संत मीराबाई चौक |
| 59 | वर्सोवा हॉटेल एक्सप्रेस इन च्या आतुन हॉटेल सी ॲन्ड रॉक ते वर्सोवा गावाडे जाणारा रस्ता | राष्ट्रीय संत प.पु. आचार्य महाश्रमणजी मार्ग |
| 60 | प्रभाग क्र.15 मधील पांडुरंगवाडी येथील समाज मंदीर | संत नरहरी महाराज समाज मंदीर |
| 61 | भाईंदर (प) संत सेवालाल चौक ते तिरुपती हाईट रस्ता | श्री मुनिसुव्रत स्वामी नवग्रह मंदीर मार्ग |
| 62 | भाईंदर(पुर्व) नवघर गांव भाजी मार्केट व मच्छीमार्केट | स्वातंत्र्य सैनिक स्व. दामोदर सखाराम पाटील |
| 63 | जांगिड कॉम्पलेक्स येथील अंर्तगत डी.पी. रोड | टी.पी. पद्मनाभन नायर मार्ग |
| 64 | बी.पी. रोड येथील त्रिलोक दर्शन ते हवेली मंदीरापर्यंत जाणारा रस्ता | श्रीनाथजी हवेली मंदीर मार्ग |
| 65 | सेंट पॉल हायस्कुलच्या बाजुला असलेल्या चौकास | पंचमुखी चौक |
| 66 | भाईंदर (पु.) येथील जेसल पार्क चौपाटी ठिकाणी असलेल्या ओपन जिम | श्री बजरंगबली खुली व्यायाम शाळा |
| 67 | भाईंदर (पु.) येथील जेसल पार्क चौपाटी ठिकाणी असलेल्या ओपन महिला जिम | गोल्डन गर्ल पी. टी. उषा ओपन जिम |
| 68 | मिरारोड (पु.) शांतीनगर सेक्टर क्र.2 इमारत क्र. सी/9 ते इमारत क्र.सी/5 ते इमारत क्र.बी/3 पर्यंतचा रस्ता | श्री अंबाजी धाम मार्ग |
| 69 | प्रभाग क्र.13 मधील जे.पी. सर्कल येथील चौक | स्व. सुषमा स्वराज चौक |
| 70 | प्रभाग क्र.13 मधील गौरव व्हॅली सर्कल येथील चौक | स्व. शामाप्रसाद मुखर्जी चौक |
| 71 | आरक्षण क्र.230 या जागेवरील बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर | धम्म सम्राट अशोक बुध्द विहार |
| 72 | रा.म.क्र.8 येथील मन बिल्डींग समोरील वारकरी भवन, | संत ज्ञानेश्वर माऊली भवन |

| | | |
|---|---|---|
| 73 | जे.पी इन्फ्रा येथील ॲमिनीटी ओपन स्पेस मधील हिंदी भाषिक भवन | उपन्यास सम्राट मुन्शी प्रेमचंद भवन |
| 74 | काशिमिरा पोलिस स्टेशन जवळील पशु चिकीत्सालय | श्री गोवर्धन जीवदया पशु चिकीत्सालय |
| 75 | रा.म.क्र.8 येथील नाट्यगृहाशेजारील प्रस्तावित मराठा भवन | राजमाता जिजाऊ भवन |
| 76 | रा.म.क्र.8 येथील ठाकुर मॉल शेजारील नाट्यगृह | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह |
| 77 | लोढा कॉम्प्लेक्स येथील तरणतलाव | पद्मश्री पद्मभुषण जलतरणपटू मिहिर सेन तरणतलाव |
| 78 | आरक्षण क्र.357 येथील उर्दु शाळा | भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ शाळा |
| 79 | घोडबंदर बस डेपो जवळील ट्रक टर्मिनल ते 60 मी पर्यंतचा जोड रस्ता | भारतरत्न संत मदर तेरेसा मार्ग |
| 80 | सेंट पॉलच्या बाजुचा नविन रस्ता | पं. दिनदयाल उपाध्याय मार्ग |
| 81 | काशिमिरा वेस्टर्न पार्क येथील चौक | सदगुरु बाबा हरदेव सिंह जी महाराज चौक (निरंकारी बाबाजी) |
| 82 | आरक्षण क्र.364 येथील उद्यानास | स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान |
| 83 | काशिमिरा मांडवी पाडा येथील चौक | क्रांतीसुर्य बिरसा मुंडा चौक |
| 84 | मिरारोड (पु.) शनी मंदीर येथील प्लेझंट पार्क शेजारील नविन 15 मी. डी.पी. रस्ता | श्री शनीश्वर मंदीर मार्ग |
| 85 | रामदेव पार्क, सुभाष नगर, भवानी मेडीकल येथील चौक | मैथिल साहित्यकवि विद्यापती चौक |
| 86 | जरीमरी गावदेवी तलावा समोरील चौक | श्री क्षेत्र नारायणगड चौक |
| 87 | भाईंदर (पु.), खारीगाव भाजीमार्केट, कमल कुंज ते आशा बिल्डींग पर्यंतचा रस्ता | नगरसेवक स्व. शशिकांत भोईर मार्ग |
| 88 | भक्ती टॉवर ते पुनम ऑर्चिड येथील रस्ता | शौर्यचक्र मधुसुदन सुर्वे |
| 89 | आरक्षण क्र.301 येथील पे ॲन्ड पार्क | भगवान श्री परशुराम वाहनतळ |
| 90 | मंगल नगर भाजी मार्केट | श्री स्वामी समर्थ भाजी मार्केट |
| 91 | लतिफ पार्क येथील भाजी मार्केट | श्री संत निरंकारी भाजी मार्केट |
| 92 | आरक्षण क्र.245 येथील पे ॲन्ड पार्क | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वाहनतळ |
| 93 | साई करीष्मा बिल्डींग ते निकुंज निकेतन येथील रस्ता | भगवान धर्मराज चित्रगुप्त मार्ग |

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ज्या ज्या सुधारणा करायच्या असतील किंवा जे जे नाव सुचवायचे असतील एकएकाने बोला मी सगळ्यांना बोलायला देते. निलम ताई तुम्ही बोला.

निलम ढवण :-

महापौर मॅडम आता मला वाटतं प्रत्येक नगरसेवकांच्या अंडर ज्यांनी काम केली आहेत त्यांच्या प्रभागामध्ये तर त्या प्रभागातील वास्तुला किंवा इतर जे बांधकाम झालं असेल त्याला त्या नगरसेवकाला नाव देण्याची आता काय हे रोहिलेच नाही असे दिसून येते. कारण काही काही ठिकाणी म्हणजे ज्या प्रभागात आम्ही काम करतो त्या प्रभागातील वास्तुला देखील आता ही नाव कुठून आली मला माहिती नाही आणि त्याठरावात तर असे काही नाही आहे की कोणाच्याही प्रभागात कोणीही नाव सुचवायची आणि ते द्यायचं हे आहे का?

मा. महापौर :-

असे काही नाही.

निलम ढवण :-

मग हे कोणी ठरवलं?

प्रशांत दळवी :-

सभागृहाला मी सांगु इच्छितो की नामरणाचा विषय आहे यात जे जे नाव आलेली आहेत बांधकाम विभागाकडे त्या नावामधले आम्ही काही नाव ह्यामध्ये घेतलेले आहेत सर्व नाव घेता येत नाहीत. त्यामुळे महापौर मॅडम हे बाहेरुन कोणी दिलेली नाव नाहीत जी मी नाव वाचली ते सन्मा. सर्व लोकप्रतिनिधींनी दिलेली नाव आहेत.

निलम ढवण :-

सभागृहनेते मी तेच बोलत आहे मी माझ्याच प्रभागात बदल बोलत आहे मी इतरांचे बोलत नाही. माझ्या प्रभागातील वास्तु ज्या मी बांधत आहे ज्या मी बांधुन झालेल्या आहेत त्या वास्तुंना नाव कशी दिली गेली आणि कोणी दिली?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम हा सर्व अधिकार महासभेचा आहे.

निलम ढवण :-

तुम्ही वाचल्यावर नंतर महासभा रुलिंग देणार.

प्रशांत दळवी :-

नाव कोणी द्ययची ठराविक वास्तु बांधली त्या वास्तुला नगरसेवकाने आपली पाटी लावली ठिक आहे परंतु नाव देण्याचा अधिकार महासभेला आहे.

निलम ढवण :-

महासभेला आहे परंतु तुम्ही वाचल्यानंतर महासभा रुलिंग देणार असा तुम्ही काही ठराव कराल आणि आम्ही ऐकून घ्यायचं का? महासभेचे अधिकार आहेत. महासभेचे अधिकारात आहेत. पण तुम्ही जे वाचत आहेत तेव्हा ते रुलिंग देता येत ना.

मा. महापौर :-

तसे नसते मॅडम ऐका त्यांनी विषय मांडला आता त्या विषयावरती जी जी नाव आलेली आहेत त्यापैकी काही सदस्यांनी नाव सुचविलेली आहेत तुमच्याकडचे असतील किंवा इतकडचे असतील ही सुचविलेली नाव आहेत आणि ज्या एखाद्या वास्तुला किंवा मार्गाला नसेल सुचवलेली नाव ती नाव प्रशासनाकडे आपल्याकडे लिस्ट आली ना.

निलम ढवण :-

मी तेच सांगते मी माझ्या प्रभागाबद्दल बोलते मी पहिल्यापासून सांगत आहे माझ्याच प्रभागातील वास्तुंना एकतर मागच्या टर्ममध्ये दिलेले नाव आहे त्याला नावात बदल कसा काय झाला?

प्रशांत दळवी :-

अगोदरच वाचलेले आहे. महापौर मॅडम ह्या लिस्टमध्ये ही नाट्यगृहाचे नाव ही डबल आलेले आहे. परंतु आपण पहिलाच क्लियर केलेले आहे की ठरावाप्रमाणे 2021 ला जो ठराव झाला त्यामध्ये जर डबल नाव आली असतील तर त्याची कृपया प्रशासनाने ती नाव वगळण्यात यावी.

मा. महापौर :-

आपण ती नाव वगळून टाकणार. तुमच्या ठरावामध्ये तस तुम्ही म्हणा की जर आधी नाव दिलेलं असेल ती नाव आताच्या ठरावातुन वगळण्यात यावी याची प्रशासनाने दखल घ्यावी.

प्रशांत दळवी :-

डबल नाव आहेत ते तर वगळावीच लागतील.

निलम ढवण :-

सभागृहनेते जरा आमचे पण ऐका आम्ही विरोधात असलो तरी आमची पण म्हणणे असतात आमची ऐकायची प्रत्येक वेळा त्रास नाही करायचा. जरा ऐका नंतर बोला.

मा. महापौर :-

पूर्ण ऐकून घ्या.

निलम ढवण :-

अशा बऱ्याच गोष्टी आहेत हे तर तुम्हाला पटते का की त्यांची प्रभागाची वास्तु आपण काम करतो तर त्या वास्तुला नाव देणे हे आमचे कर्तव्य आहे ना? तुमचे म्हणणे काय आहे मी सांगते.

मा. महापौर :-

माझे म्हणणे हेच आहे की त्या नगरसेवकांनी सुचवायला पाहिजे. आता तुमच्या प्रभागामध्ये तुम्ही एकटेच नगरसेवक आहेत का?

निलम ढवण :-

माझे जरी चार असले आम्ही तिघे जण असलोत तरी त्या तिघांनी दोघांनी ते सुचविलेले आहे.

मा. महापौर :-

ही तहकुब सभा तिसरी आहे मग तुम्ही सुचवलं का तीन सभेमध्ये हा विषय आलेला आहे मग तुम्ही सुचवलं का?

निलम ढवण :-

काय.

मा. महापौर :-

तुमच्या बाकीच्या वास्तुला नाव सुचविलेली आहेत का? तुम्ही काय म्हणता ही नाव कशी आली.

निलम ढवण :-

नाही ते आले पण नाही मी तुमच्याकडे पण एक कॉपी दिली ते आलेच नाही.

मा. महापौर :-

ते नाव नाही आले आहे का?

निलम ढवण :-

नाही आले.

मा. महापौर :-

ठिक आहे मग ते नमुद करुन घ्या ना.

निलम ढवण :-

45 नंबरच्या याला ह्या ठरावात सभागृह जेव्हा मान्यता देते तर मग सभागृहाने हे ही ठरवना की प्रत्येक प्रभागामध्ये जे नगरसेवक काम करतात. त्यांनीच त्या वास्तुंना नाव द्यावीत. हे ही ठरवा.

मा. महापौर :-

तसे नियम नाही ना मॅडम.

निलम ढवण :-

असं कसं त्यांना त्यांचा अधिकार नाही? ते एवढ काम करणार.

मा. महापौर :-

त्यांनी नाही नाव दिली मग ती वास्तु अशीच सोडायची का?

निलम ढवण :-

असे होऊच शकत नाही.

मा. महापौर :-

असे होऊ पण शकते ना.

निलम ढवण :-

नाही होत.

मा. महापौर :-

कारण हा विषय माझा ह्या अडीच वर्षामध्ये पहिल्यांदा आलेला आहे. समजा नगरसेवकांनी नाही सुचविले त्या वास्तुला नाव मग ती वास्तु तशीच ठेवायची का?

निलम ढवण :-

महापौर मॅडम आमच्या नगरसेवकांनी आमच्या नगरसेवकांबद्दल आता बोलले शेवटी गटनेता आहे. आमच्या नगरसेवकांनी सुचविलेली नाव देखील ती कट करण्यात आलेली आहेत.

मा. महापौर :-

नाही असे होणार नाही. ती नाव द्या.

निलम ढवण :-

केलेली आहेत.

तारा घरत :-

आम्ही अगोदर नाव दिलेली आहेत. नाव वगळण्यात आलेली आहेत.

मा. महापौर :-

माझ्याकडे दिलेली आहेत का?

निलम ढवण :-

खांबित आज रजेवर आहेत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मी परत स्पष्ट करतो जी नाव आली नसतील राहिली असतील पुढच्या महासभेमध्ये घेण्यात यावी आणि जी नाव डबल आली असतील ती वगळण्यात यावी.

मा. महापौर :-

बरोबर.

निलम ढवण :-

महापौर मॅडम राजु भोईर आमचे सन्मा. नगरसेवक त्यांचे वडिल तीन वेळा सरपंच होते 5 वेळा नगरसेवक होते. एवढे सगळे असताना त्यांनी आपली जागा देखील त्या रस्त्याला दिलेली आहेत.

त्यांनी नाव दिलेली असताना त्यांच नाव खोडून दुसर नाव तिथे दिले गेले आहे. त्यांचे योगदान याच्यात काहीच नाही याच्यात मला सांगा.

मा. महापौर :-

दळवी साहेब अशी जी नाव असतील ती नमुद करुन घ्या.

प्रशांत दळवी :-

धोरण जे ठरलं ते धोरण सर्वानुमते महापौर मॅडम ठरलेले आहे की नाही ठरलेले आहे?

मा. महापौर :-

नाही त्यांचे काय म्हणणे आहे की 5 वेळा नगरसेवक निवडून आले आहेत.

प्रशांत दळवी :-

मी काय म्हणतो महापौर मॅडम जर असे असेल तर त्यांनी आपले परत पत्र आपल्याकडे द्वावं.

निलम ढवण :-

त्या संदर्भातील लेटर मी तुमच्याकडे देतो. त्यानुसार तुम्ही करेक्शन करुन घ्या. लेटर अगोदर दिलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

त्यांची जमीन घेतली सगळ काही झालं त्यांना तेवढे सहकार्य दिलेच पाहिजे ना. महापौर मॅडम आमची एकच विनंती तुम्हाला आहे आम्ही जी दिलेली नाव आहेत ती सगळी लेटर काढायला लावा मी 45 नंबरचे जे भाईंदर पूर्व आरक्षण क्रमांक आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम पूर्ण गोषवारा देऊन हा विषय पुढच्या महासभेत आणा.

निलम ढवण :-

नाही.

तारा घरत :-

पुढच्या वेळेला नाही यांना आताच हे करायला लावा.

मा. महापौर :-

नावामध्ये सगळ्या नगरसेवकांची रस्त्याला नावे, चौकाला नावे देण्याकरिता सर्व नगरसेवकांची नाव या प्रस्तावामध्ये आली नसतील तर पुढच्या महासभेमध्ये सदरचा प्रस्ताव नव्याने घेण्यात यावा असे मी रुलिंग देते.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, पुढच्या महासभेत नाही माझे ऐका.

मा. महापौर :-

आता राहू द्या. पुढच्या महासभेमध्ये. आता पुढची महासभा लागेलच.

निलम ढवण :-

पुढच्या महासभेला कशाला आम्ही लेटर दिलेली होती.................

मा. महापौर :-

आता प्रशासनाने नाही दिली याच्यामध्ये नमुद करुन तर आता काय करायचं खांबित आज नाही.

निलम ढवण :-

मी काय म्हणते मी आपल्याला पण लेटर दिलेले आहे.

मा. महापौर :-

मी त्यांना सांगितलं नमुद करायला प्रशासनाला.

निलम ढवण :-

आरक्षण क्र. 108 ला मागच्या टर्मला स्व. मिनाताई ठाकरे मंडळी म्हणून नाव दिलेले आहे. ते नाव चेंज करुन कोणीतरी दुसरं नाव दिलेले आहे तर ते नाव कट करण्यात यावं आणि मागच्या टर्मला जे नावं दिलं गेलं आहे तेच नाव ठेवण्यात यावं.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम जो ठराव झालेला आहे जो दळवी साहेबांनी ठराव मांडला तो पास करा आणि ज्यांची नाव राहिली असतील ती नाव तुमच्याकडे द्यावी ती पुढच्या महासभेत.........

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

एक लक्षात ठेवा अडीच वर्षापासून ह्या नावाचा गोंधळ आहे. म्हणून आपण हा विषय कधीही महासभेला घेतलेला नाही. आता बऱ्याच सदस्यांनी आपल्याला पत्रव्यवहार केला होता. मला ही केला होता. प्रशासनालाही केलेला असेल आणि त्या पध्दतीने ती लिस्ट आहे. आता त्याच्यामध्ये आपण धोरण ठरवले आहे. कारण हाच वादविवाद होतो म्हणून आपण ह्याच महासभेमध्ये धोरण ठरवलं की कशा पध्दतीने नाव द्यायची आहेत कोणीही उठते काही नाव देते. हे चालणार नाही म्हणून संत महात्मे, आपले थोर नेते किंवा आपल्या नगरसेवकांचे पण आपण घेतलेले आहेत की त्यांनी तीन टर्म चांगले काम केले आहे शहरामध्ये तीन टर्म तुम्ही ही आले आहेत. त्यांच पण नाव द्यायला पाहिजे असेही आपण नमुद केलेले आहे. त्या त्या पध्दतीने प्रत्येक नगरसेवकांनी ही नाव आपल्याला या ठिकाणी दिलेली आहेत. मी या प्रस्तावामध्ये दिलेली आहेत आणि ती मी वाचुन पण दाखवली. पण जर याच्यामध्ये असे झाले असेल मागच्या वेळेला एखादे नाव दिलेले आहे आणि त्याच रस्त्याला किंवा त्याच चौकाला पुन्हा नाव दिलं गेलं असेल तर आताचं नाव कॅन्सल करण्यांत यावं आणि मागचे नाव आहे ते गृहित धरायचे आहे. ही प्रशासनाची जबाबदारी आहे. कारण प्रशासनाने मागच्या नावाची लिस्ट आम्हाला दिलेलीच आहे. त्यामूळे ही प्रशासनाची संपूर्ण जबाबदारी आहे की मागे काय नाव दिले आहे ते पडताळून मगच या नावाला आपण तसं ठरावामध्ये पण नमुद केलेलं आहे आणि त्या व्यतिरिक्त कोणत्या नगरसेवकांची नाव राहिली असतील..........

(सभागृहात गोंधळ)

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम याच्यासाठी नंतर एक गटनेत्यांची बैठक बोलवू.

मा. महापौर :-

सन्मा. कैलासवासी यशवंत भोईर साहेब हे किती वेळा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत याची शहानिशा करुन त्यांचेही नाव याच्यामध्ये नमुद करण्यांत यावे.

निलम ढवण :-

मॅडम नगरसेवक सोडा त्यांची जागा घेतली. फ्रीमध्ये जमिनी घेतल्या आहेत.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम मी काय बोलतो. हा विषय आता अडीच वर्षानंतर आला आहे. माझी एक आपणांस विनंती राहील की आता जे पेंडींग आहे ते मेहरबानी करुन पुढच्या महासभेमध्ये घ्या. जेणेकरुन जे त्यांचे बाकी आहे ह्या मिरा भाईंदर शहराच्या विकासामध्ये मॅक्सेस मॉलच्या मनोबळीचं एक पत्र दिल आहे ते पण याच्यात घेण्यात आलेले नाही. मॅक्सेस मॉलचा जो मालक आहे मनुभाई मेहता.

मा. महापौर :-

व्यक्ती विशेष आपण नाव घेणार नाहीत. सर्व सामान्य जो कोणी असेल त्याचे ही नाव आपल्या कुठल्याही रस्त्याला, वास्तुला द्याव लागेल आपण महासभेमध्ये धोरण ठरवलं आहे आणि सर्वानुमते धोरण ठरवलेलं आहे ते आता बदलू शकत नाही.

तारा घरत :-

महापौर मॅडम माझ्या वॉर्डामध्ये दुसरा कोणी येईल आणि नाव देऊन जाईल.

निलम ढवण :-

मॅडम नामकरणाचा प्रस्ताव आजपर्यंत असा वादग्रस्त झाला नव्हता पण आज का झाला त्याचे कारण तुम्हाला नमुद करते की आज त्या वास्तुंना ज्या वास्तु ज्याच्या त्याच्या वॉर्डातल्या आहेत त्यांनी नाव देऊन देखील त्याची नावात बदल केला गेला म्हणून आज हा वाद निर्माण झाला नाही तर आजपर्यंतचा रेकॉर्ड आहे नामकरण कुठच्याही चौकाचे असू देत कुठेही असा वाद झाला नव्हता. आपआपले लेटर वाचुन दाखवत होते. बाहेरच्या बाहेर नाव बदलले गेले आहेत त्याच्यामुळे हा वाद निर्माण होत आहे.

तारा घरत :-

बाहेरच्या वॉर्डातल्या नगरसेवकांनी नाव दिली आहेत.

जयंतीलाल पाटील :-

नियमामध्ये राहून नाव दिली असतील तर ती नाव ठेवण्यात यावी. ही माझी नम्र विनंती आहे महापौर मॅडम.

मा. महापौर :-

अशी जर स्पष्ट नाव बदलली गेली असतील तर ती वगळण्यात यावी. मागील नाव जी आहेत तीच ठेवण्यांत यावी असे मी प्रशासनाला सांगते.

गणेश भोईर :-

नियमामध्ये राहून नाव दिलेली आहेत कोणी असे व्यक्तीविशेष टिप्पणी तुम्ही करु शकता.

तारा घरत :-

आनंद दिघे साहेबांचे नाव काढतो फालतु समजतो का आनंद दिघे नाव फालतु समजतो का?

गणेश भोईर :-

तुम्ही व्यक्ती विशेष टिप्पणी करु शकतो का कोणाच्या स्वत:च्या पैशाने नाही बांधले ते.

तारा घरत :-

दिघे साहेबांचे नाव........................

(सभागृहात गोंधळ)

गणेश भोईर :-

नियमामध्ये राहून नाव दिलेली आहेत. नियमामध्ये राहून ते केलेले आहे. व्यक्तीविशेष टिप्पणी नाही करु शकत आहे.

तारा घरत :-

हा माझ्या वॉर्डमध्ये ढवळाढवळ करतो........

गणेश भोईर :-

ते त्यांच्या स्वखर्चाने बांधलेले नाही.

मा. महापौर :-

तुम्ही सुचना करा नावावरुन का भांडता.

निलम ढवण :-

महापौर मॅडम त्यांच्या ठरावात त्यांना नमुद करायला सांगा........

मा. महापौर :-

माझे स्पष्ट मत आहे तुम्ही सांगितली नाव वाचुन दाखवा नाव वाचुन दाखवलेली आहेत.

निलम ढवण :-

ते बदल झाले आहेत ना.

मा. महापौर :-

मी सांगितले ना बदल करा असं.

निलम ढवण :-

त्या ठरावामध्ये सांगा बदल करायला.

मा. महापौर :-

ठरावामध्ये वाक्य नमुद करा की मागील नाव जी दिली असतील ते ठरावामध्ये वाचा.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मी परत सगळ्यांना सांगतो की दुबार नाव जे आले असेल ह्या लिस्टमध्ये तर ती प्रशासनाने वगळण्यात यावी.

निलम ढवण :-

दुबार नाही.

मा. महापौर :-

मागील नाव.

(सभागृहात गोंधळ)

प्रशांत दळवी :-

मागील दिली गेलेली नाव.

मा. महापौर :-

ती कायम करण्यात यावी मागील दिलेली.

निलम ढवण :-

महापौर मॅडम सर्व नगरसेवकांनी नाव दिलेली आहेत.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

कुठल्या विषयावरती तुम्ही भांडण करत आहात. एकतर शहराला नाव द्यायची आहेत, वास्तुला नाव द्यायची आहेत. मग पुन्हा कशाला वाद पाहिजे ठिक आहे सुचना मांडा नमुद करते. ज्या ज्या सुचना येतील सगळ्या नमुद केल्या जातील आणि ठराव सर्वानुमते मंजूर करायला नसेल तर तुमचा ठराव मांडा नाही तर तुमची नावाची ज्या ज्या सुचना एक एक सुचना त्या ठरावामध्ये नमुद करुन घेतल्या जातील एकएकाने सुचना मांडा.

निलम ढवण :-

महापौर मॅडम जस आपण रुलिंग दिली आहे की जी मागच्या टर्मला नाव दिली गेली आहेत महासभेत ती कायम ठेवावीत. त्यानंतर हा जो वाद ज्याच्या मुळे निर्माण झाला ते म्हणजे त्या त्या प्रभागातील नगरसेवकांनी जी लेटर दिलेली असतील त्यांची जी नाव आहेत ती नाव त्यांची कायम करण्यात यावीत. त्यानंतर हा वाद निर्माण होणार नाही. आमच्या वॉर्डात पण तुम्हाला अधिकार द्यायचा का हे करायला? स्व. आनंद दिघे साहेबांच्या नावाला आपण विरोध करुन तिथे कुठल्या दुसऱ्याचे नाव यांनी टाकले असे थोडी आम्ही खपवून घेणार.

दिपिका अरोरा :-

मॅडम एन.जी.ओ आणि संस्था पण नाव देत असतात. फक्त आपण नगरसेवक नाही शहराचा अधिकार आहे, संस्था पण देत असतात.

प्रशांत दळवी :-

हे नाव ऑलरेडी दिलं गेलं आहे. ह्या ठिकाणी ग्रीन व्हिलेज तयार होणाऱ्या चौकास स्व. आनंद दिघे साहेब चौक हे नाव दिलेले आहे.

मा. महापौर :-

तिथे मला सुधारणा करु देत. स्वर्गवासीच्या आधी धर्मविर हा शब्द टाका.

निलम ढवण :-

थँक्यु मॅडम. मॅडम त्यानुसार त्या त्या स्थानिक नगरसेवकांनी पत्र दिलेली असतील भले ती अगोदरच्या महासभेत कारण आता बरेच वर्ष हा नामकरणाचा विषय झालाच नव्हता सभागृहात आज तो आलेला आहे तर त्याच्यामुळे जर उर्वरीत राहिलेली त्या त्या स्थानिक नगरसेवकांनी जी नाव दिलेली आहेत त्यामध्ये कुठलाही बदल न करता स्थानिक नगरसेवकांनी दिलेल्या नावाचाच विचार करण्यांत यावा.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम एका प्रभागामध्ये चार नगरसेवक आहेत. त्यामुळे आपण काय केलेले आहे की प्रभागातील सोडून बाहेरचे कोणी नाव दिलेली नाहीत. सन्मा. सर्व लोकप्रतिनिधीनी दिलेली नाव ह्यामध्ये आपण गोषवाऱ्यामध्ये घेतलेली आहेत. त्यामुळे माझे नाही घेतले किंवा याचे नाही घेतले अशातला भाग नाही. डब्बल जे आलेली असतील तर ती रद्द करण्यात यावी.

मा. महापौर :-

तुमची काय नाव आहे त्याच्यामध्ये?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम काही लोकांनी जर धोरणाच्या विरोधात नाव दिलेली असतील तर ती घ्यायची का?

मा. महापौर :-

नाही.

प्रशांत दळवी :-

मग तोच विषय आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम यांनी आता जे सांगितले सभागृहनेत्यांनी तसा प्रकार आमच्या तरी प्रभागात झालेला नाही. मी आता माझ्या सन्मा. सहकारींना विचारल त्यांनी कुठल्याही मी केलेल्या वास्तुला त्यांनी कुठेही नाव दिलेले नाही. त्यांनी केलेल्या वास्तुला मी नाव दिलेले नाही. त्याच्यामुळे हा प्रश्न माझ्या प्रभागामध्ये नलावडे साहेब किंवा अर्चना कदम यांच्यामध्ये झालेलाच नाही.

मा. महापौर :-

तुम्ही कुठचे नाव दिले ते नाव सांगा. मग त्यामध्ये सुधारणा करु. तुमच्या कुठल्या नावाबद्दल ऑब्जेक्शन आहे ते नावच बोला फक्त.

निलम ढवण :-

सचिन तेंडुलकर मैदानातील जॉगींग ट्रॅकला अनुक्रमांक 35 आहे. भाईंदर पूर्व 108 जागेवर विकसित केलेले मार्केट, स्व. मिनाताई ठाकरे हे नाव मागच्या टर्मला दिलेले आहेत. दुसरा 13 नंबर आहे, भाईंदर पूर्व सचिन तेंडुलकर मैदानातील तिरंगा मंच स्व. धर्मवीर आनंद दिघे रंगमंच.

मा. महापौर :-

त्याच्यापुढे धर्मवीर नाव टाका.

निलम ढवण :-

हे नाव बदललेल आहे.

मा. महापौर :-

पाटील साहेब तुमच्याकडे लिस्ट आहे. गोषवाऱ्याची लिस्ट घ्या.

निलम ढवण :-

गोषवाऱ्यामध्ये दिलेल आहे पण ह्याच्यात दिलेलं नाही.

मा. महापौर :-

गोषवाऱ्यांमधली नाव टाकण्यात यावी.

निलम ढवण :-

सभागृहास वैश्यगुरु श्री वामना आश्रम स्वामी, प्रभाग क्र. 3 मधल्या सभागृहाला.

मा. महापौर :-

ते नमुद करण्यात यावे गोषवाऱ्यामध्ये आहे का?

निलम ढवण :-

तुमच्याकडे पत्र दिलेलं आहे. ह्या लिस्टच्या आधीच पत्र दिलेलं आहे.

प्रशांत दळवी :-

ह्याच्यामध्ये जी नावं आलेली आहेत ती आपण वाचून दाखवलेली आहेत. त्याच्या व्यतिरिक्त जी काही नाव ज्यांची ज्यांची द्यायची असतील बऱ्याचशा नगरसेवकांनी मला येऊन सांगितलेले आहे तर महापौर मॅडम हा गोषवारा वगळता हा ठराव वगळता आपण पुढच्या महासभेला ही सर्व नाव एकत्र देऊ.

निलम ढवण :-

आम्ही अगोदर महापौर मॅडमकडे नाव दिलेली आहेत. सभागृहनेता आम्ही महापौर मॅडमला ही नावांची कॉपी दिलेली आहे. प्रशासनाकडे देऊन 2 महिने झालेले आहेत.

प्रशांत दळवी :-

आपल्याकडे जी नाव आलेली आहेत ती आपण घेतलेली आहेत.

मा. महापौर :-

बऱ्याच सन्मा. सदस्यांनी आपआपली नाव दिली होती प्रशांत पाटीलने ती सर्व नावे श्री. दिपक खांबितकडे दिलेली आहेत. मग त्यांची नाव कशी राहिली. मग त्यांनी पण नाव नमूद करा. कोणाकोणाला नाव ॲड करायची त्यांनी हात वर करा. ती नाव लिहून इथे माझ्याकडे आणून द्या. हा विषय विषयपटलावरुन काढून काढा. पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

जर तुम्हाला नावच नाही द्यायची मग कशाला विषयपटलावरुन काढून टाका म्हणजे पुढच्या टर्मला येईल हा विषय.

(सभागृहात गोंधळ)

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम सभी से निवेदन है अगर आप कहोगे की यह जो ठराव है बाद में रखा जाए या बादमें लिया जाए वह प्रॉब्लेम नही है लेकिन इसी ठराव के अंदर कल जो हमने ओपनींग की वो भी नाम समाविष्ठ है| इसके बारे में भी जरा सोचीए|

निलम ढवण :-

महापौर मॅडम तुम्ही दिलेल्या सुचना पण बरोबर होत्या आणि त्या सुचना तुम्ही त्याच्यात ॲड करा आम्हाला ते मान्य आहे.

मा. महापौर :-

तस तुम्ही मान्य करा. तुम्ही वाद कशाला घालत आहेत. नाहीतर ही नाव पुढच्या टर्मला येतील मग त्यावेळी तुम्ही नगरसेवक असाल नसाल कोणाची गॅरंटी नाही.

निलम ढवण :-

आणि ज्या वास्तुंना ओपनिंग करणार त्यावेळी महापौर मॅडम जर रुलिंग नाही दिली तर आमच्या याच्यातील पण वास्तुंची ओपनिंग करायची आहे त्या वास्तुंना आम्ही नाव देऊन टाकणार.

मा. महापौर :-

ओपनिंग करा नाव द्या सगळ्यांना मान्यता आपण देऊ.

निलम ढवण :-

आयुक्त साहेब आम्ही जेव्हा आता ओपनिंग करणार त्यावेळी ते नाव देऊन टाकणार आहोत नंतर ऑब्जेक्शन कोणी घ्यायचं नाही आताच सांगते.

मा. महापौर :-

कुठलं ओपनिंग करायचं आहे?

निलम ढवण :-

आता जे वास्तु आहेत आणि ह्याच्यात जो फेरबदल झाला आम्ही दिलेली नाव तुम्ही सांगितली घ्या म्हणून ती नाव आम्ही देऊन टाकणार.

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम ह्या विषयाला अडीच वर्ष लागली.

मा. महापौर :-

मला असे वाटायला लागले की तुम्ही उगीच गोंधळ घालत आहेत. तुम्ही उगीच त्या विषयावरती गोंधळ घालत आहेत. नाहीतर पुढच्या टर्मला ती नाव येतील मी विषय पटलावरती पुन्हा विषय घेणार नाही.

धृवकिशोर पाटील :-

ठराव मांडलेला आहे तर त्याच्यामुळे ठराव त्यांनी मांडला तर ठिक नाही तर हा ठराव रद्द होऊ शकत नाही मॅडम. ठराव मांडलेला आहे रद्द करण्याकरिता मेजोरीटी तितकी असली पाहिजे.

मा. महापौर :-

ठराव झालेला आहे तुमची नाव ॲड करुन पाहिजे?

निलम ढवण :-

ॲड करुन पाहिजेत.

मा. महापौर :-

तर ठिक आहे. पण ॲड करुन कधी होतील आपले जे महासभेचे धोरण ठरलेले आहे त्या पध्दतीने ॲड होऊन येतील.

भावना भोईर :-

महापौर मॅडम माझा एक प्रश्न आहे प्रभाग क्र. 16 चा रोड आता 6 महिने पूर्ण झाले आहेत आधी त्याला नाव नव्हतं दिलं. आम्ही लेटर दिलेले आहे गोषवाऱ्यामध्ये त्याचं नाव आले आहे तरी त्याला नाव दिलेले नाही. ते नाव वगळून ह्यांनी दुसरं नाव दिलेले आहे मला तेच नाव हव आहे.

मा. महापौर :-

तस ऑब्जेक्शन असेल तर तुम्ही ते नाव द्या पण धोरणानुसार आहे का? आपले धोरण जे ठरलेले आहे त्यानुसार आहे का?

भावना भोईर :-

6 महिने झाली तो रोड झालेला आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे ते नाव नमुद करुन येईल.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम माझी आपणांस विनंती आहे ह्या सगळ्यांची नाव तुमच्याकडे घ्या आणि ते धोरण चेक करा आणि त्याच्यानंतर व्हेरीफाय करुन पुढच्या महासभेत घ्या.

मा. महापौर :-

हे काम मला नका देऊ प्रशासनाला द्या. ते खांबित साहेब करतील.

(सभागृहात गोंधळ)

धृवकिशोर पाटील :-

हा ठराव रद्द होऊ शकत नाही. फक्त सुचना प्रशांतजी ॲक्सेप्ट करतील तरच त्यांच्या सुचना होतील.

निलम ढवण :-

धृवजी प्रशासनाने आणली नाहीत तर ती प्रशासनाची चुक आहे त्यांनी उत्तर द्यावं. प्रशासनाने पुढे का घेतली नाहीत त्यांनी दिलेल्या याच्यात तुम्ही का बदल केलेत.

धृवकिशोर पाटील :-

ते प्रशासनाचे काम आहे.

मा. महापौर :-

आता जर तुम्हाला जी नाव द्यायची असतील ना तर तुम्ही ती नाव द्या प्रशासन ती पडताळणी करेल की, ती धोरणामध्ये बसतात की नाही बसत आणि ती नाव परत येतील. मग काय प्रॉब्लेम आहे तुम्ही नाव द्या. तुम्ही ती नाव प्रशासनाकडे द्या.

मर्लिन डिसा :-

मॅडम गोषवाऱ्याच्या लिस्टमध्ये 39 नंबर मध्ये स्व. श्रीम. उमा विश्वनाथ सपार मॅडम्......

दिनेश नलावडे :-

आपण जे नाव देण्यांत आले मग तिकडे लिस्ट मध्ये बदल कसे काय झाले?

मर्लिन डिसा :-

मॅडम 39 नंबरमध्ये मिरारोड नयानगर ते शितल नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील चौक हे आमच्या उमार सपार काकू यांच्या नावाने दिलेले आहे पण ते नाव वाचलेले नाही. ह्या मॅडम तीनदा नगरसेविका होत्या. 2002,2007 आणि 2019 मध्ये आणि ऑन ड्युटी कार्यरत असताना त्या वारलेत तर त्यांच्या नावाने आमच्या एका रस्त्याचे नाव द्यायचे होतं ते नाव ह्या लिस्टमध्ये नाही.

मा. महापौर :-

ते नाव नमुद करुन घेण्यांत यावं. नाव सांगा आणि ऐका तुमची कोणाकोणाची नाव राहिली असतील ती सगळी रितसर माझ्याकडे द्या, प्रशासनाकडे पण द्या आणि प्रशासन मागच्या धोरणाप्रमाणे नमुद करुन त्याचं नाव नमुद करण्यात येईल. मला असे वाटते की ह्या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. सन्मा. सर्व सदस्यांना विनंती आहे की ज्यांची ज्यांची नाव राहिलेली आहेत त्यांनी प्रशासनाकडे पुन्हा एकदा पत्रव्यवहार करावा. मागील महासभा धोरणानुसार प्रशासन त्याच्यावरती योग्य ती तपासणी करुन ती नाव मागच्या टर्मची आहेत की आताची आहेत नियमात असतात की नाही बसत त्याप्रमाणे त्याची दखल घेऊन ह्या ठरावामध्ये नमुद करुन घेण्यात येतील. ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

दिपिका अरोरा :-

प्रकरण क्र. 6 यामध्ये डबल नाव आलेले आहे.

मा. महापौर :-

आपण प्रशासनाला सांगितले तपासणी करुन घ्यायला. प्रशासनाला सांगितलेले आहे बडल नाव असतील तर घेता येणार नाही. मागील जे नाव असेल तेच खर नाव.

दिपिका अरोरा :-

पण ही ठरावामध्ये सुचना मांडावी लागेल ना. तुम्हाला सुचना घ्यायला लागेल.

मा. महापौर :-

सुचनेमध्ये नमुद करुन घ्या.

दिपिका अरोरा :-

महापौर मॅडम हे नाव 2013 मध्ये दिलेले आहे गोकुळ व्हिलेज रोडला.

मा. महापौर :-

दळवी साहेब नमुद करुन घ्या.

दिपिका अरोरा :-

प्रकरण क्र. 6 हे रिपीट नाव आलेले आहे माझी सुचना नमुद करुन घ्या.

मा. महापौर :-

सर्व नगरसेवकांनी जी जी पत्रव्यवहार केलेले असतील आजच्या महासभेच्या नंतरची अगोदरची पण आणि आताची पण तुमच्या ठरावामध्ये लिहून घ्या. सर्व नगरसेवकांनी आजच्या तारखेच्या मागील..........

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मी पुन्हा एकदा सांगतो की जी नगरसेवक आता नाव सांगत आहेत त्या नगरसेवकांनी आपआपली नावे प्रशासनाकडे द्यावीत प्रशासन त्याच्यावरती रितसर कार्यवाही करेल म्हणजे तो आपला ठराव जे धोरण आपले जे ठरलेले आहे त्या धोरणानुसार असतील तर ते मागवले जातील आणि ती पुढच्या सभेत घेऊन आपण त्याला ठराव करु.

(सभागृहात गोंधळ)

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम हा ठराव वेगळा का वाचला?

मा. महापौर :-

त्यांची जी नाव आहेत ती नमुद करुन घ्या ना.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ही नाव प्रशासनाने द्यायची असतात. प्रशासनाने जी दिली ती आम्ही घेतली.

मा. महापौर :-

प्रशासनाने द्यायला पाहिजे तर प्रशासनाला हे लोक देतील.

प्रशांत दळवी :-

उद्या महापौर मॅडम त्या वास्तुला ऑलरेडी नाव दिलेले असेल तर मग त्याला जबाबदार कोण? ठराव झालेला आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम तुमचे रुलिंग जर हे ऐकत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करा.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

ही सभा नीट चालवायची असेल आणि तुमची नाव यावी असे वाटत असेल तर जागेवर जाऊन बसा.

निलम ढवण :-

महापौर मॅडम तुम्ही वारंवार रुलिंग देत आहेत तरी ही हे तुमचे दोन सदस्य त्याला मान्यता देत नाही त्याच काय?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम प्रशासनाने 74 नाव दिली होती. आपण 93 नाव घेतली.

मा. महापौर :-

ठिक आहे जेव्हा मी म्हणे ना तुम्हाला की ह्या नावामध्ये त्यांची नाव नमुद करुन घ्या प्रॉब्लेम काय आहे?

निलम ढवण :-

बरोबर आहे.

मा. महापौर :-

ते काम प्रशासनाचे आहे ते करतील ना. असं प्रत्येक ठिकाणी आपली मनमानी नाही चालतं असं नाही चालणार. दळवी साहेब असं चालणार नाही. त्यांची नाव नमुद करुन घ्या. प्रशासन बघेल काय करायचं ते.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम प्रशासनाने खुलासा करावा सभागृहात दिलेली नाव घेता येतील का?

मा. महापौर :-

अस होत नाही हो असे होत नाही. ते पण सन्मा. नगरसेवक आहेत. त्यांना ही नाव द्यायची असतील ना तर त्यांनी पत्रव्यवहार केला तर ह्या ठरावामध्ये ती नाव नमुद करुन घ्या आणि प्रशासनाने त्याची दखल घेऊन निटपणे त्याच्यानंतर ठरवायचं आहे किती नाव द्यायची की नाही नाही द्यायची. तुम्ही प्रशासनावरती सोडा. तुम्ही आपल्या अंगावर का घेत आहात? हे नाही चालणार.

जयंतीलाल पाटील :-

महासभेमध्ये महापौरांचा आदेश हा अंतिम आदेश असला पाहिजे.

मा. महापौर :-

पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 13 :-

रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देणेबाबत.

ठराव क्र. 15 :-

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| 1 | **पेणकरपाडा आरक्षण क्र**.353 (**उद्यान**) | स्वराज्य जननी जिजामाता उद्यान |
| 2 | घोडबंदर बस डेपो | नाना शंकर शेट बस डेपो |
| 3 | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.261 (उद्यान) | पद्मश्री नेक चंद सैनी (भारतातातील प्रसिध्द रॉक गार्डन चे निर्माता) |
| 4 | शांती गार्डन सेक्टर 5 मधील आरक्षण क्र.336 मधील उद्यान | गानकोकीळा स्व. लता मंगेशकर उद्यान |
| 5 | मिरारोड (पु.) आरक्षण क्र.269 (उद्यान) | ज्ञानज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले उद्यान |
| 6 | शांती पार्क गोकुल व्हीलेज रस्ता | भगवान श्री महावीर स्वामी मार्ग |
| 7 | मिरारोड (पु.) आ.क्र.246 मैदान | पद्मभुषण मेजर ध्यानचंद मैदान |

| | | |
|---|---|---|
| 8 | मिरारोड (पु.) हाटकेश गौरव संकल्प फेज-2 दुभाजक | हाटकेश्वर महादेव -जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र |
| 9 | भाईंदर (पु.) आर.एन.पी. पार्क सरोवर इमारत ते बाबाजी पॅलेस पर्यंत रस्ता | समाज सुधारक श्री नारायण गुरु रोड |
| 10 | श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फ्राउंड्री बस थांबा | सहयाद्री नगर बस थांबा |
| 11 | भाईंदर (पु.) सचिन तेंडुलकर मैदानातील रंगमंच | नाटक लेखककार बळवंत पांडुरंग किर्लोस्कर |
| 12 | गोडदेव गाव, सामाजिक सभागृह | स्व. श्री. तुलशीदास म्हात्रे सभागृह |
| 13 | प्लीझंट पार्क खोडीयार कुंज जवळील उद्यान | प्लीझंट पार्क उद्यान |
| 14 | मिरारोड, कनकिया एल.आर.तिवारी इंजिनिअरींग व राहुल इंटरनॅशनल स्कुल मधील रस्ता | वीर हिंदसूर्य महाराणा प्रताप मार्ग |
| 15 | रामदेव पार्क, लाईफ लाईन केमिस्ट समोरील चौक | अजरामर चौक |
| 16 | हटकेश, मंगलनगर आरक्षण क्र.305 (उद्यान) | स्वतंत्रता सेनानी मंगल पांडे उदयान |
| 17 | कनकिया आ.क्र.300, 267 चौक | पद्मविभूषण जनरल बिपीन रावत चौक |
| 18 | कनकीया चौक (अंतरीक्ष इमारती जवळ) | श्री शनीधाम चौक |
| 19 | हटकेश, आ.क्र. 314 येथील चौक | भगवान गौतम बुध्द चौक |
| 20 | हाटकेश आ.क्र.314 मैदान | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान |
| 21 | हाटकेश हबटाऊन गंगासदन चौक | सरसंघचालक के. एस. सुदर्शन चौक |
| 22 | आरक्षण क्र.305 चौक | राणी लक्ष्मीबाई चौक |
| 23 | हटकेश अॅव्हेन्यु बिल्डींग ते पुजा पार्क (जॉगर्स पार्क) | मेजर ध्यानचंद जॉगर्स पार्क |
| 24 | पेणकरपाडा गाव व गणेश मंदीर रस्ता चौक | गणेश मंदीर चौक |
| 25 | राईगाव मैदान येथील नविन व्यासपीठ | संत श्री बालयोगी सदानंद महाराज व्यासपीठ |
| 26 | मिरारोड (पु.) नविन न्यायालय इमारत समोरील रस्ता | कै. दादासाहेब बी. पाटील मार्ग उर्फ डी.बी.पाटील मार्ग |
| 27 | आरक्षण क्र.242 मधील श्री जग वल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यानातील योगा केंद्र | स्वामी विवेकानंद योगा केंद्र |
| 28 | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 नीलकमल नाका, जनता व काशीगाव प्रवेशद्वार | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग व माता रमाबाई आंबेडकर प्रवेशद्वार |
| 29 | आर.एन.पी. पार्क कृष्णा आंगण इमारतीचे बाजुस असलेले उद्यान | काशी विश्वनाथ उद्यान |
| 30 | भारतरत्न सचिन तेंडूलकर मैदानातील जॉगींग ट्रॅक | पद्मश्री मिलखा सिंह जॉगिंग ट्रॅक |

| | | |
|---|---|---|
| 31 | मिरारोड सॅन्ड स्टोन इमारती जवळ प्रभाग क्र.13 मधील स.क्र.431 मधील उद्यान | अद्वितीय उद्यान |
| 32 | भाईंदर (प.) स्वामी नारायण मंदीरा जवळील समाज मंदीर | श्री हरीकृष्ण महाराज सभागृह |
| 33 | भाईंदर (प.) क्रांतीनगर समाज मंदीर | भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी ग्रंथालय |
| 34 | भाईंदर (प.) गणेश आनंद नगर येथील उद्यान | गणेश आनंद क्रांती नगर उद्यान |
| 35 | मिरारोड (पु.) बालाजी हॉटेल स्कायलॅन्ड कॉम्प्लेक्सच्या बाजुचे नियोजित ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र | संत शिरोमणी गाडगे महाराज विरंगुळा केंद्र |
| 36 | उत्तन भुतबंगला चौक | बॅरिस्टर काका बॅप्टीस्टा चौक |
| 37 | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 सागर हॉटेलकडून पेणकरपाडा गावात येणारा रस्ता | स्वामी विवेकानंद रोड |
| 38 | पेणकरपाडा येथील अग्निशमन केंद्र | क्रांतीवीर भगतसिंग अग्निशमन केंद्र |
| 39 | भाईंदर (पु.) आरक्षण क्र.108 या जागेवर विकसीत होत असलेली मार्केट इमारत | स्वातंत्र्य सैनिक कै. आत्माराम राजाराम भोईर मंडई |
| 40 | प्रभाग क्र.23 मधील मोर्वागाव येथील व्यायाम शाळा | बालयोगी श्री सदानंद महाराज व्यायाम शाळा |
| 41 | मौजे गोडदेव येथील विमल डेरी ते गोडदेव स्मशान मार्गापासून उत्तरेकडे जाणाऱ्या नवघर मैदान / गावाकडील रस्त्यास | श्री कलावती आई मार्ग |
| 42 | मिरागाव आरोग्य केंद्र | पद्मश्री सिंधुताई सपकाळ आरोग्य केंद्र |
| 43 | मिरारोड (पु.) काशीगाव अपना घर 2 ते अपना घर 3 मधील रस्ता | चक्रवर्ती सम्राट अशोक मार्ग |
| 44 | जेसल पार्क या ठिकाणी जुनी पाण्याची टाकी तोडून त्या जागेवर तळ + 1 इमारत | स्वामी विवेकानंद समाज मंदीर |
| 45 | नवघर लोकमान्य टिळक सभागृहाच्या बाजुला असलेले योगा सेंटर | रामकृष्ण परमहंस योगा सेंटर |
| 46 | नवघर लोकमान्य टिळक सभागृहाच्या कम्पाऊंड मध्ये असलेले छोटे मैदान | संत गाडगे बाबा मैदान |
| 47 | मिरारोड (पु.) प्रभाग क्र.16 मधील आरक्षण क्र.331, 332, 333 व 334 मधील रस्ता | स्वामी विवेकानंद मार्ग |
| 48 | प्रभाग क्र.14 मधील काशिमिरा वैष्णोदवी मंदीरा लगत असलेला कम्युनीटी हॉल | माता जिजाऊ मंगल कार्यालय |
| 49 | आरक्षण क्र.305 येथील नियोजित सभागृह | माता रमाई आंबेडकर सभागृह |
| 50 | आरक्षण क्र.360 येथील उद्यानास | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले उद्यान |
| 51 | ग्रीन विलेज येथे तयार होणाऱ्या चौकास | स्व. आनंद दिघे चौक |

| | | |
|---|---|---|
| 52 | मिरारोड (पु.) डेल्टा गार्डनच्या बाजुला बांधत असलेल्या ॲमिनीटी स्पेसमधील इमारतीस | महाराष्ट्र भुषण पद्मविभुषण शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे भवन |
| 53 | विजय पार्क जांगीड इस्टेट येथील विरंगुळा केंद्रास | श्री स्वामी समर्थ विरंगुळा केंद्र |
| 54 | प्रभाग क्र.21 मिरारोड पुर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स, कॅसेडेला समोरील चार रस्ता सृष्टी ब्रिज जवळील चौक | भारतरत्न स्व. अटलजी बिहारी वाजपेयी चौक |
| | प्रभाग क्र.21 मिरारोड पुर्व सृष्टी कल्पतरु समोरील तीन रस्ता जवळील चौक | स्व. प्रमोद महाजन चौक |
| 55 | शनी मंदीर प्लेंझंट पार्क शेजारी तयार होणाऱ्या रस्त्यास | श्री शनीश्वर मंदीर मार्ग |
| 56 | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.299 चार रस्ता पिनाकोला बिल्डींग जवळील चौक | वृंदावन चौक |
| 57 | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.314 मधील समाज मंदीर | संत रविदास सभागृह |
| 58 | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.314 समोरील चौक | कृष्णभक्त संत मीराबाई चौक |
| 59 | वर्सोवा हॉटेल एक्सप्रेस इन च्या आतुन हॉटेल सी ॲन्ड रॉक ते वर्सोवा गावाडे जाणारा रस्ता | राष्ट्रीय संत प.पु. आचार्य महाश्रमणजी मार्ग |
| 60 | प्रभाग क्र.15 मधील पांडुरंगवाडी येथील समाज मंदीर | संत नरहरी महाराज समाज मंदीर |
| 61 | भाईंदर (प) संत सेवालाल चौक ते तिरुपती हाईट रस्ता | श्री मुनिसुव्रत स्वामी नवग्रह मंदीर मार्ग |
| 62 | भाईंदर(पुर्व) नवघर गांव भाजी मार्केट व मच्छीमार्केट | स्वातंत्र्य सैनिक स्व. दामोदर सखाराम पाटील |
| 63 | जांगिड कॉम्पलेक्स येथील अंर्तगत डी.पी. रोड | टी.पी. पद्मनाभन नायर मार्ग |
| 64 | बी.पी. रोड येथील त्रिलोक दर्शन ते हवेली मंदीरापर्यंत जाणारा रस्ता | श्रीनाथजी हवेली मंदीर मार्ग |
| 65 | सेंट पॉल हायस्कुलच्या बाजुला असलेल्या चौकास | पंचमुखी चौक |
| 66 | भाईंदर (पु.) येथील जेसल पार्क चौपाटी ठिकाणी असलेल्या ओपन जिम | श्री बजरंगबली खुली व्यायाम शाळा |
| 67 | भाईंदर (पु.) येथील जेसल पार्क चौपाटी ठिकाणी असलेल्या ओपन महिला जिम | गोल्डन गर्ल पी. टी. उषा ओपन जिम |
| 68 | मिरारोड (पु.) शांतीनगर सेक्टर क्र.2 इमारत क्र. सी/9 ते इमारत क्र.सी/5 ते इमारत क्र.बी/3 पर्यंतचा रस्ता | श्री अंबाजी धाम मार्ग |
| 69 | प्रभाग क्र.13 मधील जे.पी. सर्कल येथील चौक | स्व. सुषमा स्वराज चौक |
| 70 | प्रभाग क्र.13 मधील गौरव वॅली सर्कल येथील चौक | स्व. शामाप्रसाद मुखर्जी चौक |

| | | |
|---|---|---|
| 71 | आरक्षण क्र.230 या जागेवरील बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर | धम्म सम्राट अशोक बुध्द विहार |
| 72 | रा.म.क्र.8 येथील मन बिल्डींग समोरील वारकरी भवन, | संत ज्ञानेश्वर माऊली भवन |
| 73 | जे.पी इन्फ्रा येथील ॲमिनीटी ओपन स्पेस मधील हिंदी भाषिक भवन | उपन्यास सम्राट मुन्शी प्रेमचंद भवन |
| 74 | काशिमिरा पोलिस स्टेशन जवळील पशु चिकीत्सालय | श्री गोवर्धन जीवदया पशु चिकीत्सालय |
| 75 | रा.म.क्र.8 येथील नाट्यगृहाशेजारील प्रस्तावित मराठा भवन | राजमाता जिजाऊ भवन |
| 76 | रा.म.क्र.8 येथील ठाकुर मॉल शेजारील नाट्यगृह | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम नाट्यगृह |
| 77 | लोढा कॉम्प्लेक्स येथील तरणतलाव | पद्मश्री पद्मभुषण जलतरणपटू मिहिर सेन तरणतलाव |
| 78 | आरक्षण क्र.357 येथील उर्दु शाळा | भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ शाळा |
| 79 | घोडबंदर बस डेपो जवळील ट्रक टर्मिनल ते 60 मी पर्यंतचा जोड रस्ता | भारतरत्न संत मदर तेरेसा मार्ग |
| 80 | सेंट पॉलच्या बाजुचा नविन रस्ता | पं. दिनदयाल उपाध्याय मार्ग |
| 81 | काशिमिरा वेस्टर्न पार्क येथील चौक | सदगुरु बाबा हरदेव सिंह जी महाराज चौक (निरंकारी बाबाजी) |
| 82 | आरक्षण क्र.364 येथील उद्यानास | स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान |
| 83 | काशिमिरा मांडवी पाडा येथील चौक | क्रांतीसुर्य बिरसा मुंडा चौक |
| 84 | मिरारोड (पु.) शनी मंदीर येथील प्लेझंट पार्क शेजारील नविन 15 मी. डी.पी. रस्ता | श्री शनीश्वर मंदीर मार्ग |
| 85 | रामदेव पार्क, सुभाष नगर, भवानी मेडीकल येथील चौक | मैथिल साहित्यकवि विद्यापती चौक |
| 86 | जरीमरी गावदेवी तलावा समोरील चौक | श्री क्षेत्र नारायणगड चौक |
| 87 | भाईंदर (पु.), खारीगाव भाजीमार्केट, कमल कुंज ते आशा बिल्डींग पर्यंतचा रस्ता | नगरसेवक स्व. शशिकांत भोईर मार्ग |
| 88 | भक्ती टॉवर ते पुनम ऑर्चिड येथील रस्ता | शौर्यचक्र मधुसुदन सुर्वे |
| 89 | आरक्षण क्र.301 येथील पे ॲन्ड पार्क | भगवान श्री परशुराम वाहनतळ |
| 90 | मंगल नगर भाजी मार्केट | श्री स्वामी समर्थ भाजी मार्केट |
| 91 | लतिफ पार्क येथील भाजी मार्केट | श्री संत निरंकारी भाजी मार्केट |
| 92 | आरक्षण क्र.245 येथील पे ॲन्ड पार्क | भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वाहनतळ |
| 93 | साई करीष्मा बिल्डींग ते निकुंज निकेतन येथील रस्ता | भगवान धर्मराज चित्रगुप्त मार्ग |

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी      अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 14, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी देणेबाबत.

अशरफ शेख :-

मॅडम एक चांगली सुचना आहे. आपल्या मिरा भाईंदरमध्ये जेवढे बगीचे आणि मैदाने आहेत तिथे एक ही राष्ट्रपिता महात्मा गांधींचा पुतळा नाही आहे. म्हणून प्रत्येक बगीचा आणि प्रत्येक गार्डनमध्ये महात्मा गांधी यांचा पुतळा उभारण्यात याचा अशी मी प्रशासनाला विनंती करतो.

रिटा शहा :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या नविन इलेक्ट्रीक बसेस खरेदी करण्याकरीता प्रस्ताव मंजुर असुन इलेक्ट्रीक बस आल्यानंतर प्रवासी तिकीट दर फेररचनेचा निर्णय घेणे संयुक्तीक ठरणार असल्याने तुर्तास परिवहन उपक्रमाचा प्रस्तावित प्रवासी तिकीट दर फेररचनेचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सिमा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 14 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी देणेबाबत.

ठराव क्र. 16 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या नविन इलेक्ट्रीक बसेस खरेदी करण्याकरीता प्रस्ताव मंजुर असुन इलेक्ट्रीक बस आल्यानंतर प्रवासी तिकीट दर फेररचनेचा निर्णय घेणे संयुक्तीक ठरणार असल्याने तुर्तास परिवहन उपक्रमाचा प्रस्तावित प्रवासी तिकीट दर फेररचनेचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. रिटा शाह अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 15, जेष्ठ विरंगुळा केंद्रातील मासीक अनुदानात वाढ करणे.

रुपाली मोदी :-

मिरा भाईंदर महापालिकेच्या ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रास महापालिकेतर्फे दर महिन्याला रक्कम रु.10,000/- अनुदान देण्यात येते. ज्येष्ठ नागरीकांच्या विविध संस्थांनी विरंगुळा केंद्रात सदस्यांची संख्या व कार्यक्रम वाढल्याने मासिक अनुदानात वाढ करण्याची मागणी केली असल्यामुळे

महापालिकेने मिरा भाईंदर शहरातील विरंगुळा केंद्रांना मासिक रु.15000/- अनुदान देण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे तसेच प्रशासनाने अनुदानाची रक्कम संस्थांच्या बँक खात्यामध्ये प्रती माह 10 तारखेपर्यंत जमा करावी.

वंदना भावसार :-

माझे अनुमोदन आहे.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम याचा गोषवारा आमच्याकडे आलेला नाही.

मा. महापौर :-

बरोबर आहे, ह्या विषयाचा गोषवारा आला नाही ही गोष्ट खरी आहे. प्रशासनाला या विषयावरती गोषवारा द्यायला हवा होता. जेष्ठ नागरिकांचे विरंगुळा केंद्र आपल्या शहरामध्ये आहेत आणि त्यांनी वारंवार मागणी केलेली आहे कोरोना काळामध्ये सुध्दा ती केंद्र बंद होती. त्यांची मागणी अशी होती की त्यांना जे मानधन दिले जात आहे 10 हजार त्यामध्ये आणखीन थोडी वाढ व्हायला पाहिजे. कारण ते विरंगुळा केंद्रामध्ये काय होत असते की त्यांचे समवयी जे आहेत ते सगळे एकत्रित येऊन त्याठिकाणी त्यांचा एखादा बर्थडे असेल तो साजरा करतात किंवा एखादी मिटींग घेतात. त्या वेळेला चहापाणी म्हणा किंवा एखादा थोडासा कार्यक्रम असला तर एखादे फुलगुच्छ गुलाबाचे फुल जरी द्यायचं म्हटलं तरी तो खर्च असतो तर अशा वेळेला हा खर्च त्यांच्यावरती कमी पडतो. 10 हजार रुपये म्हणून त्याच्यामध्ये 5 हजार रुपये वाढवून त्यांना मिळावेत अशी त्यांनी मागणी केली होती. तर आपले काय म्हणणे आहे ते आपण ठिक आहे ठराव सर्वानुमते मंजूर.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम विरंगुळा केंद्र किती आहेत?

मा. महापौर :-

9 आहेत.

अनिल सावंत :-

मग 15 कशाला 20 हजार करा.

प्रविण पाटील :-

माझी एक विनंती आहे आमचे नवघरचे विरंगुळा केंद्र आहे. जवळ जवळ 1200 च्या आसपास सदस्य आहेत. ते सर्वांत मोठे मिरा भाईंदरमध्ये विरंगुळा केंद्र आहे. अनिल सावंतने जी सुचना मांडली 20 हजार तरी करण्यांत यावी.

मा. महापौर :-

आपण आता सध्या 5 हजार वाढवूया. पुढच्या टर्मला आपण परत सगळे निवडून येणार तेव्हा आपण नक्की याच्यावरती चांगला निर्णय घेऊ. ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 15 :-

जेष्ठ विरंगुळा केंद्रातील मासीक अनुदानात वाढ करणे.

ठराव क्र. 17 :-

मिरा भाईंदर महापालिकेच्या ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्रास महापालिकेतर्फे दर महिन्याला रक्कम रु.10,000/- अनुदान देण्यात येते. ज्येष्ठ नागरीकांच्या विविध संस्थांनी विरंगुळा केंद्रात सदस्यांची संख्या व कार्यक्रम वाढल्याने मासिक अनुदानात वाढ करण्याची मागणी केली असल्यामुळे महापालिकेने मिरा भाईंदर शहरातील विरंगुळा केंद्रांना मासिक रु.15000/- अनुदान देण्यास ही मा. महासभा मंजुरी देत आहे तसेच प्रशासनाने अनुदानाची रक्कम संस्थांच्या बँक खात्यामध्ये प्रती माह 10 तारखेपर्यंत जमा करावी.

**सुचक :- श्रीम. रुपाली शिंदे मोदी          अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 16, महानगरपालिका हद्दीतील बेवारस पशु, पक्षी, जनावरे यांचे दफनासाठी जागा निश्चित करणे.

जयेश भोईर :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट प्राण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सदर मोकाट प्राण्यामध्ये कुत्रे, मांजरी, इतर प्राण्यांचा समावेश आहे. सदर पशु-पक्षी यांचा मृत्यु झाल्यास त्यांच्या दफनासाठी महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र दफनभूमी नसल्याने त्यांची व्हिलेवाट लावण्यास अडचणी निर्माण होऊन दुर्गंधी देखिल पसरते. शहरातील नागरीकांचे आरोग्य व धोका लक्षात घेता मृत प्राण्याच्या अंतिम विधीसाठी विकास योजनेत स्वतंत्र जागा आरक्षित करणेची आवश्यकता आहे. त्याच प्रमाणे सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या असलेल्या स्मशानभूमी / दफनभूमी ठिकाणी जागा निश्चित करून यांत्रिकी पध्दतीने व्हीलेवाटीसाठी कमीत कमी जागेत मशिन बसविता येणे शक्य आहे. सदर ठिकाणी मृत प्राण्यांचे अंतिम विधी करता येऊ शकतील. सदर कामासाठी रु.43.80 लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तरी पशु-पक्षी यांच्या दफनाकरीता जागा निश्चित करणे तसेच सद्यस्थितीत यांत्रिकी पध्दतीने मृत प्राण्यांचे अंतिम विधी करण्यासाठी मशिनसह व्यवस्था करणेकामी खर्चास मान्यता देण्यात येत असुन याबाबत 8 दिवसांत मा. आयुक्त यांना कार्यवाही करण्यास ही मा. महासभा प्राधिकृत करत आहे असा मी ठराव मांडत आहे.

नयना म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम आता कालची गोष्ट आहे. 2 दिवसा अगोदरची गोष्ट आहे. माझ्या वॉर्डमध्ये एका मांजराने पिल्ल दिलेली आहेत. कमीत कमी 6-7 पिल्ले आहेत. हे निर्बिजीकरण होत नाही म्हणून ते झालेली आहेत आणि कुत्र्यांची पॉप्युलेशन वाढलेली आहे. मांजरांची पॉप्युलेशन वाढलेली आहे त्यांची जे तक्रार करतात काही लोक कुत्र्यांना उचलून डंपींग ग्राऊंडवर घेऊन जातात. कुठे कुठे सोडतात. त्यांना एकदम निर्दयीपणे त्यांच्यावर व्यवहार करतात तर डॉ. विक्रमला मी मॅसेज पाठवला ज्यांनी तक्रार केली त्यांचा नंबर दिला त्या मॅडमने जेव्हा सांगितलं तुम्ही प्रायव्हेट एजन्सीला द्या आणि ते प्रायव्हेट एजन्सी एक लाख रुपये मागत होती. त्या मांजराला त्यांची आई वारली आणि 6-7 पिल्ल अशी बेवारस आहेत तर अशा प्रकारे जर काही घटना घडली तर त्यांच्या बरोबर काय करायचं एवढ्या निर्दयीपणे आपण असा काही निर्णय घेऊ शकत नाही. तर त्याच्यासाठी मोकाट जनावरांसाठी काहीतरी रिॲलिटेशन सेंटर काही तरी अस करा म्हणजे एवढी जनावर प्रेमी लोक जे आहेत तरुण मुलं मुली जास्त आहेत आणि ते लगेच युट्युब व्हिडीयो बनवतात. पेपरमध्ये टाकतात आणि मिरा भाईंदर महापालिकेचे नाव कमी करतात. ह्या विषयी काहीतरी करा माझ्याकडे ई-मेल्स आहेत मी तुम्हाला फॉरवर्ड करते, रिक्वेस्ट लेटर आहेत आयुक्त साहेबांना पण फॉरवर्ड करते. तुम्ही त्याबद्दल काहीतरी निर्णय घ्या.

नयना म्हात्रे :-

